युगप्रवर्तक

# महात्मा फुले



"नित्यानंदांकित"

आकोट

REF-BK-0611594
म. ग्र. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. क्र. १०८०

# युगप्रवर्तक महात्मा फुले

लेखक :– श्री. पुं. पिंपळे,

नित्यानदाकित, आकोट

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 322.6… वि: …
क्रमांक 9048… नों. दि. …
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. 99५८६



मंगल प्रकाशन आकोट

किमत २ रु

मुद्रक व प्रकाशिका :- सौ. कमल पिंपळे,
सद्गुरु निवास, नरसिंगपूरा, आकोट

* सर्व हक्क प्रकाशकाधिन *

प्रथम आवृत्ति १९६१

मुद्रणस्थळ :- अशोक प्रेस, अकोला

RFFBK-0011594



भा
व
ना

— वं. नित्यानंदजी मोहिते महाराज —



श
ब्द

—नित्यानंदांकित—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम .................... वि: ..............
क्रमांक .................... नों: दि: ..........

# ★ प्र का श न ★

या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ महाराष्ट्र सरकारचे वीजपुरवठा व पाटबंधारे विभागाचे उपमंत्री दे. भ. एन्. यू. देशमुख तथा अण्णासाहेब यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव देशमुख तथा आबासाहेब यांचे शुभ हस्ते दि. १९ जानेवारी १९६२ रोजी पार पडला.

# सादर समर्पण—



**दे. भ. यशवंतराव चव्हाण**

मुख्यमंत्री महाराष्ट्रराज्य – मुंबई

बहुजन समाजाच्या या विद्वान व

थोर नेत्यास माझी ही

अल्पसेवा सादर समर्पण

करीत आहे

– नित्यानंदांकित, आकोट

# थोरांचे आशिर्वाद

॥ सत्यमेव जयते ॥

मुख्यमंत्री
महाराष्ट्र

सचिवालय मुबई ३२
दिनाक ११ जुलै १९६१

स न. वि. वि.

युगप्रर्तक महात्मा फुले याच्या चरित्राचे लिखाण आपल्या हातून पार पडले ही गोष्ट फार भूषणावह आहे आपल्याकडील आधुनिक सतापैकी महानसत आणि समाज-सेवक म्हणून महात्मा फुले याची कामगिरी अतिशय अप्रतिम अशी आहे.

बहुजनसमाजाला आपल्या हक्काबद्दल जाणीव करुन देऊन योग्य ते मार्गदर्शन त्यानी केले. त्याच्या चरित्रापासून आपल्याला आजही कित्येक गोष्टी शिकता येण्यासारख्या आहेत. त्याचा उल्लेख आपल्या पुस्तकात होईल अशी मी आशा प्रकट करुन आपल्या प्रकाशनास सुयश चिततो. कळावे.

आपला

– यशवतराव चव्हाण

॥ सत्यमेवजयते ॥

स. ल. सिलम
अध्यक्ष
महाराष्ट्र विधानसभा

कौन्सिल हॉल
नागपूर – १
दि २२-८-१९६१

स. न. बि. वि.

आपले पत्र मिळाले. ' महात्मा फुले ' यांचे सबधी आपण एक पुस्तक प्रकाशित करून आमच्या बहुजनसमाजा[illegible] त्याची पुनश्च आठवण करुन देत आहात हेच आपल्या हातून अेक थोर कार्य होत आहे असे मी म्हणेन

महात्मा फुल्याच्या काळात आमचा समाज भयकर अधकारातून वाटचाल करीत होता बालविवाह, केशवपन भृणहत्या, हरिजन बाधवावर सर्वत्र बहिष्कार अशा भोवऱ्यांत सापडल्यानें समाजाला कोणत्याहि दिशेने समोर जाण्याची आशाच उरली नव्हती परतु महात्मा फुल्याच्या अवताराने एक फार मोठे साध्य त्यावेळी आमच्या पतित समाजाला मिळाले. म फुल्यानी ज्या परिस्थितीशी व वातावरणाशी झगडून आपले कार्य चिकाटीनें चालू ठेवले, त्याकडे जरा लक्ष दिले तर क्षणभर असे मनात येतें की, " महात्मा फुले झाले नसते तर – " ? या सर्वांना त्यानी आमच्या समाजावरच नव्हे तर अखिल भारतावर सर्वात अधिक उपकार आपल्या कोणत्या कार्याद्वारे करुन ठेवले असतील तर स्वत व स्वत च्या कुटुबाला टाकीचे घाव सोसायला लावून स्त्रीशिक्षणाचा श्रीगणेशा प्रारभ करून आज भारतात स्त्री शिक्षण व स्त्री स्वातत्र्य या क्षेत्रात ज्या प्रमाणात प्रगति झालेली दिसून येते त्याचे सर्वथैव श्रेय महात्मा

फुल्यांच्या अचाट कर्तृत्वाकडे जाईल. सर्व प्रयत्नवाद व आशावाद सुद्धा खुटतील असा तो प्रतिकूल काळ होता. परतु काळापुढे न नमता काळालाहि अनुकूल करणारा महात्मा, महात्मा फुल्याच्या रुपाने समाजात अवतीर्ण झाला कळकळीनें व चिकाटीनें समाजोन्नतिसाठी देह झिजविणारे महात्मा फुल्यासारखे महापुरुष आमच्या भूमीला लाभले हें आमच्या समाजाचें व देशाचे महाभाग्य होय

अजूनहि आम्हांला बराच मार्ग आक्रमावयाचा आहे. त्यासाठी महात्मा फुल्यांचे जीवन व कर्तृत्व बरेच मार्गदर्शक ठरणार आहे मात्र त्याचे विस्मरण होता कामा नये त्या दृष्टीनें श्री श्री. पु पिंपळे यानी केलेल्या प्रस्तुत उपक्रमा-बद्दल मी त्यांचे अभिनदन करतो. अशीच आपल्या हातून बहुजनसमाजाची सेवा घडो ही सदिच्छा.

स. ल. सिलम

श्री गुरुदेव क्र. ............ नों दि.

# राष्ट्रसंताचा आशिर्वाद

श्री. पु पिंपळे यांना जयगुरु !

थोरामोठ्याचें चरित्र लिहिणें, कितीदा जरी लिहिले तरी त्यात नाविण्यच असणार ! कारण आजच्या बहुजन समाजाला सर्वच तऱ्हेच्या प्रगतीची जरुरी आहे. व ती अनेक विभागानी श्री महात्मा फुले यानी भरून काढण्याचा जो प्रयत्न केला तो समाजाला मोठे मार्गदर्शन आहे

आपण त्याचें चरित्र लिहिण्याचा जो प्रयत्न केला त्या बद्दल आपणाला धन्यवाद !

मी श्री. महात्मा फुलें याना या युगाचे नवीन मानव बनविणारे कारागीर मानतो व त्याच्या उपदेशानेच भारताचे कल्याण आहे अशी माझी श्रद्धा आहे.

दि २९-७-६१
आकोट

– तुकड्यादास

# निवेदन

ज्योतिच्या दिव्य प्रकाशानुभूतिनें पावन होण्याच्या पवित्रतम अुद्देशातून हा अल्पसा प्रयत्न आहे. यांत उणीवा नसतील असे मला म्हणावयाचें नाही. महात्मा फुले यांचे चरित्र अधिकाधिक जनतेच्या वाचनात यावे यासाठी मी कधीचा प्रयत्नशील आहे. त्या मोठ्या प्रयत्नातील हा छोटासा भाग आपणासमोर सादर करताना मनाला आनद होणे सहाजिकच आहे

महात्मा फुले याचे चरित्र इग्रजी व हिन्दी भाषेतून सुद्धा प्रकाशीत व्हावयाला हवे. तद्वतच मराठी भाषेतून सुद्धा अधिक विस्तृतपणे व अभ्यासूवृत्तीनें कुण्यातरी थोर व्यक्तीनें लिहायला हवे

अशा प्रयत्नांतून कै. डॉ बाबासाहेब आबेडकर यानी लिहिल्याचे आमचे अैकिवात आहे पण ते पूर्णत्वास जाण्यापूर्वी डॉ. बाबासाहेबाचे महानिर्वाण झाले दुर्दैवच म्हणावयाचे !

मी एक सामान्य माणूस! धडपडत राहावयाचे हा ह्व्यास! त्या ह्व्यासातून निर्माण झालेले हे चरित्र आणि आज प्रकाशनाची लाभलेली सधी हा योग! अन् या सर्वांपाठी असणारी सद्गुरुची कृपा ! या सर्वातून निर्माण झालेल्या माझ्या सानशा कृतिचा आपण स्वीकार करून मला कृतार्थ कराल ही मह्दाशा !

या पुस्तकाचे प्रकाशनास बऱ्याच जणांचें सहकार्य लाभले. पुस्तक लिहुन झाल्यावर त्यात मोहिते महाराजानी दुरुस्तीकरण केले त्याचा ी तर जन्मोजन्मी ऋणी आहेच पण या निमित्तानें सूद्धा ते ऋण दुणावले

या पुस्तकास आपले अमोल असे आशिर्वाद देऊन ज्यानी मला धन्य केले त्यात दे. भ. यशवन्तरावजी चव्हाण व सभापति दे. भ. सयाजीराव सिलम, महाराष्ट्र राज्य आणि राष्ट्रसत तुकडोजी महाराज यांचा मी शतश ऋणी आहे.

या पुस्तकाचें अर्पणाचा स्विकार करण्यासबधी दे. भ. यशवतरावजी चव्हाण मुख्यमत्री महाराष्ट्र यानी अनुमति दिल्याबद्दल मी त्याचा आभारी आहे

तद्वतच या चरित्रास आपले मौलिक शद्ब लिहून दिल्याबद्दल प्रा डॉ वि भि. कोलते नागपूर, दे भ माधवरावजी बागल कोल्हापूर, व मोहिते महाराज या सर्वांचा मी नम्रपणे आभारी आहे.

या पुस्तकास प्रकाशित करावयाचें हे अवघड कार्य पण माझ्या ज्या मित्रांनी सुकर केले, प्रकाशन निधी जमविण्यास ज्यानी कष्ट झेलले त्यात श्री ह. वा. काळे, श्री रा ओ मेहरे, श्री. भा ग अकर्ते याचा उल्लेख करणे आवश्यक आहे. मी त्या सर्वांचा ऋणी आहे

माहत्मा फुलेचे चित्र तयार करुन देण्यास श्री आर के. देशमुख, व मुखपृष्ठाची छपाई करुन देण्यास श्री प्र. भा. खेळकर चित्रा मुद्रणालय व वेळोवेळी सहकार्य देणारे श्री. गो रा. वैराळे याचा मी आभारी आहे.

माझी अल्पसेवा जनता जनार्दनाच्या सेवेत पावन व्हावी हीच आकांक्षा !

सर्वांचा विनम्र

महात्मा फुले जयती

१९६१

श्री. पुं. पिंपळे

आकोट

# प्र स्ता व ना

श्री श्री पु पिंपळे यांनी लिहिलेले महात्मा फुले यांचे चरित्र वाचकासमोर येत आहे ही आनंदाची गोष्ट आहे. थोर पुरुषांची चरित्रे सर्वसामान्य जनसमूहासमोर जितकी जातील तितकी पाहिजेच आहेत त्यातून महात्मा फुले यांचे चरित्र त्याच्यासमोर जाणे हे तर आजच्या काळांत विशेषच आवश्यक होय. कारण महाराष्ट्रातील बहुजनसमाजाला जागृत करून आपल्या पायांवर स्वाभिमानाने उभे राहण्याचे धडे जर प्रथम कुणी दिले असतील तर ते महात्मा ज्योतिबा फुले यांनीच ! या बाबतीतील यांची कामगिरी राष्ट्रीय स्वरुपाची असून ती केवळ अद्वितीय या दृष्टीने त्यांच्या चरित्राचे आणि विचारांचे खरे स्वरुप जनतेसमोर जितक्या विविध प्रकारांनी मांडले जाईल तितके पाहिजेच आहे. दुर्दैवाने महात्मा फुले यांचे सर्वांग सुंदर असे एकहि चरित्र आज उपलब्ध नाही महात्मा फुले यांच्या चरित्राची महाराष्ट्राला प्रथम ओळख करून देण्याचे श्रेय श्री पंढरीनाथ सिताराम पाटील यांच्याकडे जाते पण त्यांनी लिहिलेल्या महात्मा फुले यांच्या मोठ्या चरित्राची प्रत देखील आज पहावयास सापडत नाही या मोठ्या ग्रंथाचा सारांश म्हणून त्यांनीच प्रसिद्ध केलेला लहानसा चरित्रग्रंथ तेवढा उपलब्ध आहे पण तोहि अलिकडे दुर्मिळ झालेला आहे श्री मानकर, श्री. घोरपडे, श्री शहाकार आदि लेखकांनी छोटी मोठी चरित्रे प्रसिद्ध केलेली आहेत हे खरे पण या सर्वांनी श्री पंढरीनाथ पाटील यांनी लिहिलेल्या चरित्र ग्रंथातील माहिती वरच निर्वाह केला आहे. मध्यंतरी आचार्य अत्रे यांनी महात्मा फुले यांच्या जीवनचरित्रावर बोलपट निर्माण करण्यासाठी फुले यांच्या चरित्राची आणि त्यांच्या काळाची माहिती देणारी मूलभूत साधनसामग्री प्रयत्नपूर्वक मिळवून अभ्यासिली त्याच वेळी त्यांच्या कसदार लेखणीतून फुले यांचें जीवन चरित्र उतरले असते तर मराठी वाङमयाला ते भूषणभूत ठरले असते फुल्यांच्या जीवनचरित्राच्या विविध पैलूवर त्यामुळे नवीन प्रकाश पडला असता पण तो योग आला नाही खुद्द श्री पंढरीनाथ पाटील यांनी आणखी पुष्कळ नवीन माहिती गोळा करून ठेवलेली आहे

फुले याच्या काही अप्रसिद्ध लिखाणाची हस्तलिखितेहि त्याच्या जवळ आहेत असे अैकतो या सर्वांचा उपयोग करून श्री पाटील स्वत च फुल्याचे विस्तृत चरित्र लिहिणार आहेत हा सकल्प फार दिवसापूर्वी-नव्हे अनेक वर्षापूर्वी त्यांनी सोडला पण तो अद्याप पूर्ण झालेला नाही

डॉ आबेडकरानी इग्रजीत लिहिलेले फुल्याचे चरित्र अर्धवट पडून आहे असे कळते अपूर्ण स्वरुपात का होईना, तें प्रसिद्ध झाले तर विचारवताना उदबोधक ठरेल अशा स्थितीत श्री पिपळे यानी लिहि-लेलें जुन्याच माहितीवर आधारलेले असले तरी हे नवीन चरित्र प्रसिद्ध झाल्याने अनेक वाचकाची सोय होईल असा मला विश्वास वाटतो—

महात्मा फुले याच्या चरित्राची आणि जीवन कार्याची ओळख नवीन दृष्टीकोनातन करून देण्याची आज फार आवश्यकता आहे तसा यत्न फक्त तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी ह्यानी आपल्या ज्योति निबधात काय तो केलेला आढळतो, इतर सर्वांचे लेखन बव्हशी जुन्याच पद्धतीने झालेले आहे फूल्यांच्या काळी निर्माण झालेल्या सघर्षाला जातीयवादाचे स्वरुप देण्यात आलेले आहे आणि त्याचीच पुनरावृत्ति आजहि अनेका-कडून करण्यात येते महात्मा फुले याच्या कार्याकडे या दृष्टीकोणातून पाहिल्यामुळें अनेक गैरसमज निर्माण होऊन महाराष्ट्राचे फार नुकसान झालेले आहे जातीय सघर्ष हे त्याच्या कार्याचे वरवर भासणारे पण अयथार्थ स्वरुप आहे त्याच्या मुळाशी असलेल्या समाजवादाच्या आणि मानवतावादाच्या मौलिक प्रेरणा होत्या त्या शोधून, त्याचा अभ्यास करून त्या भूमिकेतून ज्योतिबाचे चरित्र लिहिलें गले पाहिजे. ज्योतिबा हे नुसते समाजसुधारक होते असे नाही तर ते धर्मसुधारक होते १८ व्या शतकात इग्रजानी हिंदुस्थानात पाय रोवल्यापासून ख्रिस्ती धर्म प्रचारकाचे जाळे पसरु लागले त्यामुळे हिंदुस्थानातील धर्मविचाराचे फार मोठे मथन सुरु झाले त्यातून प्रथम बगालमध्ये राजा राममोहनरायाच्या ब्राम्होसमाजाचे नवनीत निघाले हा ब्राम्होसमाजच कालांतराने प्रार्थना

समाजाच्यारुपानें महाराष्ट्रात अवतीर्ण झाला परमहंस सभा, सत्यशोधक समाज इत्यादि या विचारमंथनातूनच निर्माण झाले होते यांच्या विचाराची प्रतिक्रिया म्हणूनहि काही सभा व समाज स्थापन झाले होते आणि या सर्वांच्या मुळाशी ख्रिस्ती धर्मप्रचाराने झालेले विचारमंथन होते हे विसरुन कसे चालेल? त्यामुळें अन्यधर्मांतील सत्वांश तेवढा घेऊन हिंदु धर्मांची आणि त्या धर्माच्या पायावर आधारलेल्या हिंदुसमाजाची पुनर्रचना करणें हा विचार सर्वांच्या मुळाशी होता असे स्पष्ट दिसते ज्योतिबाच्या सत्यशोधक समाजाची तत्वे शोधून पाहिली म्हणजे त्यांच्या जीवन कार्याची मूलभूत प्रेरणा आपल्या लक्षात येईल आपल्या जीविताच्या शेवटच्या कालात त्यांनी लिहिलेल्या "सार्वजनिक सत्यधर्म" या पुस्तकातील विचाराची दिशा याहून वेगळी नाही ह्या किंवा अशाच अन्य मूलभूत धार्मिक वैचारिक पायावर त्यांच्या बहुतेक चळवळी आधारलेल्या होत्या असें दिसून येत नाही काय ? हा विचार मी केवळ उदाहरणादाखल म्हणून या ठिकाणी मांडला. तो बरोबर असेल किंवा नसेलहि पण अशा पायाभूत विचारसरणीतून ज्योतिबाच्या चरित्राचे आणि कार्याचे संशोधन आणि लेखन झालें पाहिजे असे मला फार वाटते या दृष्टीनें मौलिक कार्य कुणीतरी करण्याची आवश्यकता आहे एवढेच येथे सुचवून ठेवतों

तथापि असा प्रयत्न होत नाही तो पर्यन्त थांबून राहण्याचे कारण आहे असे नाही महात्मा फुले यांच्या विचाराचे लोण जनतेसमोर पोंचणे अत्यंत आवश्यक आहे. किंबहुना ते पोचलेले असलें तरी त्याची यथार्थ जाणीव सामान्यांना नाही ती करून दिली पाहिजे. भारताचे स्वातंत्र्य संपादन करण्यासाठी स्थापन झालेली राष्ट्रीयसभा आज खरीखुरी राष्ट्रीय सभा झालेली आहे कारण, राष्ट्रातील बहुसंख्याकांचे हे स्वप्न साकार झालेले आहे. दलित समाजाच्या उद्धारासाठी कार्य करणाऱ्या महाराष्ट्रातील कै. विठ्ठलराव शिंदे, कै. भाऊराव पाटील, डॉ आंबेडकर इत्यादि कर्तृत्ववान पुरुषांच्या विचाराची ज्योत महात्मा फुले यांच्या

विचाराच्या ज्योतीवर पेटवली होती विठ्ठलराव शिंदे याच्या प्रयत्ना–मुळेच अस्पृश्योद्धाराचा कार्यक्रम राष्ट्रीय सभेच्या कार्यक्रमात अतर्भूत झालेला होता इत्यादि गोष्टी लक्षात घेतल्या म्हणजे ज्योतिबाच्या कार्याचे खरेखुरे महत्व आकलन होऊ शकेल

या कार्याची अल्पशी ओळख श्री. पिंपळे यानी या पुस्तकातून करून दिली आहे. श्री पिंपळे हे महात्मा ज्योतिबा फुले याच्या विचार-सरणीने प्रभावित होऊन कार्य करणाऱ्या श्री नित्यानद मोहिते महा–राजाचे शिष्य आहेत कथा कीर्तनातून श्री. नित्यानदजी महाराज जे कार्य करीत असतात तेच अशरुपाने का होईना, श्री पिपळे यानी या लहानशा पुस्तिकेतून करण्याचा प्रयत्न केला आहे हा प्रयत्न अधिक पायाशुद्ध झाला असता तर चागले झाले असते तथापि आहे त्या स्वरु–पातहि तो बराच उपयुक्त होईल. त्यांच्या या पुस्तकातील ज्योतिबाच्या चरित्राचे व विचाराचे सार ग्रहण करून त्यातून आपल्या जीवनाला आवश्यक अशी शिदोरी वाचकानी बांधून घ्यावी या प्रयत्नाबद्दल मी श्री पिपळे यांचे मन·पूर्वक अभिनदन करतो

वि. भि कोलते.
नागपूर

'शेतकऱ्याचा आसूड' या पुस्तकातील उतारा

# उपोद्घात

विद्येविना मति गेली, मती विना निती गेली, नीती विना गती गेली, गती विना वित्त गेले, वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

उद्देश, शूद्र शेतकरी हल्ली इतक्या दैन्यवाण्या स्थितीस येऊन पोहचण्याची धर्म व राज्यसंबंधी अनेक कारणे आहेत, त्यापैकी थोड्या बहुताचे विवेचन करण्याच्या हेतूने हा पुढील ग्रंथ रचिला आहे. शूद्र शेतकरी व बनावट जुलमी धर्माचे योगानें एकंदर सर्व सरकारी खात्यांनी ब्राम्हण कामगाराचें प्राबल्य असल्याने भट भिक्षुकाकडून व सरकारी युरोपियन कामगार ऐषआरामी असल्याचे योगानें, ब्राम्हण कामगारांकडून नाडले जातात त्यापासून त्यास या ग्रंथावलोकनाचे योगाने आपला बचाव करता यावा असा हेतु आहे, म्हणून ह्या ग्रंथास "शेतकऱ्याचा आसूड" असे नाव दिले आहे

वाचकहो, सांप्रत शेतकरी म्हटले म्हणजे त्यांमध्यें तीन भेद आहेत शुद्ध शेतकरी अथवा कुणबी, माळी व धनगर. आता हे तीन भेद होण्याची कारणे पाहिली असतां, मूळचे जे लोक शुद्ध शेतकीवर आपला निर्वाह करू लागले ते कुळवाडी अथवा कुणबी, जे लोक आपलें शेतकीचे काम सांभाळून बागाइती करू लागले ते माळी व जे ही दोन्हीही करून मेंढरे, बकरी वगैरेंचे कळप बाळगू लागले ते धनगर असे निरनिराळ्या कामावरुन प्रथम हे भेद उपस्थित झाले असावेत, परन्तु आतां या तीन पृथक जातीच मानतात --------------------

(नॅशनल लायब्ररी कलकत्ता, यांच्या सौजन्याने)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ३८२८४ दि: ५।१।७१

# पुरस्कार !

महात्मा फुले यांचे चरित्र [illegible] पिंपळे, आकोट यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक लिहिले. म. फुलेंच्या कार्याची महत्तमता चरित्र वाचित असताना सहज होते.

कर्तृत्वशाली म. फुले यांचे ठाई वसत असलेले सत्या विषयीचे प्रेम व ते आचरण्यात आणण्याचे असामान्य धैर्य हे ध्यानी येते व त्या "राष्ट्रद्रष्टा महात्म्याचे" नाव मुखी येऊन धन्योद्गारासह आदरानें हात जोडले जातात. श्री. संत-श्रेष्ठ तुकारामानन्तर धर्माचे शुद्धीकरण करून स्वातंत्र्यानुकूल संघटन निर्माण करण्याचे कठीण काम म. फुले यांनीच केले. या कामात श्री संत तुकारामाप्रमाणेंच म. फुलेंनाहि बरेच विरोधक निर्माण होऊन त्यांनी नाना पद्धतीने त्रास दिला. म. फुलेनंतर म. गांधींनीहि हेच काम केले त्यामुळे म. गांधींना किती त्रास झाला हे वर्तमानकालीन सुजनांना विदित आहेच !

निर्भेळ संतभूमिकेवरुनच म. फुले यांनी अखंड जनसेवा केली. त्यांच्या सेवेत निर्वैरत्व व निर्लोभत्व हे गुण प्रकर्षाने दृष्टिस पडतात. आजच्या स्वातंत्र्य मंदिराची इमारत ज्या राष्ट्रप्रेमाच्या अभिमानाच्या पायावर उभारली गेली तो पाया भक्कमपणें घालण्याचे पवित्र कार्य महात्मा फुले यांनीच केले

त्यांचे गुणवर्णन करण्यास शब्द अपुरे आहेत. कै. गोविंद कवींनी एके ठिकाणी असे म्हटले आहे की, "तुझे पवाडे गातील पुढती तोफांचे चौघडे" हे महात्मा फुलेंना तंतोतंत लागू होतें त्यांच्या कार्याची ओळख भारताबाहेर करून

देण्याचे राष्ट्रकार्य आजच्या राष्ट्रभक्तानी करावयास पाहिजे हे कार्य जर आजच्या म फुलेच्या गोडवे गाणाऱ्याकडून झाले नाही तर मोठमोठ्या अधिकारपदावर गेलेल्या व जाणाऱ्यास नुसतेच दुषणीय नव्हे तर निद्यनीय आहे.

बुद्धवासी डॉ. बाबासाहेब आबेडकरांनी म. फुलेचे इग्रजीत चरित्र लिहिण्याचे मान्य करून एक दोन प्रकरणेहि लिहिली व ती सध्या त्याचें सुपूत्र श्री. यशवतराव आबेडकर याचे सग्रही आहेत ती त्याचेकडून म फुले प्रेमीयानी प्रसिद्ध करावीत.

डॉ पजाबराव तथा भाऊसाहेब देशमुख याना मद्रासचें ख्यातनाम श्री. रामस्वामी मुदलीयार याचे लेखणीतुन इग्रजीत म फुले चरित्र तयार करवून घ्यावे म्हणून विनती करण्यात आली. पण या घटना नि सशय खेदजनक आहेत !

श्रीराम पिंपळे यानी हे अद्यावत असे महात्मा फुले याचे चरित्र लिहून आजच्या व भावी कालातील पिढीवर अनत उपकार केले. धन्यवाद !

म फुलेंना कै गोविंद कवीच्याच शद्वात – "नमने तुज महस्त्रदा ! सहस्त्रदा ! सर्वदा "

'सुजनकृपा'
जठारपेठ, अकोला
दि २७-११-६१

– नित्यानंद मोहिते

दि. ..............
क्रमांक .................... नों. दि. ..............

# पुरस्कार – २

महात्मा फुल्यांची योग्यता कालाबरोबर वाढतच जाऊ लागली आहे ते एक महान द्रष्टे होते, युगप्रवर्तक होते, खरे समतावादी होते. मार्क्सवाद वाचला नसला तरी दृष्टी मार्क्सवादीच होती गुलामगिरीत खितपत पडलेल्या शुद्रांना व अस्पृश्यांना व स्त्रियांना त्यांनी माणूसकी मिळवून दिली व मान्यवर ठरलेल्या ब्राम्हणांना ते किती क्षुद्र आहेत याची जाणीव करुन दिली ते स्वातंत्र्याचे व समतेचे खरे भोक्ते होते खरे मानवतावादी होते जातीयवादाचा त्यांच्यात लवलेशही नव्हता स्वातंत्र्याचा लाभ सर्वांनाच झाला पाहिजे, त्याचा फायदा केवळ विशिष्ट वर्गाच्याच हाती पडू नये, हा त्यांचा कटाक्ष होता. पण स्वतःच्याच पदरी स्वातंत्र्याचा सर्व फायदा पडावा असे वाटणाऱ्या वर्गाने त्यांचेवर सरकार धार्जिणे हा आरोप केला.

या पुस्तकांत त्यांच्या विविध कार्यावर प्रकाश पाडला. भाषा सोपी आहे. त्यांचे राष्ट्रीय स्मारक अवश्य झाले पाहिजे. त्यांना न मानणारे आज त्यांचे चहाते झाले आहेत उद्या त्यांचे राष्ट्रीय स्मारक झाल्याखेरीज राहणार नाही. कोल्हापूरने हिंदुस्थानात त्यांचा प्रथमच पुतळा उभा करून आघाडी मारली आहे यशवंतरावजींच्या कारकीर्दीत त्यांचे योग्य स्मारक होईल अशी आशा बाळगण्यास काहींच हरकत नाही.

प्रत्येक आपल्या दृष्टिकोनातून त्यांच्या चरित्राकडे पाहून आपआपले विचार ग्रंथरूपानें प्रकट करीत राहतील यात शंका नाही

— भाई माधवराव बागल
कोल्हापूर

# संदर्भ ग्रंथ


| | लेखक – |
| --- | --- |
| १ म ज्योतिराव फुले | श्री. पढरीनाथ पाटील, चिखली |
| २ महात्माफुले | श्री. आ'अ. मानकर |
| ३ महात्मा फुले | डॉ कविरत्न कृष्णमूर्ति, अकोला |
| ४ म फुले चरित्र व कामगिरी | श्री पा ल, शहाकार नागपूर |
| ५ महात्मा फुले | श्री बाबुरावजी भोसले, नागपूर |
| ६ सौ सावित्राबाई फुले | सौ उषाबाई कोलते, नागपूर |
| ७ सार्वजनिक सत्यधर्म | कै. महात्मा फुले |
| ८ सपूर्ण निबध माला (दोनखड) | विष्णुशास्त्री चिपळूणकर |
| ९ विष्णु कृष्ण चिपळूणकर काल आणि कर्तव्य | श्री ग. त्र्य माडखोलकर, नागपूर |

१० सारस्वत पाठमाला (भा ३ रा) सुविचार प्रकाशन नागपूर पुणें.

आचार्य अत्रे याचा लेख याशिवाय –

दैनिक लोकमान्य, लोकसत्ता, मराठा, मातृभूमि, साप्ताहिक दीनबधू, लोकमान्य आदि वृत्तपत्रामधून आलेले निरनिराळे लेख


● ● ●

दा. क्र. ११५९८

# जन्म व शिक्षण ● ● १

महात्मा फुले याच्या नावाचा उच्चार करताच सतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या वेदतुल्य अभगाची आठवण झाल्याविना राहत नाही महात्मा फुलें यांच्या जन्माचे कारण तुकाराम महाराजाचे खालील अभगांत पहावयास सापडते.

> आम्ही वैकूठासी । आलो याच कारणासी । बोलले जे ऋषी ।
> साचभावे वर्ताया ॥
>
> झाडू सताचे मारग । आडरानी भरले जग । उच्छीष्टाचा भाग ।
> शेष उरले ते सेवू ॥
>
> अर्थे लोपली पुराणें । नाश केला शब्द ज्ञाने । विषय लोभे मने ।
> साधनें बुडविली ॥

तुकाराम महाराजानी जें आपले जन्मकारण कथन केले, अगदी तेंच ततोतन्त ज्योतिबा फुलें याचें जन्म कारण होय.

आमच्या चरित्र नायकाचा जन्मच अशा काळी झाला की, अशीच परिस्थीती तुकाराम महाराजाच्याहि काळी सुद्धा अस्तित्वात होती ! तुकारामाच्या काळी मुसलमानांची गुलामी राष्ट्रावर आली होती

वर्गश्रेष्ठ वर्ग मुसलमानांची चाकरी आनदाने, राजीखुषीनें करण्यात रमून गेला होता, अधःपतित झाला होता. तुकाराम महाराजाचें वचनावरुन हे लक्षांत येते –

सांडिले आचार । द्विज चाहाड झाले चोर ।।
टिळे लपविती पातडी । लेति विजार कातडी ।।
बैसोनिया तक्ता । अन्नेविण पिडीति लोकां ।।
मुदबख लिहिणे । तेल लूपावरी जिणे ।।
नीचाचे चाकर । चुकलिया खाती मार ।।
वैश्य शुद्रादिक । हे तो सहज नीच लोक ।।
अवघे बाह्यरंग । आंत हिरवे वरी सोंग ।।

या अभंगातील महाराष्ट्रातील समाजस्थितीचे वर्णन १९ व्या शतकानाहि ततोतत लागू पडते.

पेशवाई बुडाल्यामुळें इतरापेक्षां विशिष्ट वर्णासच खेद होत होता याचे कारण त्यांच्या पुरते बोलावयाचें तर खऱ्या अर्थानें त्याचेंच ' स्वराज्य ' गेले हे होय.

इतरेजनाना पेशवाईत काय स्वातंत्र्य होतें ? साधासुधा धार्मिक आचारहि त्याना मोकळेपणी करता येत नव्हता मग राजकीय स्वातंत्र्य तर दूरच राहील ! इतरातील ज्या थोडक्याना पेशव्यांच्या राजकारणात मान मिळत होतांतो केवळ पेशवाईचें ते मुख्य आधारस्तंभ होते म्हणूनच ! एरव्ही त्यांची ही किंमत धर्म संबधात इतरेजनासारखीच हीनपणाची होती

मुसलमानी आमदानीत श्रीशिवछत्रपति व त्याचें निष्ठावंत मावळ्याच्या अन्तःकरणांत जसा गुलामगिरीचा विरोध उफाळून उठला होता तसा विशिष्ठाचा दाखला त्याकाळीं म्हणावा तसा मिळत नाही. उलट त्या देश गुलामीच्या काळात आपले धार्मिक वर्चस्व आबाधीत पणें टिकविण्यातच वरिष्ठ म्हणवून घेणाऱ्या, ज्ञातीयांचा अट्टाहास चाललेला पहावयास मिळतो.

बहुजन समाजास धार्मिक समानता मिळावी म्हणून श्री संत तुकारामांनी प्रयत्नांची शिकस्त केली तरीहि ज्यावेळी धर्म मार्तंडांच्या

अदूर दृष्टीला खिळलेला स्वसत्तेचा 'वडस' नाहीसा होण्याची किंचितही चिन्हे दिसेनात त्याचवेळी वारकरी सम्प्रदायाचें स्वतन्त्र अस्तित्व प्रखरपणानें, महाराजानी प्रसारीत करण्याचा धडाका लावून देश स्वातन्त्र्याबाबत निराभिमानी असणाऱ्याचें धावे दणाणून सोडले

ब्रिटीशाच्या गुलामगिरीतहि वरिष्ठ वर्गाची तीच मनोवृत्ति होती. हे कारकुनी पासून तो मोठ्या हुद्याच्या नोकरीवर असणाऱ्या सङ्ख्येवरून उघड होत नाही का ?

सन १८१८ मध्ये सातारचे छत्रपतिचे सेवक जे पेशवे यानी आपल्या धन्याला म्हणजे छत्रपतिना नविचारतां उलट द्रोह करून ब्रिटीशाना मराठ्यांच्या राज्याचे दान देऊन मोबदल्यात सुखा चैनीनें आयुष्य व्यतित होणे करिता पेन्शन मिळविली.

आमच्या चरित्र नायकाचा जन्म यानतर अवघ्या ८/९ वर्षानी १८२७ मध्ये झाला म० फुले हेच त्या काळचें महाराष्ट्रातील नेत्रदीपक धार्मिक व औद्योगिक सुधारणेचे आद्यप्रणेते होते ते कसे ? हे आता ओघानेच येईल

सन १८२७ च्या एका मगल दिवशी अशा या थोर 'ज्योति' चा जन्म झाला. झोपडीत पणती लावली म्हणजे उजेड यावा नव्हे ज्योत पेटली म्हणजें तिच्या पोटी उजेड असतोंच तद्वत ही महाराष्ट्रात निर्माण झालेली ज्योत प्रकाशित होईलच, महाराष्ट्रातील झोपडी झोपडीतून, ही ज्योति उजेड निर्माण करील तिमिराचे, दैन्याचे राज्य, सपवील; या दूरदर्शित्वानें बाळाच्या आईनें, बाळाचे नांव मोठ्या कौतुकानें 'ज्योतिराव' ठेवले असावे

ज्योतिरावाची आई चिमणाबाई ! चिमणाबाई मात्र बाळाचें कौतुक पाहण्या इतक्या सुदैवी नव्हत्या. आपल्या बाळाला सोडून जातांना त्याना दु.ख वाटत होते. ज्योतिराव अवघ्या ९ महिन्याचे

झाले नव्हते तोंच चिमणाबाईंनी आपला प्रतिजीव, गोविंदरावांच्या स्वाधीन करुन आपली इहलोकीची यात्रा संपविली. या दैविकोपामुळेच ज्योतिराव स्वावलंबी व स्वाभीमानी झाले असले पाहिजेत. मातृसुखा-बद्दल ज्योतिराव दुर्दैवी ठरले. मात्र ज्योतिरावाना पितृसुख भरपूर लाभले. ज्योतिरावांचे वडील गोविंदराव। गोविंदराव म्हणजे त्या काळातील माळी समाजातील एक प्रमुख कार्यकर्ते होते.

गोविंदरावांचे वडील शेटीबा आपल्या पुरंदर तालुक्यातील सातारा जिल्ह्यातील खानवाडी गांवला सोडून उदरनिर्वाहा करितां पुण्यास येऊन राहिले त्यांचे पूर्वज सातारा जिल्ह्यातील कटगुणचे राहणारे। गोविंदरावाना पेशव्याकडे सुबक हार, गुच्छ पुरविण्याचे काम मिळाले त्याच्या या कामातील कसबामुळें पुण्यातील बहुजन त्याना गोरे ह्या आडनांवा ऐवजी 'फुले' म्हणू लागले

पत्नीच्या जाण्यामुळे ज्योतिरावांना साभाळावयाची अडचण त्यांच्यापुढे निर्माण झाली ज्योतिराव म्हणजे गोविंदरावाचें भवितव्याचें स्वप्न। प्रगतीची दिव्यपताका। त्यामुळे मुलाचा सांभाळ आत्मियतेने, लाडाने व्हावा हा त्यांचा भाव। पण ते कसें शक्य होते? अखेर त्याना एक दाई पहावी लागली दाईनें मात्र अगदी मातेसारखा मुलाचा सांभाळ केला तिनें ज्योतिरावाचे संगोपन मोठ्या लाडाने केले बाल ज्योतिने प्रज्वलीत होत होत सातव्या वर्षांत पदार्पण केले वरिष्ठाच्या मुलाप्रमाणेंच ज्योतिरावास शिक्षण द्यावं, हा गोविंदरावाचा उद्देश। पण त्या काळी शूद्राना शिक्षणाचा अधिकार नव्हता, या रुढीचें उल्लंघन करून, ज्योतिरावाना शाळेत घालण्यांत आले ज्योतिराव म्हणजे जात्याच हुशारीचे प्रतीक, विद्याभ्यासाची स्वभावतःच आवड ते भराभर वरच्या वर्गाच्या मर्यादा ओलांडून ज्ञान संकलन करु लागले ज्योति प्रखर होत आहे हे अंधारास नाही पहावले। अंधाराचें अस्तित्व नाहीसे होईल, ज्योत तेज वितरेल, या भीतिने कंपित झालेला अंधार, आपल्या सव डघामध्यें कुरकुरायला लागला।

अधाराचा आश्रय घेणारे अधारकर्मी गोविंदरावाकडे गेले. (वास्तवता ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या 'सर्वांना ज्ञान द्यावे' कामापुरतेंच का होईना, खर्डेघाशी कारकून निर्माण व्हावेत या उद्देशानेंच का होईना पण त्यांनी शिक्षणाचे दालन सर्वांना मोकळे केले ) त्यातच हे ज्योतिराव होते. पण अशा शाळातून देखिल ठराविक वर्गाचाच भरणा जास्त होई. 'अज्ञ' भोळ्या लोकांना निरनिराळे वेड भरवून शिक्षणापासून परावृत्त करण्यात येई अशा प्रयत्नातच काही लोक गोविंदरावाकडे आले आणि गोविंदरावास म्हणाले हे आपण चागले केले नाही शिक्षणाचा अधिकार शुद्राना नाही. यामुळे धर्म बुडाला, पाप झाले ! हे नीच कर्म आहे ! अहो एवढेच नव्हे तर यामुळे मुलगा ऐदी बनेल तुम्ही कराल चागले आणि होईल वाईट ! तेव्हा आम्ही आपणास सूचना करतो की, आपले शेतीचेच काम चागले आहे चार पैसे मिळविल तेवढाच आधार आणि तुमच्या सारख्या माणसांनी हे पाप करावे हे चागल नाही तेव्हा ज्योतिरावास शाळेतून काढून घ्या, यातच तुमचा शाहाणपणा आहे. वाटेल त्या युक्त्या प्रयुक्त्यांनी गोविंदरावाचा शिक्षणाकडील कल बदलविण्यात आला धाकहि दाखविण्यात आला गोविंदरावासारख्या धर्मभोळ्या माणसास, हे म्हणणे पटलें ज्योतिरावांची शाळा बद ! पाटीपुस्तक जाऊन हाती विळा आला, शाळा सपून मळा आला ! ज्योतिरावाना फार दु ख झाले पण, वडीलाना काय म्हणावयाचे?

या दैवी फेऱ्यात आणाखी एक घडामोड झाली त्यावेळी बाल विवाह सुरु होता. मुलगा लग्नास योग्य झाला, मुलगी चालून आली मग विवाहच उरकून घ्यावा या विचाराने गोविंदरावानी आपल्या मुलाचे लग्न उरकून घेतले सावित्रीबाई हे ज्योतिरावाच्या पत्नीचे नांव ! सावित्रीबाई जणू पूर्वीची ऋषीकालीन सावित्रीच अवतीर्ण झाली असे वाटले विवाह पार पडला मोट मळा सुरु होती कुठें अभ्यास आणि कुठे हे मोट हाकणे जीवनातील या स्थित्यतराने ते उदासिन झाले पण दैवाला ते पसत कसें पडणार ? यामुळें 'ज्योति' 'महात्मा' न बनता ज्योत्याच राहिला असता. त्याच्या बागेजवळच एक मुसलमान सद्गृहस्थ राहत होते त्यानी व लेजिटसाहेबांनी सुद्धा

गोविंदरावाचे मन वळविले आधिच उत्सूक असलेले त्याचे मन, या कार्यार्थ पुन्हा धांवले आणि ज्योतिरावांना शाळेत घालावयास प्रवृत्त झाले ज्योतिराव ह्यावेळी वयाने १४ वर्षांचे होते हा काळ सन १८४१ मधील असावा यावेळी त्याना इग्रजी पहिल्या वर्षांत दाखल करण्यांत आले.

मध्यतरीच्या खंडामुळें अभ्यासाकरितां बरीच चिकाटी दाखवून बराच अभ्यास करावा लागला. ज्योतिराव उत्साहानें पुढे पुढें जाऊ लागलें त्याचा स्वभाव प्रेमळ, मनमिळावू व दिलदार असल्यामुळें, त्याना बरेच ब्राम्हण व ब्राम्हणेतर मित्र लाभलेत. हेच त्याच्या स्वभावाचेवैशिष्टच होय।

त्या काळांत एक तरुणाचा सघ स्थापण्यात येऊन त्यांच्या समोर जॉर्ज वाशिग्टन, छत्रपति शिवाजी महाराज, नेपोलियन बोनापार्ट आदि थोराच्या गोष्टी सांगण्यात येऊन तरुणांची मनें कांही उपद्वापी लोकाच्या बहकविण्याने बहकू लागली, फाजील देशभक्तिचें वारे वाहू लागले यात ज्योतिराव सुद्धा जाऊ लागले, वाहले. या तरुणामध्ये ज्योतिरावांनी प्रथमांक पटकाविला पुण्यातील लहुजीबुवा नामक एका गृहस्था कडून दांडपट्टा, ढाल, तलवार, कसरत, गोळीबार वगैरे शिक्षण या मडळीना देण्यात आले या तरुणांच्या सणसणलेल्या व तापलेल्या रक्तात ज्योतिरावाची एक गोष्ट मनन करण्यासारखी आहे. ज्योतिराव काम सपवून घराकडे परतले होते. वाटेत दोन गोरी माणस भाडत होती. ज्योतिरावांनी डोक्यावरील उसाचा गठ्ठा खाली ठेवला व त्या इग्रजाना इग्रजीत समजाविले एक इडियन माणूस आपणास बायबला-तील वचनाधारे समजावितो हे बघून ते लाजले व निघून गेलें.

या कालखंडापर्यंत ज्योतिराव शालान्तपरिक्षे पर्यंत आलें. त्यानी मराठीचें वाचन पुष्कळ केलें. ज्ञान मिळविलें आणि अखेर विसाव्या वर्षी शिक्षण सपवून ते ससारात पडले. त्यानी तदनतरहि इग्रजी ग्रथाचें अध्ययन सुरुच ठेवले.

एका ठरविक विशिष्ठ वर्गालाच शिक्षणाचा अधिकार आहे. ही चाकोरी सोडून ज्योतिराव प्रथमत शिक्षित झाले आणि आपल्या या कृतिने, हा अधिकार सर्वांना सारखाच आहे. त्या ठिकाणी उच्च नीच, शुद्र हे भेदभाव नाहीत, शिक्षण हा प्रत्येकाने पाळावयाचा धर्म आहे हे त्यानी जगाला पटवून दिले असें म्हणावयास प्रत्यवाय तो कसला।

# मानसिक क्रान्ति व दिव्यप्रतिज्ञा ● ● ● २

ज्या दिवसामुळे सत्यशोधक विचार प्रणालीची गावंगगा बहुजन समाजाच्या उद्धारार्थ वहावयास लागली, तो दिवस उगवला तेव्हा किती दिमाखान उगवला असल ! याचे शाब्दिक वर्णन काय करावयाचे ! कणाकणातून अणूरेणूतून क्रांतीचेच वास्तव्य ! पण ते होण्याचा आणि 'ज्योति' रुपाने बाह्यचक्षूना दिसावयाची मगल वेळ अगदी नजीक आली होती विधात्याने त्या दिवसाच्या उदयकालीच आपले सुस्वर उमटविले असतील. 'मी येणार' म्हणून विधात्यास देखिल आनंद झाला असेल ! ज्या घटनेमुळें ज्योतीरावाच्या अन्तःकरणात खरीखुरी 'ज्योती' पेटली ती घटना आज आपणास क्षुल्लक वाटत असली, पण त्या काळी तीच घटना महत्वाची आणि स्फोटक ठरली हा विधात्याचा खेळच नाही का ?

ब्राम्हण मित्राच्या लग्नाच्या मिरवणूकीत ज्योतिराव सर्व लोकांबरोबर जात होते वस्तुतः ते मित्राच्या आग्रहावरूनच आलेले पण काही जातीयवादी रूढी मार्तंड लोकांना ते सहन झाले नाही. 'हा अब्राम्हण आपणांत कोण ?' अशा तऱ्हेने ते आपसात कुजबुजावयास लागले "हा तो गोविंद फुल्याचा मुलगा ! मॅट्रीक झालाय ना ! नवरदेवाचा मित्र आहे तो !" एक पुटपुटला

" असेल ! म्हणून का त्यान आम्हा बरोबर मिरवावे ? शुद्रांचा आम्हास विटाळ होतो हे त्या शूद्रास ठाग नाही का ? दुसरे पडित म्हणाले

●

तर तिसरेच म्हणाले, " अरे बाबा ! आता इग्रजी आमदानीत या शुद्राना तर बराच भाव आलेला - - - - ते नोकरीत शिरा–

वयाला लागतील आणि आपण त्याची जागा घेउ ! फारच शहाणे लोक! कांही अक्कल आहे कीं नाही?" असे वाक्प्रहार कानीं येऊन ज्योतीरावाचे अन्तःकरण दुःखीत झाले ते खाली मान घालून चालत होते. तोच एक दुसरेच महापडीत त्याना म्हणाले " काय रे तू आमच्या बरोबर कसा येतो ? तू आमच्या मागाहून चार पावले दूर रहा तुझा आम्हास विटाळ होतो शुद्र तो शुद्र आणि आमच्या बरोबर मिरवितो! "

या मानभगामळे ज्योतिराव भाबावले, दुःखी झाले पण शुद्र कोण ? विटाळ कसा ? आदि विचारामुळे ते गुग झाले. हृदयातील दुःखाचे शारवन आपल्यापेक्षां श्रेष्ठ, ज्ञानीच करु शकतो, किंबहुना ममत्व दुःखाच निर्मूलन करुं शकत ज्योतिराव तडक आपल्या घरी परतले तो उदास, दुःखि, म्लान झालेला चेहरा पाहून गोविंदराव चमकलेच ! बागेत उमललेल फूल उन्हान एकाएकी करपाव आणि तेवढच फुल माळयाच आवडत असाव, अशा स्थितीतील यातना गोविंदरावाना झाल्या ज्योति बोलेना ! सर्वंभाव एकत्रित झाले ! चेहऱ्यावर जणू सर्व लिहिल्या गेले माणसाचे डोळे हे अत्यत बोलके असतात. डोळ्यात करुणा, वात्सल्य प्रीति, दुष्टता, दु ख आदि सर्व प्रगट होते नाही का ? ज्योतिरावाच्या डोळ्यात साठलेल दु ख गोविंदरावाना व्यथित करु लागल ज्योतिरावानी आपल सर्व दुःख आपल्या मातृवत पित्याला कथन केल ' बाबा ! तू परत आला एवढच पुरे झाल ! पेशवाईमध्यें या जवळच्या गुलटेकडी-वरून कित्येक निष्पाप, निरपराध शुद्रांना ! नव्हे मानवांना याच शिवा शिवीच्या विटाळाकरिता लाटून देण्यात येत असे या धर्ममार्तंडाना (!) अब्राह्मणाची सावली सुद्धां विटाळ करिते मग तूं तर त्याच्यात मिरवि-लास ! कुणाला दोष द्यावयाचा ? आपले दैव प्रबल म्हणून तू परत आलास ! आतां पुन्हा कधी त्याच्यात जाऊ नको, मिसळू नकोस

मानवतावाद प्रस्थापनेस सुरुवात करणाऱ्या महात्म्यास हें कसे पटणार ! डोळयातील दु.ख सपले, त्या जागी सताप निर्माण झाला क्रोधाने सर्वांग थरथरायला लागले ज्वाला पेटावी व ती

जवळून पाहाणाराला अधिक तेजस्वी व दाहक वाटावी त्याप्रमाणें ज्योतिराव गोविंदरावाना वाटलें 'काय अशा अधर्मिय माणसाबरोबर आम्हीच नमते घ्यावे ? अदबीनें आणि विनम्रतेने वागावयाचें ? ते कां अमुचें देव ? त्यानी वाटेल तेवढा आम्हांवर अन्याय करावा, छळावे आणि आम्ही निमूटपणे सहन करावं ? हा कुठला न्याय ? हा कुठला धर्म ? छे हे पटत नाही मी कुणाला असं भलतं सलतं पटवून घेऊ देणार नाही सर्व माणसं देवापासून आली, देवानं सर्वांनाच जन्माला घातलं मग अमुक श्रेष्ठ आणि अमुक कनिष्ठ असे कां? छें, ही परिस्थिती बदललीच पाहिजे त्याशिवाय तरणोपाय नाही'

ज्योतिरावामध्ये या वेळी हे मानसिक परिवर्तन झालं नव्हे 'ज्योति' खऱ्या अर्थानें 'पुराणमतवादाला' 'पुरोहितवादाला' जाळावयास पेटलेली मशाल वाटली या मशालीनें अख्ख्या महाराष्ट्रात प्रकाश पसरविला चैतन्य निर्माण झाले बहुजन समाज या ज्योति प्रकाशात जागृत झाला आणि आपले स्थान शोधवयाला लागला. ही घटना क्रांतीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची व परमकोटीची आहे.

या दृष्टीने पदक्षेप करावयाचा तर आपणास कोणत्या परिस्थितीस तोंड द्यावे लागेल ? कोणती तयारी करावी लागेल? काय केलं म्हणजे हे सामाजिक परिवर्तन घडेल? काय केलं म्हणजे महाराष्ट्राचाच नव्हे भारतातील मानवजात मानवी हक्काने नांदेल? यावर रात्रभर त्यानी मानसिक विचार केला, नव्हें त्या ज्ञान ज्योतिच्या दिव्य, मंगल, ईश्वरी साक्षात्काराच्या प्रकाशात संशोधन केलं याविना अिश्वरी साक्षात्कार तो कोणता? दिव्यत्वाचे स्फुरण म्हणजेच ईश्वरी साक्षात्कार! आणि तो ज्योतिरावाना अशा तऱ्हेने होऊन ते त्यानी मानव समाजाच्या उन्नतीस आपले तेज खर्च करण्याचें ठरविले

हिंदुधर्माचे कोणते सिद्धांत आहेत याकरितां त्यांनी बरीच पुस्तकें वाचली तुकाराम महाराजांची गाथा, ज्ञानेश्वरी, मार्टीन ल्युथरचे चरित्र एवढंच त्यानी या विषयावर जी पुस्तके हाताशी येतील ती ती

वाचून काढण्याचा उपक्रम चालविला. त्यांत त्याना पूर्णपणे कळून चुकले कीं, आज जे हिंदूधर्माचे स्वरुप आपल्या समोर दिसत आहे तसें ते पूर्वी नव्हते पण कांही स्वार्थान्धांनी आपले पोट भरावें, भिक्षुकी श्रेष्टत्व कायम रहावे. या प्रवृत्तीने हिंदूधर्मात आणि त्यातील देवदेवताच्या चरित्रात विकृती निर्माण केली आहे मूळात त्याचेच हे पापकर्म! पण आपले दुष्कृत्य लपविण्यासाठी दुसऱ्याला दोषी ठरवाव म्हणून धर्माचें नांवावर खापर फोडण्यात येतें अज्ञानाचा, धर्मभोळेपणाचा फायदा घेऊन आपले पोट येथेच्छ भरावे याच उद्देशाने हे होत आहे हा अन्याय आहे, अधर्म आहे खरा धर्म निराळाच! हे त्याना पूणपणे कळले पेशवाईमध्ये विशिष्ठ अशा एका वर्गालाच धर्म व व्यवहार यात प्राधान्य देण्यांत आल्यामूळे बाकीचा वर्ग अज्ञ राहिला, धर्मभोळा बनला ही स्थितीच इतराच्या गुलामगिरीला कारणीभूत आहे. हे त्याना पूर्णपणें उमगले ही पालटल्याशिवाय समाजास समाजातील घटकास स्थैर्य नाही, सुख नाही, शांतता नाही.

बहुजन समाजातील स्वाभिमान जागृत केल्याशिवाय या विशिष्टांचे वैशिष्टयाचा मुलामा नाहीसा करतां येणार नाही राजकीय बंडापूर्वी सामाजिक बंड उभारण्याची गरज आहे. सामाजिक परिवर्तन घडले नाही तर स्वातंत्र्य कुचकामी ठरेल स्वराज्य खरेखुरे सुराज्य होणार नाही प्रथम धार्मिक आणि सामाजिक परिवर्तनच आवश्यक आहे या दास्यातून मुक्त होण्यास म० फुले द्वाराच सुरुवात व्हावी, हा केवढा मोठा निसर्गाचा संकेत!

बहुजन समाजास साक्षर करून, सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करून मानाने माणसासारखे जगता यावें, या करितांच आपलें जीवन वेंचावयाचें, असा ज्योतिरावानी दृढ निश्चय केला, प्रतिज्ञा केली त्यावेळी त्यांचें वय केवळ २० वर्षांचे होते तें नुकतेच मॅट्रीक झाले होते. व त्याना मानाची अशी मामलेदाराची नोकरी चालून आली होती त्या काळी इंग्रजी ३ रा, ४ था वर्ग शिकलेल्यांना कारकूनाची क्वचित माम-लेदाराचीहि नोकरी मिळत असें मग महात्मा फुले तर मॅट्रीक झालेले,

त्यांना मामलेदारीची नोकरी न येती तरच नवल! ब्रिटीशाच्या आमदा-नीच्या सुरुवातीचा तो काळ होता. इंग्रजाना मुलकी व फौजदारी कामा करिता इंग्रज अधिकारी पगाराच्या मानाने परवडत नसत, म्हणून त्यांना थोड्या पगारावर भरपूर काम करणारे देशी नोकर नेमून त्यावर वरिष्ठ म्हणून इंग्रज अधिकारी नेमीत म० फुल्यांना मामलेदार होण्याचा योग चालून आला. हे पाहून गोविंदरावांना अत्यानंद होणे स्वाभाविक होते पण म० फुल्याच्या मनात धार्मिक व सामाजिक रचनेतील कटुता नाहीशी करून मानवतेला साजेशी धार्मिक व सामाजिक क्रांति करावयाची होती त्याविणा त्यांना शांतता लाभणारी नव्हती आणि हे कार्य व्हावयाचे झाले तर ते या अन्यधर्मियांच्या सत्तेतच होईल अन्यत्र होणें अशक्यप्रायच! कारण या पूर्वीच्या पेशवाई सत्तेत धर्माचें व समाजाचे रुप किती हिडीस झालें होते याची सत्य जाणीव इतरेजनांना होऊन चुकली होती. म०फुले-नी आमरण जनसेवा करण्याचे कंकण हाती बांधून घेतले त्यांनी गोविंद-रावांना सांगितले की, "बाबा, तुमचा जोतिबा मामलेदार होऊन इंग्रजाचा गुलाम होण्याकरिता शिकला नाही तर मानवास त्याचें जन्मसिद्ध हक्क संपादून देण्याकरिता जन्मला आहे नंतर त्यांनी नम्रतापूर्वक इंग्रज कले-क्टरांना नोकरी न करण्याचा निश्चय कळविला स्वतंत्र आयुष्याची सुरु-वात म० फुलेंनी नोकरी न करण्याच्या केलेल्या निश्चयाने आरंभ केला. जाणूनबुजून हे लोकसेवेचें कठोर व्रत घेतले. धन्य आहे त्या लोकप्रेमाची सत्यधर्म प्रेमाची!

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ५२२५६ दि: २१.११.७
क्रमांक ...९६०... नों. दि.

★ ★ ★

# स्त्री—शिक्षण ● ● ● ३

मानवा मानवा मधील विषमता नष्ठ व्हावी, दीन दलिताचे दु:ख दूर व्हावे, या ध्येयाच्या पूर्तिस्तव, अज्ञान दूर करणें हे प्रथम कर्तव्य आहे बहुजन समाजाच्या या अवनत अवस्थेला कारण 'अज्ञानच, होय हाच बहुजन समाजाचा शत्रु होय' ज्ञान द्वारा अखडपणें प्रवाहित करून त्याचा आस्वाद घेणारे नागरिक असणें हेच देशाच्या जीवतपणाचें प्रतीक होय पण या कार्याचा आरभ कसा करावयाचा या विवचनेत म० फुले पडले इतरेंजनांना ज्ञानार्जन करावयास लावल्याविणा त्याना हक्क सपादनाची सळमळ लागणार नाही शिक्षण क्षेत्रातून जातीयवादी यानीं बहिष्कृत केलेल्या बहुसख्य इतरेजनास ज्ञानलालसा नव्हती रुढीच्या सहवासाने त्याना आपली हीनता ही मानवी नसून ईश्वरीच आहे, असे अट्टल जातीयवाद्यानी ठरवून दिले होते त्यामुळे चालू स्थितीत बदल घडवून आणण्याचे धाडस सहसा कुणीच करीत नसे म० फुल्यानी प्रथम शाळा काढून लहानांना शिक्षणानें सस्कारीत करावयाचें ठरविले तेवढ्या करिता त्यानी पुण्यात घरोघरी शिक्षणाचे महत्व पटवून देण्यास सुरुवात केली. लोकाना म० फुल्याचे भाषण ऐकून नवल वाटू लागले. तर कुणी म० फुल्याना शिकल्यामुळे वेड लागले, डोकें फिरून गेले असें म्हणू लागले कारण शिकलेले सरकारी नोकरीत मजा करीत होते थोर अधिकाराच्या जागा मिळवून विपूल धन कमाबित होते, साहेब म्हणवून घेंत होते आणि म० फुले वणवणा लोकाच्या दारी लोक कल्याणाकरिता 'शाळेत मुलांना पाठवा,' हा बोध करीत हिंडत होते

मनुष्य हा स्वत च्या भविष्याचा विधाता असतो, असे म्हटल्यास वावगे होणार नाही म० फुल्यांनी निश्चय करून अनेकाच्या

मनात शिक्षणाविषयी सद्भाव निर्माण करण्यात यश मिळविले व अनेकांच्या शाब्दिक सहानुभूतिपर शाळा स्थापन करुन सत्यशोधन कार्याच्या श्रीगणेशाला आरंभ तर केला शिक्षणाचे संस्कार न झालेल्या मातापित्याना आपल्या मुलास शाळेत पाठविणें जीवावर येऊ लागले कारण मुलाकडूनहि संसारोपयोगी काही कामें व काहीना मोल मजूरी करवून घेण्यात येत असें तो आता या शाळेमुळ जवळ जवळ बंद झाली मुलानाहि शाळेत जाणे अवघड वाटू लागले त्याना शाळा म्हणजे कोंडवाडा वाटे या सर्व विरोधातून ज्ञान–दान करणे दैनंदिन जड होऊ लागले बरे! हे कार्य बायामुलीं करिताहि करणे अगत्याचि होते. त्याशिवाय कार्यास अंशत: का होईना पूर्णत्व येणें शक्य नव्हते

बायामुलीच्या शिक्षणाचा प्रश्न तर फारच अडीअडचणीचा व विरोधकांना प्रखर विरोध झाल्याशिवाय न राहणारा प्रश्न! पण म० फुले कार्यात येणाऱ्या अडचणीना नमणारे नव्हते. त्यानी विचार पूर्वक याहि कार्याची पाऊले टाकावयास सुरुवात केली या कामी त्यांनी आपल्या गृहदेवतेसच आवाहन करून कार्यान्वित केले. स्त्री शिक्षणाविना राष्ट्र बलवान होणार नाही, स्त्री हीच आपल्या अपत्याची शिक्षिका, गुरु आहे. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी। तीच जगाते उद्धारी' पण हे काव्य सत्यसृष्टींत उतरवितांना म० फुल्याना किती श्रम किती विरोधाला तोंड द्यावे लागले असेल याची नुसती कल्पनाहि करवत नाही कारण धार्मिकानी स्त्रीयाची योग्यता पुरुषाच्या सेविके पलिकडे जाऊच दिली नव्हती स्त्री फसविणारी, कपटी, अविचारी, संशयी, कलहप्रिय इ० स्त्रियांचे रसभरीत वर्णनें करण्यात येत असत म० फुले यानी मुलींची शाळा काढावयाचे जाहीर करताच पेशवाईतील धर्माची आधारस्तंभाचा वारसा गाजविणाऱ्या कांही धर्ममुवानी विरोधी ओरड करावयास कसून सुरुवात केली त्याच्या प्रचारतंत्राचा मासला असा होता! 'झाल, आता बायका शिकू लागल्या, त्या नोकऱ्या करू लागतील आणि पुरुषाच्या कपाळी

पोळीपाट व लाटणे, याची जाहागिरी येईल ! स्त्री ही नवऱ्याची पत्नी न होता पतीस पत्नीला पती समजून आपण, जात पुरुषाची पण कार्य स्त्रीचे करील, असा ठिकठिकाणी 'शरव दष्मौ पृथक पृथक' सुरु झाला. धर्मांच्या नांवाखाली स्वातंत्र्य व स्त्रीयाचा अर्थाअर्थी काही संबध नाही 'पिता रक्षति कौमार्ये, पति रक्षति यौवने, पुत्र रक्षति वार्धक्ये, न स्त्री स्वातंत्र्य मर्हति ॥ अशी स्वमतपुष्ठयर्थ मते प्रसारीत करून, पतीच्या सेवेची आचार संहिता कीर्तने व पुराणातन स्त्रीयांच्या मनावर ठसविण्या चें अव्याहत प्रयत्न चालू होते. स्त्री म्हणजे एक भोग्य वस्तू, या पलिकडे पुरुषी नजर जाऊच शकत नव्हती. 'यत्रनार्यस्तु पुजन्तें, रमन्ते तत्र देवता' ही सुभाषिते केवळ करमणूकी करिताच म्हणण्यात येत असत. एरव्ही व्यवहारात 'पायीची वहाण पायी बरी !' याच धर्माची ठेवण होती स्त्रीनें नटावे, मुरडावे, सुंदर दिसावे, कशाकरता तर पुरुषाना खूष करण्याकरितां ? स्त्रीला स्वत.ची मते नसतात, तिला मानाने जगावयाचें झाले तर तिनें पुरुषाच्या मर्जीबाहेर वागून चालावयाचे नाही तिच्याशी अकारण भांडावयाचा हक्क पतिचा ! पतीच्या तोंडास तोंड देते ती कुलटा, पतीचाभार व तोहि अकारण, पण स्त्रीनें मुकाट्याने सहन करावयास पाहिजे बार खातांना अडविणारी कजाग ! इत्यादि शेलकी विशेषणाची पुष्पांजली, तिच्या आईबापाच्या उद्धारासह तीला निमूटपणे ऐकावी लागत निदान महाराष्ट्रात तरी वर्तमान काली जें स्त्रीशिक्षणा-सम्बधी परिवर्तन झालेले दिसते आहे. ती ज्ञानगंगा म. फुले यांच्या भगीरथ प्रयत्नानें पुण्यात कुणाच्याहि विरोधाला न जुमानता उगम पावून आज ती विशाल रूपानें वाहत आहे, आणि दिवसेंदिवस तिचा प्रवाह वाढतच जाणार ! म फुले यानी स्त्रीयाना ज्ञानदान देण्याचे महान कार्य करून मातृऋणाची अल्पांशानें फेड केली स्त्रीयाचा महाराष्ट्रा-तील पहिला कैवारी म्हणून व अन्य प्रांताचा मार्गदर्शक म्हणून कोणताहि सुजाण सुशिक्षित या महात्म्याला मनोभावे वदन केल्याशिवाय राहणार नाही

स्त्रीयानी 'सितेचा' आदर्श पाळलाच पाहिजे पण पुरुषानी मात्र 'रामाचा' आदर्श पाळावयाला नको हीच स्थिती त्यावेळेस होती या स्थितीला पालटून मानवतेची बीजे रुजवावयची, हे लहानसहान कार्य नव्हे ! त्याकरिता स्त्रीयांत जागृति व्हावयाला पाहिजे आणि ती शिक्षणानेच होईल हा त्याचा विश्वास ! एकाच समाजातील व तोहि फक्त पुरुषवर्गानेंच शिक्षणाचा अधिकार बळकावून बसाव ह्या शल्यानें ज्योतिराव दुःखित झाले, या दुःखातूनच सन १८४८ साली पुण्यात मुलीची शाळा काढण्याचे पहिले धाडस ज्योतिरावानी केले. स्त्रीशिक्षणाचा आद्यप्रणेता, आद्यपुरस्कर्ता, आद्यजनक जर कुणी असेल, तर ते ज्योतिराव ! आज या गोष्टीला विसरून नव्हे, टाकून याचें श्रेय भलत्याच्याच पदरांत टाकण्यांत येत आहे वास्तविक पाहतां भारत सरकारने अत्यत मागासलेल्या स्थितीत देश असताना धार्मिक व सामाजिक सुधारणा करण्याचे कार्य जीवापाड मेहनतीने केले व त्याकरिता अनत दुःख व हालअपेष्टा सहन केल्या. या ज्योतिराव फुल्यांच्या राष्ट्रीय कार्याचा गौरव, समाजसुधारणा या विषयांतील सर्वोच्चोत्तम पदवी त्याचे नावे जाहीर करून करावयास पाहिजे अशा तऱ्हेनें गौरव केल्यास त्यांत म० फुल्यांच्यापेक्षा भारत सरकारच्या गुणग्राहकतेचाच गौरव होणार आहे पण हे होणार कसे ? पण, परन्तु याची कारणपरपरा, दिल्लीच्या तख्ता भोवतीहि पहारा दिल्याशिवाय राहणार नाही किंवा राहिले नसतील !

सन १८४८ मध्यें बुधवार पेठेंत भिड्याच्या वाड्यात प्रथम मुलींची शाळा सुरु केली. शाळेत मुलींना पाठवावयास कुणी तयार होईना. म० फुले घरोघरी जाऊ लागले, लोकाना मुलींच्या शिक्षणाची आवश्यकता पटवून देऊ लागले त्याचे मत अनुकूल करू लागले मोठ्या प्रयत्नाने व अतिशय परिश्रमानें त्यानी शाळेत मुलींची सख्या वाढविली आता स्वत कडून काम होईनासे झाले स्त्री शिक्षणाचा प्रथम ओनामा यानी आपल्या पत्नीस दिला होता या कार्यार्थ सावित्रीबाईचे जर आपणास सहकार्य लाभले तर फारच मोठा प्रश्न सुटेल ! आपले कार्य

सुलभ होईल असे विचार ज्योतिरावांच्या मनात आले सावित्रीबाई शिवाय दुसरे कोण बरे या कार्यास मदतनीस मिळेल. कनिष्ठ वर्ग तर शैक्षणिक कार्यात मागासलेला आणि वरिष्ठ वर्ग तर आपल्या मात्यापित्याना स्मरून म० फुल्याच्या स्त्री शिक्षणाच्या कार्यास दडथोपटून विरोधात उभे राहिलेला, तशातून अेखादा कार्यवाहक मिळालाच तर या पेशव्याच्या पुण्यनगरीतील विशिष्ठ पुण्यवान त्याला टिकू देणार नाहीत म्हणून सावित्रीबाईंना शिक्षिका म्हणून नेमावयाचे ठरविले

सावित्रीबाई शाळेत जाऊ लागल्या व घरीहि घरची कामेधामे आटोपून म० फुले त्यांना पाठ देऊ लागले पतिदेवच शिक्षक मिळाल्यावर कोणती सुजाण पत्नी खऱ्या अर्थाने विद्यार्थीनी होऊन विद्यार्जन करणार नाही, यश मिळविणार नाही. दिवसेंदिवस प्रगतीच होत होती व या घटनेला अदाजे तीन वर्षांचा काल जाऊन शाळेची उत्तम प्रकारे भरभराट होउन राहिली असतां पुण्यातील पूर्वजाच्या पुण्याईचें वारस–दारांनी आपल्या नेहमीच्या सवयी प्रमाणें विरोधाचे नगारे बडविण्यास सुरुवात केलीच ! म० फुले हे विरोधाच्या खतानेच कार्याचे रोपटे चागले अकुरीत होते असे मानीत सौ सावित्रीबाईचे शिक्षण दुसऱ्याला शिकविण्या इतके तर झाले, आतां त्या फुरसतीच्या वेळी शिकायच्या व ठराविक वेळेला शाळेत जाऊन मुलींना शिकवावयाचे काम करू लागल्या

मुलींची पहिली शाळा १९ व्या शतकात स्थापन करण्याचा पहिला मान म० फुलें यांचाच व यानतर १८५१ मध्ये अस्पृश्याकरीतां स्वतत्र शाळा काढली याहि शाळेत वेळातवेळ काढून सावित्रीबाईंना जावे लागले ! मस्तक अस्पृश्याच्या शाळेच्या पित्तानें प्रकुपित झाले त्यानी हर उपायानी ही शाळा बद पाडण्याचा चग बाधला अर्थात या पुण्यकार्यात उदार मत वाद्यानी मळीच भाग घेतला नाही पण जे परान्नपुष्ट व खऱ्या धर्माची शास्त्राची ओळख नसता केवळ पोकळ धर्माभिमानी, कपाळी लावलेल्या

दक्षिणोत्तर गधाची, तशीच घेरेदार शेंडीच्या लाबीरुदीवर धर्माला खबीर साह्य देण्याचा प्रयत्न करीत होते अशा वाचा विराचाच भरणा अधिक होता असे वाटते

या धर्ममूर्तिचा अड्डा बुधवार पेठेतील ( आज जेथे फरासखाना आहे) वडाच्या बुध्याशी असलेल्या पेशवाई ओटयावर भरत असे पुण्यात पूर्वी दाढी करवून घेणारास, न्हाव्याला बोलावण्याकरिता "खुटावर" जावे लागत असे. खुटावर म्हणजे चौरस्त्यावर न्हावी गिऱ्हाईकाची वाट पहात असत. सौ. सावित्रीबाईचा अस्पृश्याच्या शाळेत जाण्याचा मार्ग या वटवृक्षासमोरूनच होता. सौ. सावित्रीबाईना शाळेत जाऊ देऊ नये म्हणून या मडळींनी सौ. सावित्रीबाईचें जे श्वसूर गोविंदराव याना आपल्या मताचे करून घेण्याचा प्रयत्न केला. कारण गोविंदरावाना एकदा का हे पटले की ते आपल्या सासरेपणाच्या अधिकारात सौ सावित्रीबाईचे अस्पृश्याचे शाळेत शिकविण्याकरिता जाणें बद करतील. नाहीपेक्षा आज्ञाभगाचे शासन म्हणून 'घरातून बाहेर व्हा' ! हा शेंवटचा 'व्हेटो' वापरतील घर सोडण्याचा प्रसग आला की म० फुले याच्या सर्व चळवळी आपोआप बद पडतील कारण बाप कमाईवर खुशाल चेंडूसारखे ज्याला रहावयास मिळते तोंच नसते थेर उभारून उपद्व्याप करीत असतो एकदा पोटाला चिमटा बसू लागला की आपोआप नोकरी चाकरी शोधून 'आपणास आपले घर भले' या कार्यक्रमाचें वळण लागेल या सकेताप्रमाणे हे (अ)धर्माभिमानी मडळातील काही सदस्य दर्शनी धर्माच्या ठोकळ खुणा अगी व पोषाखी धारण करून गोविंदरावाकडे येते झाले

गोविंदरावानी गृहस्थधर्माला अनुसरून त्याचे आदरातिथ्य केले व येण्याचें कारणाची चौकशी केली आलेल्यापैकी गण प्रमुख मुखडानी प्रथम कृत, त्रेता, द्वापार या युगाचे वर्णन केले व मग चालू काल हा कलीचा असल्यानें धर्मास ग्लानी आली, धर्मलय होत आहे. इत्यादि

दळण दळले गोविंदरावाचा स्वभाव पापभिरू व धर्मभोळा होता त्यांना हे सर्व पटले. त्यानी या मंडळीचें बुडु पाहणाऱ्या धर्माबद्दल सांत्वन करण्या करिता जे काही होते तें सारे त्या प्रभूच्या इच्छेनेच होते, मग त्याची रिकामी हळहळ करुन काय करावयाचें ? हे प्रभू इच्छेचे अस्त्र हीच मंडळी अंगावर येऊ पाहणाऱ्या मुद्याच्या वेळी मांडीत तेंच अस्त्र जसेच्या तसे त्यांच्यावरच सोडल्यानें त्याच्या तोंडचे प्रथम पाणीच पळाले. पण पुन्हा अवसान धरून त्यांनी 'सध्याच्या बायका कशा वागू लागल्या आहेत पेशवाईत असे त्याचे थेर चालले नसते आता बायका शिकून अस्पृश्याना शिकवू लागल्या तर अधर्म माजेल की नाही ? परमेश्वराची इच्छा त्यांनी शाळेंत जावे शिकावे, शिकवावे अशी असती तर त्यांना पुरुषाप्रमाणें मिशा नसत्या कां दिल्या ?' काय पण रामबाण उपाय योजिला असे वाटून सर्वधर्मरक्षक पोट धरधरून हसू लागली गोविंदराव या सरबत्तीनें गोंधळून गेले. व त्यानी प्रश्न केला की, 'मी बुडत्या धर्माला सावरण्या करता काय कराव म्हणतां ?' तत्काल एकानें अधिकार वाणीनें सांगितले कीं 'आपल्या ४२ पिढ्या जर नरकात जाऊ नयेत असे वाटत असेल तर म० ज्योतिबाच्या बायकोला, सुनेला शाळेत मुलीना शिकविण्या स जाऊ देऊ नका ! गोविंदरावानी धर्माच्या भीतिमुळें सुनेला अस्पृश्याचे शाळेंत जाऊ न देण्याचे मान्य केले झाले ! सर्वांचे समाधान ! सर्व जण आपली मोहीम यशस्वी झाल्याचे समाधानात घरोघरी जाऊन आपल्या विजयाची वार्ता घरातील स्त्री वर्गास अद्यतेने सांगू लागली 'आतां सौ. सावित्रीबाई शाळेंत जाणार नाहीत त्या शाळेंत गेल्या नाहीत म्हणजे मुलींना व अस्पृश्यांना शिकविण्याकरता दुसरा कोणी मिळणार नाही ! आणि मग शिक्षकाविना शाळा चालणार नाही' असे त्रैराशिक त्यानी सोडवून दुसरें दिवशी आपल्या ठराविक वटवृक्षाखाली धर्माच्या सोज्वळ नावाखाली गावातील घाण उपसित बसले.

इकडे रात्री जनसेवेचे काम आटोपून म० फुले घरी येताच गोविंदरावानी म० फुले याना स्त्रीयांनी शिकणें व शिकविणें कसे अधर्माचे

आहे ते धर्म मंडळींनी चर्चिल्या प्रमाणें सांगून शेवटी परमेश्वरी ईच्छा स्त्रीयांनी पुरुषाप्रमाणें शिकावे असे असते तर स्त्रीयांना मिशा नसल्या कां दिल्या ? म० फुलेंना आपल्या भोळ्या वडीलांना अशा युक्तिवादाने स्त्रीशिक्षणाविरोधी करण्याचे कार्य करणाऱ्या धर्ममूर्तिच्या धर्मशाना॰ संबधी व स्त्री वर्गाच्या उन्नतीस अडथळा करणाऱ्या बुद्धिची मनस्वी कींव आली.

स्त्रीच्या पोटी जन्म देणाऱ्यानीच स्त्रीयांसंबधीं अनादरान बोलाव, वागाव याचा महात्मा फुल्याना विषाद वाटला हे जरी सर्व खर असल तरी गोविंदरावाच समाधान करुन त्यांच्या मनांतील स्त्री शिक्षणाचा विरोध कसा घालवावयाचा ? याचा ते विचार करु लागले व त्यानी स्त्रीया आणि मिशा यासंबधी मोठ्या सावधगिरीनें असा प्रति युक्तिवाद केला असेल ! ब्रिटीश सत्तेपूर्वी मिशांची मशागत उत्तम* प्रकारे करण्यात येत असें पण ब्रिटीश सत्ता आल्यापासून शिकलेल्यात बरेच जण इंग्रजी अनुकरण करण्यांत धन्यता मानु लागले होते त्यामुळें बरेच जण दाढीसह मिशाहि काढू लागले होते व निर्मिशित्व पुणेकरांच्या लवकरच अंगवळणी पडू लागल्याचे रस्तोरस्ती दिसू लागले होते, हे ध्यानी घेऊनच म्हणावेसे वाटते की, परमेश्वरानें स्त्रीयाना मिशा न दिल्याची केलेली चूक आतां बराच पुरुषवर्ग सुधारीत आहे.

म० ज्योतिबांनी परोपरीनें आपल्या पित्याचे मत बदलवि- ण्याचा प्रयत्न केला. पण ! गोविंदरावाचें सूनेने शाळेत जावे हे पटेना. शेवटी आपल्या पित्यास आपल्या वागणूकीने यापुढें त्रासच होणार असे वाटून म० ज्योतिबांनी मोठ्या दुःखाने पित्याला नम्रभावें सुचविले कीं, 'मग बाबा ! आपणाला त्रास न व्हावा म्हणून आम्ही दोघानीहि आपल्या पासून दूरच राहिलेले बरे ! गोविंदरावाच्या वर्मि या ज्योति- बाच्या शब्दानी जखम केली पण, त्यांनी ती दाखविली मात्र नाही ४-२ दिवसानी ज्योतिबा परत येईल असें वाटून त्यानी मौन धरले. आणि मौनत्व म्हणजेंच सम्मती! असे गृहित धरुन दुसरें दिवशीच्या प्रभातकाली

नेसल्या वस्त्रानिशी, फक्त जनसेवेच्या साहित्याचा गठ्ठा डोक्यावर घेऊन, दीनजनाचा उध्दारक, सत्धर्माचा द्रष्टा स्वत च्येहर्वकांचे घर सोडून बाहेर पडला घर सोडताना ज्यांनी आपल्या प्रेमळतेनें मातेची आठवण येऊ दिली नाही त्या प्रेममूर्ति वडीलांच्या गोविंदरावें पायावर डोके ठेऊन 'बाबा ! तुमचा ज्योति आज तुमच्या पासून दूर जात आहे आपली कृपादृष्टी ज्योतिवर सदैवच राहील ! आपला रागहि ज्योतिचे कल्याण करील ! आशिर्वाद द्यावा. सौ. सावित्रीबाईनीहि गोविंदरावाचे पाय धरुन 'मामाजी येते ह ! आम्हाला क्षमा करा !' झाले सर्वांचे कठ भरून आले भरलेले हृदय डोळयावाटे जोराने पाझरू लागले गोविंदरावानी मौन सोडले नाही पण त्याच्या धैर्याचा बांध फुटण्याच्या बेतात आला होता गोविंदरावानी अन्त·करणपूर्वक म० ज्योतिबाना मूक आशिर्वाद दिला. म० ज्योतिबा सौ० सावित्रीबाईसह घराबाहेर पडले नुकताच सूर्योदय झाला होता ज्या वेळी सूर्यनारायण प्रेमाचा लाल गुलाल गाली फुलवून आलेल्या अुषेला बरोबर घेऊन आनदानें पृथ्वीरुपी सत्तेच्या घरी आला त्याचवेळी म० ज्योतिबाकडे आपल्या सहधर्मणीसह घरची सत्ता सोडून, सत्तेच्या घरी जाण्यास निघाले 'विश्व हेंचि माझे घर। ऐशी मती जयाची स्थिर। किंबहुना चराचर। आपण जाहला! ' ज्ञानदेवाच्या या सूत्राची आठवण या प्रसगी झाल्या-शिवाय राहत नाही

ध्येय सिद्धतेच्या आड येणारी बंधनें साधकाला अशीच निरुपायाने तोडावी लागतात. श्री तुकारामानी अेके ठिकाणी असेंच सांगितले आहे कीं, "प्रल्हादे जनक। बिभीषणे बध ! राजमाता त्यागू ! भरते केली ॥' गृहत्यागाचे दु ख म० ज्योतिबाना जाणवले नाही पण ! पितृवियोगाचे दु खानें म० ज्योतिबांचे हृदय भरून गेले कुणी असाहि प्रश्न करतील की, त्यानी आपल्या पित्याकरिता स्त्री शिक्षणाचा प्रश्न सोडून द्यावयाचा होता ज्या अर्थी ज्योतिबांनीं असे केले नाही त्याअर्थी ते कठोर वृत्तीचें असावेत असा आरोप करतील वरवर विचार करणाऱ्याला या आरोपांत काही

तथ्य भासेल पण, म० ज्योतिबाच्या हृदयाची घडण त्याच्या जनकल्या-णाच्या तळमळी वरूनच उघड होते. ते जर कठोर असते तर इतरेजनाच्या स्थितिचे गांभीर्य पटल्यामुळेच ना त्यांनी स्वार्थ त्यागपूर्वक जनसेवेचे व्रत घेतले? अशिक्षितांना शिक्षित करण्याकरिता त्याचे हक्क त्यांना उपभोगा-वयास मिळावेत म्हणूनच ना म० ज्योतिबा अहोरात्र खपले? या महत् कार्यावरून त्यांना 'दयासागर' ही उपमा अपुरी पडते मग पित्याचा त्याग केला हा प्रश्न उरतोच?

या प्रश्नाचें उत्तर हेच की, त्यांच्या या दर्शनी कठोर वाटणाऱ्या वृत्तीनेच या विसाव्या! विसाव्याच कां जगाच्या अंतापर्यंत त्यांनी घडविलेल्या कार्यरुपी कीर्तिमंदिर आद्य क्रांतीकारक म० ज्योतिबा गोविंदराव फुले यांनी बांधले ही स्मृती अमर चिरतनीय राहील म० ज्योतिबांनी पित्याचा कार्याकरिता त्याग केला हे खरे! परन्तु त्यांचे पित्यावरील प्रेम रेसभरहि कमी झाले नाही! कर्तव्यरत सुजनांचे हृदय 'कुसुमादपि, कठोरानी,' असेच असते श्री तुकाराम महाराजांनी 'मऊ मेणाहुनि आम्ही विष्णुदास । कठीण वज्रास भेदू ऐसे ॥' असेच म्हटले आहे

गतेतिहासात छत्रपति शिवरायावर असाच प्रसंग आला होता शहाजीराजांनी, स्वराज्य कार्य आरंभून विजापूरकराच्या रोषास पात्र झालेल्या आपल्या पुत्रास शिवरायास 'पिता की स्वराज्य' हा पेच घातला स्वराज्य पाहिजे असेल तर पित्याचा त्याग करावा लागेल आणि जर पिता पाहिजे असेल तर स्वराज्य कार्याचा त्याग करावा लागेल छत्रपति शिवरायांनी निर्धारपूर्वक स्वराज्य कार्याकरिता, पित्याचा, राजे शहाजीचा आनंदाने त्याग केला. असे जर शिवरायं करते ना तर स्वराज्य-कार्य सिद्धिस गेले असते का?

म० ज्योतिबा घर सोडून बाहेर पडल्याचे वर्तमान गंजपेठेतील त्यांच्या कांही सहकाऱ्याच्या कानी जाताच ते सहकारी धांवत आले व त्यांनी म० ज्योतिबांच्या डोक्यावरुन कागदपत्रांचा गठ्ठा आपल्याजवळ

घेतला. ज्योतिबाच्या मुखावर समाधान विलसत होते कारण आपल्या सहवासानें पित्याच्या अंतःकरणाला त्रास आता होणार नाही हेच त्यांच्या समाधानाचें कारण होय.

म० ज्योतिबाना राहण्याकरता सोयीस्कर असे घर तावडतोब कोठून मिळणार ? कारण त्यांच्या सहकाऱ्यात मुख्य कष्टकरी गरीबांचाच अधिक भरणा होता आणि म० ज्योतिबाना त्यांच्या मेळाव्यात राहूनच कार्य करावयाचें होते. या कष्टकऱ्यांची घरें, घरें कसली ! कसे बसे अुभारलेले आडोसे होते तेथे त्यांची सोय होणे दुरापास्तच ! म० ज्योतिबांनी यावर तोड काढली कारण या राहण्याच्या पचायतीत अधिक वेळ गेल्यास नेमल्यावेळी शाळेंत कसें जाता येईल ? ही चिंता त्यांना वाटत होती म्हणून त्यांनी आपल्या सहकाऱ्याकडून ५–६ बासडे व १–२ घोंगड्या आणवल्या व रस्त्याच्या कडेला अेका लिंबाच्या झाडाखाली पाल ठोकून ४–२ मडकी आणवून, अेक तवा व थोड्याशा काटक्या जमा करून, पीठ, मीठ, दाळदाणा आणवून नव्या संसाराची मांडणी केली ही मांडणी चालू असतांनाच सौ०सावित्रीबाईंनी एकाकडून हलक्या किंमतीचे लुगडे आणवून घेतले सौ० सावित्रीबाईने जवळच्या एका झोपडीत जाऊन स्नान आटोपले व भोजनाच्या तयारी (पाकसिद्धता इ) करितां पालांत आल्या. त्यांनी उपलब्ध असलेल्या साहित्यांत स्वयपाक तर केला घाई–गर्दीत म० ज्योतिबांनी उघड्यावरच स्नान आटोपलें व भोजनास बसले. वडाच्या पानाच्या पत्रावळीवर तेल, तिखट, कांदा या बरोबर भाकरी खातांना म० ज्योतिबांच्या मनात भावी कार्याच्या व्याप्ती संबधीचा विचार चालू होता भोजन आटोपून कामाची कागदपत्रे घेऊन सौ० सावित्रीबाईना मुलींच्या शाळेंत लवकर जाण्याचें सांगून तें आपल्या कार्य क्षेत्राकडे जाते झाले काही सहकाऱ्यांच्या बायकामुलांच्या डोळ्यांतून सारखें पाणी येत होते सौ० सावित्रीबाईंनी कसेबसें दोन घास खाऊन त्याहि झटदिशी शाळेत जाण्याकरितां निघाल्या जातांना त्यांना आजू–बाजूच्या शेजाऱ्यांना झोपडीवर लक्ष ठेवावयास सांगितले व त्या शेजा–

त्यांनीहि आदराने 'काही काळजी करू नका' असा त्याना विश्वास दिला सौ सावित्रीबाई शाळेला जात असता त्या वडाच्या झाडा जवळून जाऊ लागल्या सौ. सावित्रीबाईना पाहताच वडाखालचे टोळके खूपच चकीत झाले. हे कसे झाले ? याचा त्यांना बोधच होईना आपण एवढा धर्माच्या नांवाने गोविंदरावाच्या मनांत बार भरला तो फुसकाच ठरला म्हणावयाचा !

पण हे धर्ममूर्ति एवढ्यानें थोडेच 'किंकर्तव्यमूढ' होणारे होते? त्यांनी सौ. सावित्रीबाईना जवळ येताच आपल्या सुप्रसिद्ध फाल्गुनमासी मर्कट-लीला सुरु केल्या. कोणी, 'अरें कुणाची रे टवळी कुणाला भेटायला चालली आहे ? तर दुसऱ्याने "अरें ही गाव भवानी आहे वाटत ?" असा एकना दोन आचकटविचकट शब्दांचा मारा सौ सावित्रीबाईवर सुरु केला. बिचाऱ्या सावित्रीबाई धाबरून गेल्या या टवाळखोराच्या अश्लील कोटचानी व विकृत हसण्यानी येणारें जाणारेहि सामील होत सौ सावित्रीबाईनी म० फुले यांचे स्मरण करून खाली मान घालून चालणे सुरुच ठेवले. कबीरांनी म्हटले आहेना 'हाथी चले अपने गतसे, कुत्तर भुंकत वाको भुंकवा दे" हेंच ध्येयवाद्याचे ब्रीद असतें

सौ० सावित्रीबाईना हा या कुटाळाचा त्रास देनदीन वाढूच लागला पण मनात सांगावे असे असूनहि म० फुल्याना हा त्रास सागवेना! आपले सौभाग्य केवढ्या महान कार्याचे परिश्रमात आहे त्यात आपण आपल्याला कुटाळापासून होणाऱ्या त्रासाची माहिती देवून त्यांचेवर नवीन जबाबदा-रींचें ओझे टाकण्याचा त्यांना धीरच होईना ! सौ० सावित्रीबाईंची आपण टवाळी करतो पण आपणास कुणीहि 'असे का करतो' किंवा 'असे करू नका' असे सांगण्याकरिता आले नाही असे पाहून कुटाळ कपनीला, कुटाळपणाचे चाळे करण्यास अधिकच अवसान चढले

आपण गलीच्छ शब्दाचा मारा करतो तरी ही सौ० सावित्रीबाई त्याची दखल न घेता शाळेंत निर्धास्तपणे जाणे येणे करते हे पाहून कुटाळ

कपूतील अग्रेसर असणाऱ्या अेकानें एके दिवशी तोंडात पाणी घेऊन ती चूळ सौ० सावित्रीबाईच्या अंगावर फेकली. एक क्षणभरच सौ० सावित्रीबाईनी आपल्या पावित्र्यसंपन्न तेजानें डोळे विस्फारीत करुन त्याकडे पाहताच कुटाळाचे धाबे दणाणले पण काय म्हणतात ना ! ' कोडग्या लाज नाही व कालचें बोलणें आज नाही" या कुटाळाची रीत अशीच होती. अेके दिवशी अेकाने सौ० सावित्रीबाईना आडवे जाऊन बजावून सांगितले की, ए बाई ! आता उद्या जर या रस्त्याने शाळेत जाशील तर तुझी भररस्त्यात बेअब्रु केल्याशिवाय आम्ही राहणार नाही या धमकीचा परिणाम मात्र सावित्रीबाईच्या मनावर झाल्याविना राहिला नाही. शाळेत अेऊन शिकवित होत्या, पण ! आज त्या बेचैन होत्या मनातल्या मनांत उद्यापासून शाळेत न येण्याचा निश्चय केला तेव्हा त्याना जरा बरें वाटू लागले शाळा सुटल्यावर त्या आल्यारस्त्याने घरी परतल्या.

नेहमीप्रमाणें घरातील कामेधामे व आजूबाजूच्या मुलींना अेके ठिकाणी जमवून थोडावेळ पाठ देउन अभ्यास करावयास लावणें हेहि आटोपले. त्या परत घरी आल्या रोज काय केले व उद्या काय करावयाचे त्याची चर्चा म० ज्योतिराव आपल्या सहकाऱ्याशी करीत त्या चर्चा कान देऊन सौ सावित्रीबाई ऐकत व मनन करीत. म० ज्योतिरावाच्या हे लक्षांत असें, पण आज सावित्रीबाई अेकत बसलेल्या नव्हत्या याचे ज्योतिबाना नवल वाटले. दुसरा दिवस उगवला. नित्याप्रमाणे कामे सुरु झाली शाळेत जावयाची वेळहि झाली म० ज्योतिराव जेवण आटोपून शाळेत जाण्याकरितां निघाले व त्यानी सावित्रीबाईकडे पाहिले. तों त्या सथपणें स्वयपाकाची आवरा सावर करित आहेत आता मात्र न राहवून म० ज्योतिरावांनी सौ सावित्रीबाईना विचारलें कीं, कां ? आज शाळेत जाण्याचा विचार नाही वाटत ! हा प्रश्न अेकतांच सौ सावित्रीबाईचे मुख गोरे-मोरे होऊन डोळे पाण्याने डबडबून आले, हे पहाताच काही विशष प्रकार असावा हे लक्षात येऊन चटकन म० ज्योतिराव त्याचे जवळ गेले त्याचे पाठीवर हात ठेऊन प्रेमानें, न

जाण्याचे कारण सांगण्याकरिता समजूत करू लागले सौ. सावित्री-बाईचा कंठ दाटून आला, कसं सांगावं ? हें अेकून स्वारीला किती राग येईल ! काय करावं हे सुचेना. म० ज्योतिराव मात्र कारण कळल्या-शिवाय मी देखील जात नाही असे निश्चयाने म्हणाले त्या वेळी साध्वी सावित्रीबाईनी कुटाळलोकाचा आजवर होत असलेला त्रास, व विटंबना थोडक्यांत सांगितली. आपल्या सुशील पत्नीला किती मानसिक यातना भोगाव्या लागल्या याची जाणीव व कुटाळाच्या चाळ्याची पूर्ण कल्पना म० ज्योतिरावाना आली. म० ज्योतिरावांच मन शांत होत. हे वर्तमान अेकून विलक्षण खळबळ माजेल ही जी कल्पना सावित्रीबाईंनी केली होती तसे कांहींच घडून आले नाही.

म० ज्योतिबा हे पूर्व पवित्र आर्यऋषिंच्या सद् विचाराचाराचा मूर्तिमत ठेवा ! तेथे क्रोधाचा प्रवेश होईलच कसा ? प्रेमात क्रोधापेक्षाहि शासन करण्याचे सामर्थ्य असते अविचाऱ्याना प्रेमाची जाणीव नसते. म्हणनच ते क्रोधाने अंध होऊन क्रोधाचे दास होतात असो ! म० ज्योति-बांनी सौ० सावित्रीबाईची समजूत घालून त्याना शाळेत जाण्यास प्रवृत्त केले पति आज्ञेचें उल्लघन होऊ नये म्हणून सौ० सावित्रीबाई शाळेत जाण्यास निघाल्या म० ज्योतिराव आधीच निघून गेले होते

सौ० सावित्रीबाईना पतिनी कितीहि धीर दिला असला तरी त्या वडाच्या झाडाजवळ येताच त्यांच्या सर्वांगाचा भीतिने थरकांप होवू लागला टवाळाचें टोळके सौ० सावित्रीबाईच्या येण्याची वाटच पाहत होते आज रोजच्यापेक्षा काही विशेष होणार या गोष्टीची आगाबू माहिती होती ते सर्व मजा पाहण्याकरिता वडा जवळ जमा झाले होते.

सौ० सावित्रीबाई आपले पतीचे म० ज्योतिबाचे पुण्य स्मरण करीत वाटेन जाऊ लागल्या तोच त्या टवाळ टोळक्यातून गव्हाळया रंगाचा, घारे डोळे असलेला, तदीलतन, मांझी शेंडीचा भरघोस जळका मोकळा

सोडलेला असा एक उमंट धावून समोर आला व त्याने आपण काय करीत आहो याचा विचार न करता सौ० सावित्रीबाईचा हात धरला

सौ० सावित्रीबाई मोठ्याने 'धावा हो धावा' म्हणून ओरडल्या! किती भीषण, भेसूर, टवाळकी ही! या प्रकाराला कोणती उपमा द्यावी? धर्माचे संस्कार झालेल्यानी अशी असूरी कर्मे करूनच सोज्वल असणारा धर्म अधर्मी बनविला धिक्कार, धिःक्कार असो या पुणेरी धर्म गुंडाच्या नीच मनोवृत्तीचा! जनसमुदाय पाहत उभा आहे. बाकी शेवटच्या बाजीरावाच्या रंगेल कारकीर्दीत असे वात्रट माजोरीच प्रसंग प्रत्यहि घडत असे म्हणतात. हा प्रकार डोळ्याचे पाते लवते न लवतें एवढ्या वेळांत, त्या गर्दीतून वाट काढीत हाडापेरानें मजबूत, पाणीदार डोळ्याचा, मजबूत बांध्याचा, कसदार शरीराचा वीर पुरुष धावत आला व त्यानें जवळ येऊन सौ० सावित्रीबाईचा हात धरलेल्या नरपशूचा हात धरून सौ सावित्रीबाईंना "सावू! सावू! घाबरु नकोस, डोळें उघड आणि या तुझ्या मुलाचे तोंड पदराआड घेऊन त्याला स्तनपान करव! अग, अस काय पहातेस माझ्याकडे? तू या मुलाला ओळखल नाहीस अग, हा तुझा मुलगाच आहे" सौ० सावित्रीबाईस 'सावू' या प्रेमळ नावाने हाक मारणारा हा दुसरा तिसरा कुणी नसून ते धर्मक्रांतीचे, राष्ट्रजागृतीचे, आद्यप्रवर्तक म० ज्योतिबा फुलेच होते

म० ज्योतिबाच्या आगमनानें टवाळ कपूचे भीतिनें कंबरडेच मोडले टवाळाचें अवसान खचले नेसू धोतराच्या कनवटी ढील्या झाल्या, तांदूळाच्या भुशाच्या थैल्या अधिक पुसट्या होऊन निस्तेज झाल्या. पाहणारा जनवर्ग म० ज्योतिबाच्या या धीरोदत्त वर्तनाने दिपूनच गेला विरोधकांनी साष्टांग नमस्कार घातला व सौ० सावित्रीबाईचा हात धरणाऱ्याने सावित्रीबाईच्या पायावर आई! म्हणून डोके ठेवले सौ० सावित्रीबाईनी त्याला पतिआज्ञेनें क्षमा केली

'क्षमा शास्त्र जीये नराचीये हाती । दुष्ट तया प्रति काय करी' या तुकाराम महाराजांच्या म्हणण्याचा हा साक्षात्कार होय! म० ज्योतिराव हे सौ० सावित्रीबाईंना शाळेत जाण्यास लावून आपण निघून गेल्याचा भास त्यांनी सौ० सावित्रीबाईंना केला पण, ते गुपचूप सौ० सावित्रीबाईच्या लक्षात येऊ न देता त्याच्या मागे रक्षणा करता चालत होते

बहुजनाच्या अब्रुचे रक्षण करणारा महात्मा, आपल्या पत्नीची बेअब्रु कधी तरी होऊ देईल का?

घराबाहेर पडल्यावर ते आता गंज पेठेत अेक घर भाड्याने घेऊन राहु लागले समाजसेवेमुळे पोटोबाची तक्रार नित्यच असावयाची! निष्ठावत समाजसेवकाना जीवतपणी कुठले सौख्य प्राप्त होणार? हे आपण आजही पाहू शकतो मग त्या काळी तर सर्व सामान्याच्या दृष्टीने ही नवीन चाकोरी! या नवीन चाकोरीने जाणारे कमीच, मग आर्थिक स्थिती कशी काय सुधारणार! ते आपला चरितार्थ कसा चालवित ते पुढे बघू अेवढे खरे कीं, त्याना कुभे आयुष्य दारिद्र्यात कठावे लागले

'म० ज्योतिरावांचे कार्य अपवित्र, अमगल, धर्मबुडवे, सस्कृति--विहीन आहे' अशा तऱ्हेचा शेरा श्रेष्ठी (!) नी मारल्यावर, त्याला कोणबरें चागले म्हणणार? पण, चागले ते चागलेच! सत्य ते सत्यच! त्याचा प्रकाश कसा झाकल्या जाणार? म० ज्योतिबाचें कार्य विशिष्ठाना आवडत नसले तरी सर्व बहुजनाना ते आवडीचे होतें आवश्यक होते म० ज्योतिबाच्या कार्याची महति सरकार पर्यंत गेली म० ज्योतिबा बहुसख्य जनतेकरिता कार्यप्रवण आणि प्रयत्नशील आहेत, त्याचे कार्य बहुजनाना हीताचे आहे ही गोष्ट सरकारच्या लक्षात आली त्यावेळी बोर्ड ऑफ अेज्युकेशनचे अध्यक्ष सर आर्स्किन पेरी हे होते त्यानी म० ज्योतिबाच्या कार्याचा परिचय करून घेतला आणि मुबई सरकारला तत्सबधी प्रशसा युक्त लिहिले त्याच्या प्रयत्नाने इ स १८५२ साली पुण्यातील विश्राम बागेत म० ज्योतिबाचा सत्कार करण्यात आला शिवाय सरकारतर्फेच

२०० रुपये व शाल अर्पण करण्यात आली. म० ज्योतिरावाच्या अशा योग्यसमयी सरकारकडून मान व्हावा हे त्यांच्या कार्याच्या दृष्टीनें हीतावेच झाले लोकांची जिज्ञासा निर्माण होऊन तळमळ वाढली लोक सहकार्य करायला तयार झाले. ज्योतिरावाची कार्यतत्परता व लीनतेचे सर्वात मोठें अुदाहरण म्हणजे उपरोक्त सभेंत नामदार गव्हर्नरसाहेबांचे आभार मानतांना ते म्हणाले –

'मी कार्य करणारा कोण ? मी अेक क्षुद्रजीव ! माझ्या सारख्या व्यक्तिकडून कुठले कार्य ? मी माझे कर्तव्य केले. स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा, स्त्री शिक्षणाकडें सरकारचें अधिक लक्ष असावे अशी माझी मनीषा आहे.

या भाषणामुळें 'दक्षिण प्राईज' कमेटीकडून म० फुलेंच्या शाळेला मासिक पंच्याहत्तर रुपयें अनुदान मिळावयास सुरुवात झाली ह्या मदतीच्या जोरावरच ज्योतिरावाना आणखी २–४ शाळा उघडावयास मदत झाली पुढें सरकाने मुलींच्या शिक्षणाची व्यवस्था केल्यावर म० ज्योतिबानी आपल्या शाळा सरकारच्या ताब्यांत दिल्या या प्रथम शाळेंसच पुढे इन्ग्रजी वर्ग जोडण्यात आले आणि हायस्कूलचें स्वरूप प्राप्त केले. आजहि पुण्यात ही शाळा गर्लस हायस्कूल या नावाने सुरू आहे

स्त्रीयाच्या मानवी हक्कास, भावनास, दु:खास, प्रथमत सर्व तऱ्हेनी, म० ज्योतिबा फुलेनीच वाचा फोडली त्या दृष्टीने म० फुले स्त्री जातीचें 'आई' ठरतात आज स्त्रियात सुशिक्षिताचे जे अधिक प्रमाण दिसते, त्यात म० फुल्याचा कण्‌कण नव्हे अणू अणू व्यापून उरलेला आहे पण, ज्याना याची जाणीव असेल त्यानाच !

★ ★ ★

# पददलितांचा अभ्युदय ● ● ● ४

अिश्वर निर्मित या सृष्टीत श्रेष्ठांश्रेष्ठतेचे भेदाभेद का असावेत बरें? एक उच्च जातीचा तर दुसरा शुद्र कां ? व कसा ? शारीरिक भेदाभेद नसतांना देखिल एक दुसऱ्यास का कमी लेखतो मानवी मनाची हीं अप्रगत अवस्था, अद्यापहि दोन महात्म्याच्या तपस्येनतर ही उरावी, यापेक्षा दैवदुर्विलास कोणता ? हिंदु ! हिंदु या केवळ शाब्दिक हिंदुत्वानें आमचे हिंदुत्व स्थिर झाले आहे कां ? उलट जातीजातीच्या, पथापथाच्या झगड्यामुळे या हिन्दुत्वास तडे गेलेत. आमच्या हिन्दुत्वाच्या गैरकल्पनेनेंच आम्ही आमच्यात शकले निर्माण केलीत म० फुल्यानी सर्व मानव समाज एकत्रित करण्याचा प्रयत्न केला हिन्दुत्वास चिरस्थाइत्व निर्माण व्हावे जातिभेदाचे निर्मूलन व्हावे आणि प्रत्येकाला हक्काने जगता यावे असा प्रयत्न केला. पण त्याला विरोध करणारे विशेषत्वाने हिन्दुत्वाची सस्कृति दिमाखाने मिरवणारेच सापडेलत म्हणून म० फुले हे ब्राह्मण विरोधक होते असे म्हणण्यात येते. खरे पाहता म० ज्योतिबाचा ब्राह्मण या व्यक्तिस विरोध नव्हता ब्राह्मण्यास आणि विशेषत्वाने भिक्षूकवृत्तिला, पुरोहित पणाला! मग ते कोणत्याहि जातीचे असोत असे असतां ब्राह्मणाचें विरोधक होते या म्हणण्यात काय अर्थ आहे ? हे तर क्षुद्र मनोवृत्तीचें प्रतीक समजावे लागेल आमच्या हिंदुत्वाच्या अयोग्य कल्पनेनेच हिंदूमधील अस्पृश्य समाजाला आज अखेर धर्मांतर करावे लागले: हा धर्माचा उत्कर्ष की अपकर्ष ? अन्यधर्मीयानी आपल्या धर्मातील लोकसंख्येची वाढ

व्हावी म्हणून प्रयत्नाची पराकाष्टा करून नित्य वाढ करीत आहे अशा वेळी केवळ हेकटपणाने हिंदुधर्मांतील कोटयावधींनी परधर्माचा प्रवेश करावयास लावणें हे हिंदुधर्माभिमानीयांना लांच्छनास्पद नाही का ? म० फुलेंचा मानवतावाद किंवा बहुजनसमाजवाद जर त्या वेळच्या धुरीणांनी अंगीकारला असता तर हिंदुत्वाला आहोटी न लागतां अेक संघ निर्माण झालेला दिसला असता पण स्वतःच्या श्रेष्टत्वाच्या कल्पनेनें धुन्द असणारें लोक हे लक्षात घ्यावयास कसे बरे तयार होणार ? उलट हा बहुसंख्य समाज अज्ञ राहिला तर वंशपरंपरेने, आपल्या पोटापाण्याचा व श्रेष्ठत्वाचा प्रश्न सुटेल ! या भावनेनें या विरोधकांनी म० फुलेंच्या कार्यास विरोध केला म० ज्योतिबा केवळ बडबडणारे नव्हतें, ते क्रांतीवीर होते या परंपरेला बदलविण्याचा त्यांनी दृढनिश्चय केला हिंदुस्थानातील जाती जर नाहींशा झाल्या तर खरी मानवता निर्माण होईल असा त्यांचा विश्वास होता भिक्षूकशाहीच्या दास्यातून बहुजनसमाजाची मुक्तता झाली तरच स्वातंत्र्याचे स्वराज्य होईल ! ही दास्यशृंखला तोडावयास प्रथमतः म० फूले उद्युक्त झाले सन १८५१ मध्ये पुण्यात भानापेठत अस्पृश्याकरिता पहिली शाळा स्थापन केली भिक्षूकशाहीचे निर्मूलन करावयास सर्व समाज सुशिक्षित झाला पाहिजे म्हणूनच त्यांनी अस्पृश्याकरिता स्वतंत्र शाळा उघडल्या कारण जातीभेदाचे वीष त्या काळी श्रेष्ठ जातीच्या संसर्गानें बहुजनांचयाहि अंगी भरलेले होते त्या मुळे अस्पृश्यांचा स्पर्श होणे हा विटाळ मानण्यात येई हा स्पर्शास्पर्श भेद नाहीसा करण्याकरितां अशा अस्पृश्याकरिता काढलेले शाळांतून इतरेजनांच्याहि मुलांना शिक्षणाच्या निमित्तानें अेकें ठिकाणी बसवून त्यांच्या विटाळाच्या कल्पनेंनें सहजगत्या मूठमाती देण्याचे कार्य सुलभरीतीनें म० फुलेंनी साधले

म० ज्योतिबांनी अस्पृश्या करिता शाळा उघडून अधर्माचा कळस केला आता ज्योतिबा सर्वांना शिक्षण देऊन आपले श्रेष्ठत्व कमी करणार अशी भीति भिक्षुकांना वाटू लागली त्या शिवाय जाती भेद लयाला जाण्याच्या उद्देशानेच एका ब्राम्हण शिक्षकास शिक्षक म्हणून म० ज्योति

बांनो आपल्या शाळत ठेवले या गोष्टीनें विरोधकांच्या संतापाग्नीत तेलच ओतले ! त्यांनी या संबधी शिकस्तीचे प्रयत्न करून ब्राम्हण शिक्षकास नोकरी सोडावयास भाग पाडले. म० ज्योतिरावाच्या कार्यावर याचा काही परिणाम न होता शैक्षणिक कार्य सुरळीतपणें चालले होते कारण त्याचा हेतूच मुळी ब्राम्हणाच्याहि मनातून स्पृश्यास्पृश्य भेद निघून जावेत म्हणून इतरेजनाप्रमाणें याहि समाजाकरिता ते प्रयत्नशील होतें. शिक्षकाची कमतरता भरून काढण्या करिता म० ज्योतिबानी आपल्या धर्मपत्नींकडून शिक्षक कमी झाल्याची उणीव त्यांनी भरून काढली

म० ज्योतिबाच्या या उद्योगामुळें सर्व पुणें शहरांत ब्राम्हवृन्दाने कोलाहल माजविला "धर्म बुडाला ! प्रलयकाळ जवळ आला आहे ! विद्या नीचा घरी गेली आहे" नाना प्रकारे हलकल्लोळ उडवून बहुजन समाजास भेदरून सोडले, त्यामुळें ज्योतिरावाना मदत मिळणे कठीण झाले. शाळेतील अनुपस्थिती वाढली. म० फुलें घरोघरी जाऊन शाळेत विद्यार्थी आणीत पण आतां त्यांच्या शाळेत मुलाना पाठवावयास लोक तयार होईनासे झाले म० ज्योतिबावर ज्ञातीवरिष्ठानी रात्रंदिवस बहुजन समाजात भेदाभेदी धर्माच्या तत्वाचा प्रचार करून म० ज्योतिबाच्या कार्याचा कणा असा जो बहुजनसमाज त्याचेकडून बहिष्कार घालविला. म० ज्योतिबाचे कार्य अत्यत कठीण, जवळ जवळ लयास जाते की काय असे झाले आपलें कार्य नेटानें पुढे नेंणें जरुर आहे पण सहकार्य संपुष्टात येंऊ लागले, कसें करावे ? या विचार चक्राच्या वादळानें म० ज्योतिबा चिंताक्रांत झालें. रात्रीचे रात्री विचारात जावयाला लागल्यात. या परिस्थितीतून मार्ग कोणता काढावयाचा बहुजन समाज असाच पददलित म्हणून राहणार काय ? हीच सदैवची चिंतना !

ही वेळ म० ज्योतिबाच्या सत्वपरीक्षेची होती व अशा वेळीच त्यांना परधर्मीयाचें काही काळ साह्य घ्यावे लागले यामुळें विरोधकाना हे नवीनच खाद्य मिळाल्यासारखें वाटून, त्यानी बहुजनसमाजात " म० ज्योतिबा हे आपल्या धर्माला हीन समजून ख्रिश्चनधर्माला फार मानतात ' या प्रचारानें म० ज्योतिबाकडे पाहण्याचा बहुजनसमाजाचा दृष्टीकोन पार बदलून गेला (पाद टीपा पहा)

पाद टीपा –

या प्रचारामुळेंच विसाव्या शतकात काही, म० ज्योतिबाच्या कार्याला हीनतेचे गालबोट लावण्याचा प्रयत्न करणाऱ्या परपन्थाभीन्यानी म० ज्योतिबा हे ख्रिश्चन झाले होतें असें अत्यत बेजबाबदार विधान ठोकून दिले, परतु हे विधानच असत्य असल्याचे म० ज्योतिबाच्या अनुयांना सोदाहरण दाखवून दिले उलट त्या काळचें नामवत सुशिक्षित जेव्हा हिंदू धर्माचा त्याग करून ख्रिश्चन धर्माचा स्विकार करण्याचा मानस प्रसिद्धपणें सागू लागले, त्या वेळी म० ज्योतिबानी

पादटीपा —

नीळकठशास्त्री, प्रो० वेलिणकर, रे० टिळक, रे० नारायण देशाद्रि, ललेशास्त्री व पडीता रमाबाई यानी परधर्म स्वीकार करु नये म्हणून त्याचे जवळ जीवाचे रान केले. यावरून हिन्दूधर्म हा किती एकांगी एकल कोंडा होता हे नव्यानें सागावयास पाहिजे का ? प० रमाबाईचे चरित्र डोळयापुढें घेतल्यास प० रमाबाई सारख्या स्त्री विदूषीला (पं० रमाबाई सारखी विद्वता क्वचितच ! पुरुषवर्गातहि नव्हती विद्वता आणि वक्तृत्व या दोन गुणाचा प० रमाबाईच्याठाअी सुन्दर सगम झालेला होता वरील गुणातील फक्त अेकाच गुणाचा (वक्तृत्व) अभाव कै० लो० टिळकानहि होता) प्रवचन स्वातत्र्य नाकारून धर्मांतर करण्याची पाळी आणवली. अशा धर्ममार्तंडाना धर्ममार्तड म्हणावे कीं, धर्ममारक म्हणावे ?

[redacted] ...२०१०......... नो कि १६।१।२६

त्यावेळी अस्पृश्य लोकाना अत्यंत घृणास्पद रीतीनें वागविण्यांत येत असें. पेशवाईत शुद्राला थुकावयाचें झालें तर गळ्यात अेक मडके बांधावे लागत असे ! शुद्राने रस्त्यावर थूक नये, त्याचा स्पर्श जर ब्राह्मणास झाला तर फार मोठा विटाळ झाला असल्याचे समजून सचैलस्नान करण्यात येई त्याबद्दल अस्पृश्याना शासन मिळे, अशा अवस्थेत अस्पृश्याना दोनघोट पाण्यासाठी तासन् तास ताटकळत अुभ राहून स्पृश्यबांधवाना याचना करावी ते हीन दीन रडकुंडीस आलेले चेहरे एकदां ज्योतिरावांच्या दृष्टीस पडले. त्याचे मन अुदास झाले माणसानीच माणसाना किती हीन केले आहे,

म० फुल्यानी सौ० सावित्रीबाईना हे स्पृश्यबांधवाचे दु:ख सांगून त्यावर उपाय म्हणून आपल्या मालकीचा हौद व विहीर त्याना पाणी भरण्याकरीता मोकळी करण्याचा मनोदय सांगितला झाल ! अस्पृश्यांना दैनंदिन जीवनात नडणारा पाण्याचा प्रश्न म० फुल्यांनी आपला हौद व विहीर खुली करुन सोडवला व इतर स्पृश्याना यासबंधी विचाराने अन्तर्मूख होण्यास लावले सन १८६८ मध्यें अस्पृश्याना पाणीदेणारा, सर्वांना द्यावयास सांगणारा, महात्मा देव म्हणून वाटला तर नवल कोणते ?

अस्पृश्या करिता शाळा काढल्याने व स्वत च्या घरातील पाण्याचा हौद मोकळा केल्याने, अस्पृश्यास मदत होत आहे म्हणून व पाण्याने विटाळ केला, धर्मबुडविला म्हणून पुण्यातील क्षुद्रवृत्तीच्या भटाभिक्षुकाच्या रागाचा पारा शेवटच्या डिग्रीपर्यंत चढून गला म० ज्योतिबाना खाअूं कीं, ठेवू असें होऊन गेले, कसाला ज्या प्रमाणे अशनीशयनी श्रीकृष्णच दिसे अगदी तसेंच भटाभिक्षुकांना म० फुले दिसू लागलें

इग्रजी शिक्षण हे वाघीणीचे दुध आहे असे म्हणणारे प्रख्यात मालाकार चिपळूणकर शास्त्रीबुवानी सुद्धा म० ज्योतिबा फुल्यांच्या या धर्म सुधारणेच्या सहकार्यावर आपल्या विद्वताप्रचूर भाषेत पण गरळन ओकन राहिले.

याचा परिणाम शुद्रजीवाच्या मनात आधिच असलेला द्वेशाग्नी अधिक प्रज्वलीत होण्यास मदतच झाली " पुण्यातील पेशवाईवर राजकारणी पुरुषाचा किंवा सेनानीचा सल्ला घेण्या ऐवजी आपल्या उपाध्यायाचा सल्ला घेण्याइतकी पकड होती रमणे, सहस्त्र भोजने इ० गोष्टीसाठी या पुण्यात महाराष्ट्रातलेच केवळ नव्हेत तर हिंदुस्थानातील भिक्षूक भोजन भाऊ त्या काळी गर्दी करून राहिले होते राज्य गेले तरी वरील प्रवृत्ती पुण्यात ठाण मांडून बसली होती व यातूनच म० फुल्यांना देहानें नाहीशी करण्याची योजना आखण्यांत आली असावी पण हे धाडस करण्याइतके शौर्य अंगी नसल्यामुळें किंवा "परस्पर पावणेंतेरा" या दुर्योधनी वृत्तीने हे खून करण्याचे कुकर्म करण्यास बहुजन समाजातील दोन तरुण हुडकून काढले व त्याच्या भोळ्या धर्मश्रध्देला अधिक उत्तेजन देऊन त्याना या कामास प्रवृत्त केले या दोन तरुणापैकी एक कुंभार समाजातील धोंडीबा या नावाचा तरुण होता तारुण्याच्या ऐन बाविशीत यानें पाउल टाकले होते याला आखाड्याचा चांगलाच नाद होता पिळदार दंड व भरीव छातीचा हा तरुण हातात फर्शी कुऱ्हाडी सारखे तीक्ष्ण धारेचे प्राणघातक हत्यार घेऊन म० ज्योतिबा फुल्यांना यमसदनास धाडण्याच्या कामगिरीवर, आपल्या सोबत्यास घेऊन काळोख्या रात्री ज्या लिंबाच्या झाडाखाली घोंगड्याचे पाल लावून दलितोध्दाराचे कार्य करणारा सत्पुरुष, महात्मा राहत होता त्या ठिकाणी लपत छपत जावून, पालाच्या बाहेर पण शेजारीच झाडाच्या आडोशाला उभे राहून पालातील हालचालीचा, बोलावयाच्या आवाजाचा मागोवा घेत उभे राहिले. म० ज्योतिराव व सौ० सावित्रीबाई यांना त्या रात्री जेवावयाचें नव्हते. म० ज्योतिबा हे सौ० सावित्रीबाईशी आरंभित कार्याचा, राष्ट्रीय भवितव्यावर कसा सुपरिणाम होईल या विषयी सांगत होते त्याच्या भाषणात तळमळीचा ओलावा होता बहुजनोध्दाराची कळकळ होती. त्या संभाषणानें ~~त्या दोघांच्या ...~~ हृदयाचा ठाव घेत होता आणि शेवटी म० ज्योतिबा फुले व सौ सावित्रीबाई या दोघानी मिळून डाळ

मिटून अव्यक्त अशा परमेश्वराला हात जोडून हे प्रभो सर्वांना सद्बुद्धि दे सर्वांना विमल प्रेमाचे दान दे सर्वांच्या मनी अेकमेकांविषी बंधुभाव वसूदे सर्वांचे अज्ञान, दु:ख, दारिद्र्य दूर कर अशी सजल नयनानी प्रार्थना केली

आहा हा ऽ हा ऽ ! ती मध्यरात्रीची शांत, निवांत वेळ ! चोहीकडे निस्तब्धता होती दिवसभराच्या शारीरीक कष्टाची कामेकरुन दमलेली जनता गाढ झोपी गेली होती अशा वेळी पालात मदमद तेवत असणाऱ्या लामण दिव्याच्या प्रकाशात हात जोडून ईश्वरास प्रार्थना करीत असलेले पुण्यवत जोडपे ! धोंडीबाचा निष्ठूर सकल्प हळूहळू विरघळला हातचा फरश कुऱ्हाड जमीनीवर पडली. डोळयाच्या कडा पाण्याने ओथबून आल्या. पश्चातापाने हृदय पोळू लागले अशा स्थितीत धोडीबा आपल्या पालात येंऊन डोळे मिटून प्रार्थना करीत असलेल्या म० ज्योतिबा फुल्याना गद्गद् स्वराने क्षमा करा ! एवढे कसे बसे बोलून पायी लोटण घेता झाला

म० ज्योतिबानी आश्चर्याने 'हा काय प्रकार' ! म्हणून धोंडीबास उठवून विचारले धोंडीबानें आपण म० फुल्यांचा खून करण्याकरिता कसें आलो ? कोणी प्रवृत्त केले व येथून जे जे अैकले व पाहिले त्याचा आपल्या मनावर कसा परिणाम झाला हे वृत्त सांगितले व आपण अशा सत्पुरुषाचा खून करण्याकरीता ज्यानी प्रयत्न केले त्याचा वध जर म० फुले आपणाला आज्ञा करतील तर क्षणाचाहि विलब न लावता त्या अधमींना ओंकारेश्वरी आपण पाठवून देतो असे म्हणून म० फुल्यांच्या आज्ञेची वाट पाहू लागला म ज्योतिबानी धोंडीबाला सांगितले कीं, हा माझा धर्म नाही ! असले घोर कर्म करणारा व करविणारा तो मानवतेचा महान शत्रू होय खूनासारखे महापातक करविणारा ( करणाऱ्यापेक्षा करविणाराच अधिक पापी ) चडाळाहून चाडाळ होय अशाना क्षमा करणे हेंच उत्तम मानवत्व होय श्री तुकारामानी म्हटले आहे की,

" क्षमा शस्त्र जया नराचिया हाती ! दुष्ट तयाप्रति काय करी ।

तृण नाहीं तेंथें पडिला दावाग्नी । जाय तो विझोनी आपसया । तुका म्हणें क्षमा सर्वांचे स्वहीत । धरा अखंडीत सुखरुप ॥ म० ज्योतिबा फुलें हें १९ व्या शतकातील तुकारामाचेच अवतार, असें सत्य सत्य वाटू लागते. खून करण्या करिता आलेल्या धोंडीबानें म० फुल्याचे शिष्यत्व पत्करले इतकेच नव्हे तर निरक्षर धोंडीबा म० फुल्याच्या अनुमोदनाने नुसता साक्षरच झाला नाही तर संस्कृत पडीत झाला व त्याने पुढें मी मी म्हणविणाऱ्या शास्त्री, पडीतांशी वादविवाद करून जिकले हा म० फुल्याच्या कार्याचा विजय होय.

अशा थोर महात्म्याच्या अपमृत्यूने काळ अमर कीर्तिवंत होतो ते भाग्य सामान्याच्या मृत्यूनें काळाला लाभत नाही. अशी महात्म्यांना खून करणाऱ्या, खूनी दुष्टाचे नांव जगाच्या अतापर्यंत अनादराची नौबत झडवित असते

यावर संत कबीराचे एक वचन आहे कीं, --

'जिसकू राखें रामदयालू । उसकू मारे कोय ।
उसपर दुनिया उलटी फीरे तो । बाल न बाका होय ॥

अशा महात्म्याच महात्म्य हेच भारताचे जगाला दिपवून सोडणारे दिव्य वैभव होय

अस्पृश्याना कोणत्या रीतिनें शिक्षण द्यावे ? हा प्रश्न त्या वेळी कांही इंग्रज आपसांत चर्चा करीत म० ज्योतिबानी स्थापन केलेल्या शाळाचे वर्तमान इंग्रज लोकाच्या कानी जाताच त्याना आनंद झाला पुढे 'दक्षिणा प्राईज कमेटीने म० ज्योतिरावाचा या कार्याबद्दल गौरवकरुन याशाळेस मासिक ५० रु अनुदान दिले या शाळेची झपाट्याने वाढ होऊ लागली व्याप सांभाळणे मुष्किल झाले म्हणून त्यानी ही शाळा, म० फुल्याच्या नेतृत्वाने स्थापन झालेल्या ग्रामसंस्थेच्या ताब्यात दिली व ते

दुसरे कार्य करावयास मोकळें झाले अस्पृश्यांच्या शिक्षणाच्या दृष्टीनेंहीच पहिली शाळा ! ही शाळा अद्यापहि भोकरवाडीस सुरु आहे दलितोद्धाराचे सर्वांगीण कार्याचा प्रथमारंभ करणारे म्हणूनच डॉ बाबासाहेबांनी कैक वेळा म० फुलेबद्दल आदरोग्दार काढले डॉ बाबासाहेबांनी म० फुलेचे चरित्र लिहावे, अशी विनती सद्गुरु नित्यानंदजी मोहिते महाराज यांनी प्रत्यक्ष उपस्थितीत केली होती व त्यांनी ती मान्य केली होती ऐकिवात आहे की, डॉ. बाबासाहेबांनी म० फुलेचे चरित्र लेखनास सुरुवात केली होती ते पूर्णत्वास जाण्यापूर्वीच त्यांचे महानिर्वाण झाले ! दुर्दैवच म्हणावयाचे ! ! आता त्यांचें सुपुत्र श्री यशवन्तराव तथा भय्यासाहेब आंबेडकर हे डॉ बाबासाहेबांनी म० फुलेसम्बन्धी जेवढे लिखाण केले असेल तेवढें प्रसिद्ध करतील हीच एक आशा !

★ ★ ★

# स्त्री स्वातंत्र्याचा आद्य प्रणेता ●●● ५

मनुस्मृतीत स्त्रीयाबद्दल बऱ्याच ठिकाणी अन्यायी धोरण आढळते स्त्रीयांना शिक्षणाचा अधिकार नाही, तिने पतीची देव मानून सेवा केली पाहिजे. धर्माचरण कडकडितरित्या पाळले पाहिजे. वस्तुतः मनुस्मृती माणसानेच निर्माण केली मनु पुरुष असल्यानें पुरुषी अधिकाराची 'स्मृतीवर' चिन्हे उमटावीत यात विशेष नाही । जणू स्त्रीयाना 'मन'च नाही (The woman has no soul) भावना नाहीत. पुरुषानें सांगावे, ते स्त्रीने ऐकावेच । हा धर्म नव्हे, अन्याय, असमता या विरुद्ध संघटीत होऊन स्त्रीयानी लढा दिलाच पाहिजे नाहीपेक्षा स्त्रीयाच्या छळाची वर्णनें काय कथन करावी ? आजच्या स्वातन्त्र्याच्या काळात स्त्रीयाना बरेच अधिकार प्राप्त झालेंत । नव्हें त्याचे अधिकार अबाधित रहावे म्हणून कायद्याचे संरक्षण मिळाले स्त्रीयाना समान हक्काची जाणीव झाली त्यानी हें मिळविण्याचे प्रयत्न केले. संघटना बांधविल्या या सर्व कर्तंव्याच्या मूळाशी प्रेरकशक्ति म्हणजे म० फुले होत । म० फुल्याच्या काळीं स्त्री म्हणजे पुरुषाचे खेळणे । वाटेल तेवढा वेळ खेळावे, कटाळा आला कीं फेकून द्यावे । हा प्रकार होता स्त्रीयांवर निरनिराळे धार्मिक-सामाजिक निर्बंध घालून देण्यात आले होते. या जाचक निर्बंधातून स्त्री जातीची मुक्तता व्हावी, या दृष्टीनें म० ज्योतिरावानी जीवापाड प्रयत्न केले म्हणूनच म० ज्योतिराव हे स्त्री स्वातन्त्र्याचे आद्यप्रणेते झाले. राक्षसीवृत्तीच्या पुरुषापुढे असहायपणे स्त्रीचा बळी जावा हे म० फुलेना बघवले

नाही जख्ख म्हातारा झालेला गृहस्थ, ज्याच्या गोवऱ्या स्मशानात त्याची वाट पहात आहेत, काळ त्याच प्रेत तिरडीला शृंगारू पहात आहे अशा पुरुपास देखिल 'नवपरिणिता' आठवर्षाची ( अष्टवर्षात भवेत कन्या ) कन्यका वधू म्हणून मिळावी हे किती लाच्छनास्पद आहे. म० फुलेंना ही स्थिती बदलावयाची होती आर्थिक अडचणीमुळे हुन्डा देववत नाही मुली ला चागल स्थळ (।) मिळाव म्हणून कैक मुलीचे बाप लाचार होत आणि अशा म्हाताऱ्यास आपली मुलगी देवून लग्न करवीत हा दोष स्थितीचा जरुर। म्हणून का पुरुषाच्याहि वृत्तीला स्त्रीयाना बळी द्यावे। आणि अशा बळि स्त्री स्त्रीचा नवरा दुसरे दिवशी वारला तरी त्या स्त्रीला आजन्म विधवा म्हणूनच रहावे लागन असे ही कोणती मनुस्मृती ? हा कोणता धर्म? या अन्यायाचे उच्चाटन व्हावे म्हणून म० फुल्यानी जीवाचे रान केले विधवा विवाहाचा जोरदार पुरस्कार केला सामान्य स्त्री व पुरुपाना वासनावर विजय मिळविणे कठीण। वासना या इतक्या बलिष्ठ असतात की, त्या कधी कोठे, काय अनर्थ धडवून आणतील याची कल्पनाच करवत नाही व्यासानी या विषय प्रवृत्तीसबधी आपला शिष्य जो जैमुनी यास सागितले की, 'मातृ स्वस्त्रा दुहित्रा वा नो विवक्ता सनोभवेत बलवान इद्रियग्रामो विद्वास मापिकर्षति' आई बहिण व मुलगी याचेसह अेकातात, अेकासनावर बसु नये कारण इद्रिये इतकी बलवान आहेत की, ते ज्ञानी पुरुपालाहि अधम करावयास लावतील मग अज्ञानीयाची काय तमा ? उदाहरण म्हणून जे महान महान तपस्वी होऊन गेले त्याचीहि इद्रिय सयमात कशी घसरगुडी झाली ते पाहा 'विश्वामित्र पाराशरादि मुनियो वाताबूपर्णाशना स्तेपि स्त्रीमूख पकज सुललित दृष्टवैव मोहगता' जेथे विश्वामित्र पाराशरादि तपस्वीनाहि इद्रियानी खाली मान घालावयास लावली यारुन पुरुषवर्ग विषयतृप्तते सबधी सर्व-नियम कसा झुगारुन देतो हे ध्यानात येईल स्त्रीच्या नैसर्गिक शारिरीक दुर्बलतेचा फायदा नीच स्वभावाचा उन्मत्त पुरुष राजरोस घेऊन पुन्हा व्यवहारात सभावित म्हणून मिरवितो

स्मृतिकारानी या वृत्तिची दखल जितक्या योग्य प्रमाणात घ्याव-यास पाहिजे होती तितकी ती मुळीच घेण्यात आली नाही हे दिसून येते. स्मृति म्हणजे केवळ धर्माधारीत नियम नव्हेत । तर ते त्यावेळचे मान व समाज रक्षणाचे राजकीय नियम होत ।

स्मृति ही एकांगी असल्यामुळे तीतील उत्तमत्वापेक्षा पुरुषी बला-नेच ती स्त्रीला मानावयास लावून आचारावयास लावले हे सहज दिसून येते.

बालविवाह, जरठकुमारी विवाह इत्यादि घातूक पद्धति ज्या हिंदु-धर्मात चालत होत्या त्या धर्मात स्त्रीवर्गाची विटबनीय कुचबणा होत होती याची जाणीव म० फुले याच्या अन्याय प्रतिकारी मनास जेवढ्या प्रकर्षाने झाली तितकी ती इतराना झाली नाही, असे तत्कालीन इतिहास पाहता दिसून येते. बालपणी वैधव्य प्राप्त झालेल्या वा जठराशी विवाह झालेल्या नवतरुणीस केवळ धमनियमाच्या बधनानी सयमात ठेवण्याचा प्रयत्न करणें हास्यास्पदच नव्हे का ? पतिच्या मृत्यूनतर स्त्रीने अभ आयुष्य वैधव्यातच घालविले पाहिजे अशी सांगणारी स्मृति स्त्रीच्या आमरणानतर पुरुषाने आपली अभी हयात विधूरावस्थेतच घालविली पाहिज असा वादातीत निर्णय देऊ शकली नाही उलट व्यवहारात प्रथमपत्नी ऋण-शय्येवर आसन्नमरण स्थितीत असताच दुसऱ्या लग्नाच्या वाटाघाटी सुरु होतात. या वरून आचारसहिता कशी धार्जिणी आहे हे उघड होते.

स्त्रीया ह्या जात्याच विनयशील व सयमदक्ष असतात पण त्यांच्या असहायतेचा गैर फायदा घेण्यांत टपून असलेल्या नर पशूच्या प्रलोभनाने व अधिक जोर जबरदस्तीने त्या त्याचे खाद्य बनतात व परिणामी गर्भपात किवा आत्महत्या या सारख्या घातक मार्गांचे अवलबन त्याना करावे लागते स्त्री जन्माची कोण ही भयकर विटबना ।

म० फुलेंनी बालविवाहाचाहि बुद्धिचातुर्यानें पुरस्कार चालविला या चळवळीनें अेक नवीन पण अत्यंत गरजेचा राजमार्ग गरजवंत विधवा स्त्रिया व विधूर पुरुष याना मोकळा झाला. म० फुलेंच्या युक्तिवादापुढे विरोधकांची तोंड बंद होत. म० फुलेंनी पुनर्विवाह विचाराचा झपाट्याने प्रसार करून त्याची परिणिती इ स १८६४ साली पुणें येथें गोखले बागेत शेणवी (सारस्वत) ज्ञातीतील विधूर श्री. रघुनाथ व विधवा असलेल्या श्रीमती नर्मदा यांच्या पुनर्विवाहात करुन पुनर्विवाहाचा मार्ग रुढ केला

न्यायमूर्ति म गो रानडे याना म० फुलेंचे पुनर्विवाहाबाबत विचार मनापासून आवडत व ते प्रसंगी उघड उघड पुष्टि देत. पण कृतिच्या वेळी मात्र न्यायमूर्तिना पुनर्विवाह आचरणात आणण्याचे धाडस करविले नाही न्यायमूर्तिची प्रथमपत्नी दिवंगत झाल्यावर म० फुले हे न्यायमूर्तिनी पुनर्विवाहच करुन या सुधारणेला सक्रिय पाठिंबा द्यावा असे वेळोवेळीं भेटीत सांगू लागले. व मग न्यायमूर्तिचे लग्न कुमारीकेशी जमलेले अैक-ण्यात आले त्यावेळी नाराज होऊन प्रत्यक्ष न्यायमूर्तिकडे जाऊन त्यांनी विचारणा केली असता न्यायमूर्तिनी असे सांगितले कीं, मी पुनर्विवाहाचे बाजूचाच आहे पण माझ्या वडिलाच्या मतापुढे माझा निरुपाय आहे. यामुळें म० फलेंचे न्या० रानडे यांचेशी पुढें सामाजिक बाबतीत घनिष्ठ असे प्रसंग क्वचितच आले

या प्रचारातूनच म० फुले यानीहि संताना करिता पुनर्लग्न करावे असा त्याना सर्वाकडून आग्रह सुरु झाला यात प्रमुख आग्रह म० फुले यांचे वडील गोविंदराव यांचाच होता. आपणाला नातवंड पहावयास मिळावे अशी प्रबल अिच्छा गोविंदरावाची होती म० फुले हे सहसा आपल्या वडीलाचें मन दुखावित नसत ते पितृभक्त होते आपल्या वडी-लाना आपण पुनर्लग्न करणार नाही हे कसें सांगावें याची म० फुलेंना पंचाईत पडली

म० फुले हे किती तत्वनिष्ठ होते हे या पुनर्लग्न प्रकरणावरुन सिद्ध होते. पत्नी मृत झाली असता विवाह कर्तव्य असेल तर तो विधवेशी पुर्नविवाह करावा, पण प्रथमपत्नी हयात असता संताना करीता आपल्या पत्नीनिष्ठेस तडा जाऊ देऊ नये अशी त्याची पक्की मते होती वास्तविक पाहता पुत्रप्राप्तीची कुणाला इच्छा असत नाही वंशवेल वाढावी म्हणून श्रीमतापासून गरीबापर्यंत देवादिकाना नवसायासादि गोष्टी करताना वर्तमानकालीहि आपणास पाहावयास मिळते.

शिवाय पुत्रप्राप्ती करीता अेकसोडून अनेक विवाहहि करण्यास पुत्रेच्छू माघार घेत नाहीत (सध्या अेकपत्नीत्वाला कायदा झाला ही गोष्ट निराळी) म० फुलेना लग्न होऊन बराच काळ झाला तरी संतान झाले नाही हे पाहून त्याचे संबधीचे वडीलधारी बाया माणसें, परोपरीने संतती करिता दुसरे लग्न करावे अशी सूचवू लागली इतकेच नव्हे तर काही बायानी खुद्द सौ० सावित्रीबाईच्या मनात इतके भरविले की, म० फुले याना सौ० सावित्रीबाईनीहि आपल्या सुखाकरीता दुसरे लग्न करुन घण्याचा आग्रह सुरु केला आ हा ऽ हा ऽ ! धन्य आहे त्या साध्वी पतिनिष्ठ सावित्रीबाईची ! आधीच स्त्रीयाना सवतीबद्दल काय वाटते ? हे ज्यानी दोन लग्न करण्याचे पुण्यकर्म केले असेल त्यानाच त्याची जाणीव असणे स्वाभाविक नाही काय ? पुराणातरीच्या कथातहि सवतिमत्सराचे योग्य असे वर्णन करण्यात आलेले आढळते

'सवत' हा अेक मोठा मानसिक असा स्त्रीयाना सदैव बेचैन करणारा रोग आहे जाणूनबुजून कोणती स्त्री आपणास सवत असावी अशी अिच्छा करील ? पण सौ० सावित्रीबाईचे मन विशाल समुद्रासारखे होते आणि म्हणूनच त्यानी फुले कुलाचा वंशविस्तार व्हावा या उदार हेतुने म० फुले याना आता त्याचा अनुयायी वर्गाकडूनहि वेळ प्रसगी दुसऱ्या लग्नासंबधी सूचित करु लागल या सर्वाच्या आग्रहाला एकदा काय ते निश्चितस्वरु-

याचें उत्तर दिल्याविणा हा आग्रह तर थांबणार नाहीच ! पण न जाणो या साध्या आग्रहाचे रुपांतर एखादेवेळी हट्टाग्रहातहि होण्याचा संभव अधिक !

वाचक हो ! काय ठरविले असेल म० फुल्यानी असं तम्हाला वाटतं ? धर्मरूढी द्वितीय विवाहास विरोधी नाही व्यवहारांत अनेक पत्नीत्वाचे दाखले त्यावेळी पहावयास सापडत असें असतांना संतान प्राप्तीकरिता म० फुल्यानी द्वितीय विवाह करण्यास काय हरकत होती ? केवळ हौसेखातरहि दुसरे लग्न करणारे हरिचे लाल होते, मग म० फुल्याना संतानाकरिता लोक दुसरे लग्न करण्याचा आग्रह करीत होते

पण म० फुल्यांनी या संबंधी वैयक्तिक फार दूरवर विचार केला व त्यांनी प्रथम आपल्या मित्राना ( या मित्रमंडळीत न्या० रानडे याचाहि समावेश होता. ) अत्यंत शांतपणें उत्तर देऊन निरुत्तर केले. म० फुले यानी हे पटविले की, संतान प्राप्ती ही माझे पत्नीच्या शारीरिक दोषामुळें होत नाही म्हणून मी दुसरे लग्न करावयाचे असें जर तुमचे म्हणणें असेल तर ज्या ठिकाणी पुरुषाचे ठाअी असें दोष असले तर तिने दुसरा पति करावा असे तुम्ही म्हणाल ? शिवाय आज कित्येक बालके आईबाप असूनहि योग्य मार्गदर्शनाभावी पोरकीच आहेत यात कित्येक आई विरहीत तर कुणी बाप विरहीत असे आहेत ही सर्व मुले मी माझीच मानतो. एवढे संतान ज्योतिबाला असतां ज्योतिबानें संतानाकरिता लग्न करावयासंबंधी तुम्ही सुचवावे याचे नवल वाटते ! या सत्य युक्तिवादानें आपोआपच मित्रजनाचा आग्रह बंद झाला

पण, आपल्या पत्नीचें सौ सावित्रीबाईचे मन समजावणें हे तितके सोपे नव्हते ! पुत्राविना स्त्रीचे स्त्रीत्व पूर्ण होत नाही. कडेवर

चिमुरड्या बालकास घेतलेली स्त्री, मातृवात्सल्याभिमानानें न्हाऊन निघालेली दिसताच प्रत्येकाला आपापले बालपण शक्य तितके आठवत मातृसुख माधुरी चाखावी असे वाटल्या विना राहत नाही.

त्यातून सौ० सावित्रीबाई म्हणजे सात्विकतेची मूर्ति ! म० ज्योतिबावर सौ० सावित्रीबाईचें अकृत्रिम प्रेम ! त्या प्रेमाला कोणती उपमा द्यावी ! आपल्या पतिबरोबर जनसेवेच्या कार्यांत सदैव सक्रिय सहाय्य करणारी पवित्र देवता ! “ तिच्या मनाच समाधान कस कराव ” या विचारानी म० ज्योतिरावाच मन भरुन गेल मित्रजनाची समजूत घालून. म० ज्योतिबा घरी जाण्याकरिता निघाले नेहमीप्रमाणे काही कार्यकर्ते म० ज्योतिबाना त्याचे घरापर्यंत बोलत बोलत जाण्याकरिता निघाले

“ सहज बोलणें हित उपदेश ।।
करुनी सायास शिकविती ।।

या श्री तुकारामोक्ति प्रमाणे म० ज्योतिबाचे सहज बोलणे, ताहि अचूक मार्गदर्शक व हितोपयोगीच असावयाचे ! पण त्या दिवशी म० ज्योतिबानी आपणाबरोबर कुणीच येऊ नये असे प्रेमाने विनविले व ते एकटेच घराकड निघाले विचार करीत करीत पुण्याच्या प्रसिद्ध लाकडी पुलावरून त्याची पावले ओंकारेश्वरी वळली थोड्याच वेळात म० ज्योतिबाची विचारमालिका खंडित होऊन त्यानी आजू-बाजूला पाहिले. स्मशानात एक चिता धडधडीत होती तर दुसरी एक चिता अर्धवट विझत होती वेळ रात्रीची, ती आश्विन वद्य पक्षातील द्वादशीची रात्र असावी ! जीवंतपणी केलेलें हेवेदावे, स्वार्थपराथ इ० नाना प्रयत्नात श्रमलेले शरीर स्मशानात चीरविश्रांति करिता अग्नि-सहाय्याने वा धरणीमातेच्या उदरात पचभूतात विलीन जाते तें स्थळ मनास क्षणभर का होईना, जगाकडे, उदासपणे पहावयास लावते थोर

थोर तत्वज्ञाची जिज्ञासा प्रखरपणें स्मशान भूमितच जागृत होते असे म्हणतात

आज म० ज्योतिबाचे लक्ष संताना निमित्तानें दुसरा विवाह करणाऱ्या रुढीवर केंद्रित झाले होते कितीवेळ विचारात गेला कुणास ठाऊक ! पण मध्यरात्र तर केव्हांच टळून गेली होती रात्रीच्या तिसऱ्या प्रहराचा शेवट होण्यात होता अशा शांत वेळी म० ज्योतिबाना मुठा नदीवर जाणारी अस्पष्ट अशी मानवाकृति दिसू लागली इतक्या रात्री ही मानवाकृति नदीकडे का जात असावी बरे ?

'ज का रंजले गांजले । त्यासी म्हणें जो आपुले' ।।

म० ज्योतिबा बसल्या जागेवरून उठून त्या आकृतीच्या मागोमाग जाऊ लागले त्याच्या मनानें हेरले कीं, मानवाकृति आपल्या दुःखाचा शेवट करण्याकरिताच मुठेवर जात आहे ते त्या आकृतिच्या अगदी जवळ आले स्मशानात जळणाऱ्या चितेच्या उजेडात आता त्याना स्पष्ट दिसू लागले ती मानवाकृति म्हणजे एक जीवनाचा शेवट करण्याकरीता आलेली स्त्री होती त्या स्त्रीने लुगड्याचा पदर खोचून घेतला, नदीत उडी टाकण्याकरिता मनोमय प्रार्थना करून तीनें हात जोडले व आता उडी टाकणार तोच म० फुले धावत येऊन त्यानी त्या स्त्रीचा हात धरुन तीला आत्महत्तेपासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. दुःखी स्त्रीचा वर्ण गोरापान असून, मध्यम बांध्याची व स्वरुपवान होती. म फुले यानी तीला जीव देण्याचे कारण विचारताच तीनें 'आपण उच्चवर्णीय विधवा असून आपणाला पतीनिधनानंतर चार महिन्यात असहायस्थितीचा फायदा घेण्यास टपलेल्या पशुतुल्य माणसानें आपली पाशवी वासना पूर्ण करुन घेतली मी आता पाच महिन्याची गरोदर असून मला आत्महत्तेशिवाय दुसरा कोणताहि मार्ग उरलेला नाही, ही त्या अभागीनीची अंतःकरण वदीर्ण करणारी करुण कहाणी ऐकून म० फुलेंचे डोळें भरुन आले.

व ते त्या अभागिनीस म्हणाले की, "मुली तुझ्यावर त्या नरराक्षसानें अतिशय बिकट प्रसंग आणला आहे यात शंका नाही पण, तू जीव दिल्यानें समाजात चालू असलेल्या विधवांच्या बाबतीतील असले निंद्य प्रकार थोडेंच बंद होतील ? तू जीव देऊ नकोस तुझ्यावर कोसळलेल्या संकटाचे समाजाच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालून बालविवाहापासून होणारे तोटें व निरक्षरतेंनें स्त्री ही मरेतोवर या काळात अबलाच कशी राहते हे जगाला दाखवून दे !

साक्षर हो ! व तुझ्याप्रमाणें असणाऱ्या विधवांच्या, सधवांच्या सेवेत राहिलेले आयुष्य खर्ची घाल त्या विधवेनें म० फुलेंचे म्हणणे लक्ष पूर्वक ऐकले तिला हा उपदेश पटला पण ! कुठं जायचं ? कोण ठेऊन घेईल ? इत्यादि प्रश्न तिला भेडसावू लागले तशातून ती पाच महिन्याची गरोदर ! म० फुले यानी तिच्या चर्येवरील भाव ओळखून तिला आश्वासन दिले कीं, 'मुली मी तुझा धर्मपिता आहे. योगायोगानेंच तुझी माझी गाठ पडली. मला मुलबाळ नाही मी तुला माझी धर्मकन्या मानून तुझा व तुझ्या पोटी येणाऱ्या जीवाचा सांभाळ करीन. माझ्या पत्नीला तुला पाहून आनंद वाटेल, असे आश्वासन देऊन त्या स्त्रीला म० फुले यांनी आपल्या घरी आणले.

सौ० सावित्रीबाई त्या चिंतेत होत्या त्याना रात्रभर झोप लागली नाही त्या आपल्या मनाला विचारीत होत्या कीं, आपलं काही चुकलं कां ? संतती करिता दुसरें लग्न करण्याचा मीहि तिकडे सारखा आग्रह करु लागले म्हणून माझा राग येऊन जर स्वारी रात्री कुठें जायचं ते न सांगता गेली नसेल ? अशा नाना विचारानी त्या रात्री सौ० सावित्रीबाईना भंडावून सोडले म० ज्योतिबाचे पत्नीपद लाभल्याचा सौ० सावित्रीबाईना मनापासून धन्यता वाटत होती. पत्नी ही पतीची अर्धांगी पण खऱ्या अर्थाने अशी वागणूक कितीशा घरांत मिळते ? म० फुलें पत्नीला जीवाभावाच्या मैत्रिणीचा मान देत असत आपले कोणतेहि हृद्‌गत पत्नीला मोकळ्या मनाने सांगून तिचे सहाय्य घेत आपले मत

जर तिला पटले नाही तर आपलेच कुठें तरी चुकत असले पाहीजे म्हणून आत्मनिरीक्षण करीत थोडक्यात म्हणजे म० ज्योतिबा व सौ० सावित्रीबाई देहानें भिन्न पण मनाने अेक होते सौ० सावित्रीबाईनी म० फुल्यांना दुसरे लग्न करण्याचा आग्रह केला असता म० फुले म्हणाले होते, 'तुमच्या सारखी सद्‌गुणी, सुलक्षणी, स्त्री पत्नी व मैत्रिण म्हणून लाभली हे मी त्या जगन्नियंत्याचे उपकारच मानतो. तुम्ही ज्योतिबाच्या कार्याची चैतन्य देवता आहात जाणून बुजून जनसेवेचेव्रत घेतलेल्या ज्योतिबा करिता, तुम्ही सार्‍या मौजा, सुखाच्या कल्पना, याना तिलाजली देअून पति करिता छे ! कार्याचे महत्व कळल्यामुळे जोगीणीचें जीण आनदानें भोगीत आहा ! मला सतान नसल्याचे तुमच्या सारखे दुःख होत नाही मी स्विकारलेल्या जनसेवेच्या व्रतात आज जे शेकडो नव्हे हजारो जीव भाग घेत आहेत तेच माझे खरेखुरे सतान ! मग आपण निपुत्रिक आहो असें का बरे मानता ? आणि घटकाभर आपण निपुत्रिक आहो हे मी मान्य करतो पण ! तेवढ्याकरितां मी दुसरे लग्न करून माझ्या या जन्माच्या सोबतीणीस क्षणभरहि दूर करण्यास तयार होणार नाही ! या सभाषणाच्या आठवणीनें सौ० सावित्रीबाईचे सर्वांगी रोमांच आले, डोळे भक्तिभावाने भरून आले व कोणत्याहि प्रसगी आपले एकपत्नीव्रत भगू न देणार्‍या पुराणकालीन रामरायाच्या स्वरुपात म० फुले दिसू लागले त्यानी आदराने हात जोडून आपल्या सौभाग्याच्या पायी मनाने क्षणभर, नतमस्तक झाल्या. नित्य सहवासात असूनहि काही थोर व्यक्तिच्या कृतिचे महत्वमापन आपण सहसा करीत नाही, करावेसे वाटत नाही पण एखादा किंचितसा वियोगाचा वेळ आला की सहवासात अनुभवलेल्या प्रसगाची उजळणी मन करते व त्या वेळेला महत्व मापनहि होते.

अशा विचारांत पहाटेची वेळ झाली. शेजारी काही घरातून जात्याघर दळणाचा व त्याबरोबर म्हटल्या जाणार्‍या ओव्यांचा आवाज अैकू येऊ लागला, त्या सरशी सौ० सावित्रीबाईनी नित्यकर्मे आटोपून

सडा रांगोळी ही कामे आटोपून वेणीफणी करून, स्नान उरकून घेतले व आपल्या सौभाग्याला शोधून आणण्याकरिता त्या घराबाहेर पडणार तोंच म० फुले त्या मुलीसह आंगणात दत्त म्हणून उभे असलेले त्यांनी पाहिले सौ० सावित्रीबाईंनी धावत जाऊन आपल्या सौभाग्याला नम्र-भावे वदन केले. म० फुले आनदून " आम्हाला सततीकरिता दुसरे लग्न करा ! लग्न करा ! असा सारखा हट्ट चालविला होता ना ? घ्या ! आम्ही दुसरे लग्न नकरताहि "आपली मुलगी आणली साभाळा आता आपल्या मुलीला ! " असे म्हणाले हे ऐकतांच " अगबाई ! खरच का ? " असा आश्चर्योद्गार सौ सावित्रीबाईच्या मुखातुन निघाला त्या मुलीनें " आई ! आई नमस्कार करते " असे अक्षरश सौ सावित्रीबाईच्या पायावर डोके ठेवून अश्रुवर्षाव केला. त्यावेळी सौ सावित्रीबाईस नैसर्गिक मातृत्वाचाउमाळा उसळून आला. त्यानी त्या दु:खी अबलेला पोटाशीं धरले.' खरच ! आमची मुलगी आहेस. रडू नकोस ,, असा धीर दिला, आणि मग जेव्हा तो दु:खि जीव सौ. सावित्रीबाईच्या मातृवत हस्तस्पर्शानें सुखावला माहेरच्या दुरावलेल्या स्वप्नमय कल्पना येथे साकार होतील . हा विश्वास दृढावू लागला.

कुठे नुसत्या नावाचे उच्चवर्णीयत्व ! आणि कुठें खरोखरचें हे सद्गुणमडित उच्चमानत्व ! नुसत्या जन्माने मानव हा कधीच श्रेष्ठ ठरत नाही, ठरला नाही, व ठरणारहि नाही दुसऱ्याच्या अज्ञानावर स्वताच्या जन्माचे श्रेष्ठत्व स्थापणारे, मानव की, मानवतेचे शत्रु ! याचा निवाडा नि.स्पृह न्यायवंतांनीच लावावा ! जन्म श्रेष्ठ की गुण श्रेष्ठ ? या सबधीच्या विचार मन्थनात जन्मरुपी ताकातून गुणरुपी लोणी सर्वालिप्तपणें उठून दिसते

गुणाच्या योग्यतेने मानवीजन्म भूषित होतो जन्माने नव्हे! आणि म्हणूनच 'गुणा पुजास्थानम् ! गुणिषु नच लिग नच वय ! 'असे ज्यावेळी जातीभेदाचा राक्षस जन्मास आला नव्हता त्यावेळी पुर्वमानवानी गुणपू-

जन व तेहि स्त्रीपुरुष असा लिंगभेद न मानता केले, करविले गुणाचा वारसा गुणालाच मिळतो तो जन्मअवस्थेने मिळविण्याचा प्रयत्न करणें, करविणे म्हणजे चारशेंवीसचा धाडसी प्रयोग। "पवित्र ते कुळ, पावन तो देश ! जेथें हरीचेदास ! जन्म घेति" वरील संत तुकाराम वचनात "जेथे मानव्याचे दास जन्म घेति" अेवढा फरक केला तर म फुल्याच्या कार्यांचे महत्व चटकन लक्षात येण्यास मदत होते.

या हतभागी दुष्ट धर्माच्या नावाखाली वाढविण्यांत आलेल्या दुष्ट रुढीच्या खाईत क्षणोक्षणी जिचे जिवीत जळत होते, तिच्या मनात शाब्दिक वर्णश्रेष्ठत्वाचा तिटकारा वाटून मरावे पण म. फुले व साध्वी सावित्रीबाई, यासारख्या सद्‌गुणी आईबापाच्या पोटी जन्म मिळावा असें न आले तरच नवल !

त्या दुर्दैवी स्त्रीच्या तोंडून तिचा सर्व वृत्तात सौ सावित्री बाईना समजला. त्यावेळी त्याना आपल्या सौभग्य चिंतामणी म फुले याच्या औदार्या विषयी अधिकच आदर वाटू लागला. वाचकहो ! म. फुले यानी 'जसे बोलावे तसे वागावे." या सत्यव्रताचें ते व्रतधारी होते. नाही पेक्षा 'लोकां सागें ब्रम्हज्ञान, आपण कोरडा पाषाण " अशा वर्तनाचें लोक कधी महात्मा कां असतात ?

विधवा स्त्रीयावर पाशवी अत्याचारी याकडून गर्भवति होण्याचा वा लोकलज्जाभयानें प्राणनाशाच्या संकटात उडी घ्यायला लावण्याचा प्रसग अनाथ विधवावर अेऊ नये म्हणून म. फुलेनी तर्कशुध्द विचारानी अनाथ बालगृहाची आवश्यकता जनतेला पटवून अनाथ बालकगृहाची स्थापना केली त्या अनाथबालगृहात वाटचुकलेल्या स्त्रीयांना बाळतपणा-करिता आश्रय देऊन त्या स्त्रीच्या मनावर पुनरपी असे दुवर्तन होऊ नयें या विचाराचे संस्कार ठसविण्यात येंत असत

या मुलीचे कन्येंप्रमाणे धैर्यानें सांभाळ करुन तिचें बाळतपण केले. लोकात कुजबूज सुरु झाली विरोधकानी तर—

विरोधी प्रचाराने आकाश पाताळ अेक करून सोडण्याचा आव आणला जनतेंत वाटेल ते खोट्यानाट्या कड्या पिकविण्यात येअू लागल्या सौ सावित्रीबाई सूक्ष्मपणे म फुल्यांवर याचा काय परिणाम होतो तें पाहू लागल्या पण त्याना आपल्या सौभाग्याच्या धीर गभीरतेत काडीचाहि बदल झालेला दिसून येईना लोकनिंदेची पर्वा सत्यनिष्ठेला बुजवू शकत नाही श्री तुकारामानी म्हटले आहे की, ! -- " काय माझे नेति वाईट म्हणूनि करु समाधान कशासाठी " अविवेकी व पूर्वग्रह दुषित असणाऱ्या कडून कोणत्याहि सत्यभक्ताची निंदेने संभावना होत असते किंवा हा सत्यासबंधी जणू काहीं सकेतच ठरला आहे परन्तु कर्तव्यपरायण महात्मे निंदेने खचून जात नाहीत उलट ते अधिक जोमाने कर्तव्याचे, कर्तव्याने पजन करीत असतात म. फुल्यानी अगीकारलेले कार्य साधेसुधे नव्हते परकीयाकडून स्वराज्य मिळविणे सोपे पण स्वदेश बांधवाच्या मताचें परिवर्तन करणें कठीण !

म० फुल्यांनी त्या दुःखी मुलीचा नुसता सांभाळच केला नाही तर तिच्या पोटी जन्म पावलेल्या मुलास दत्तक घेअून उजळ माथ्यानें जगांत जगण्याचा अधिकार प्राप्त करुन दिला आहा ऽ हा ऽ ! केवढे औदार्य ! काय हे धैर्य आहे ! अशा सत्यशोधकास कोणी जातीयवादी, उच्चवर्णीयाचा द्वेषी असे अविचाराने म्हणतात पण त्याना म फुल्यांच्या पवित्र व राष्ट्रनिष्ठ कार्याची ओळखच झाली नाही असे खेदानें म्हणावें लागते जर महात्मा फुल्याच्या मनांत उच्चवर्णीयाचा मत्सर, द्वेष असता तर म. फुल्यानी दुर्दैवाच्या कचाट्यात सापडलेल्या स्त्रीचा श्रेष्ठ वर्णीयाची फजिती करण्याकरिता उपयोग करुन घेतला असता ! पण म फुल्यांनी उलट तिचे व तीच्या अब्रुचे रक्षण करून महान मानव्याच्या मगलतेचे दर्शन घडविले जातीभेद, धर्मभेद, लिगभेद व सधन, निर्धन हा भेद मनात न आणता माण-सातील माणुसकीची ओळख करून दिली त्या नरश्रेष्ठ फुल्याना विरोधक

जातीयवादी खुशाल म्हणोत पण इतिहास मुक्तपणे हे सांगत राहील कीं, म. फुले हे खरे राष्ट्रनिष्ठ व मानवतेचे उपासक होते

पुनर्विवाह रुढ होण्यास [illegible] कालवधी लोटणार आणि त्यावर स्त्रीयाची कुचबणा होत राहणार हे म ज्योतिरावांच्या तेंव्हाच लक्षात येऊन चुकले. विधवा स्त्रीयांना शील रक्षणाचा उपाय म्हणून बिद्रुप करण्यात येई ब्राम्हण व तत्सम जातीतील विधवाच्या डोक्या-वरील केंस न्हाव्याच्या वस्तऱ्यानें सफाचट करवून सन्याशाच्या डोक्याप्रमाणें तुळतुळीत गोटा करीत व तिला विशिष्ट रगाचेच वस्त्र नेंसावयाला पाहिजे अशा विधवाची कोणत्याहि मगल प्रसगी उपस्थिती राहू नये, एखाद्या कामाला जातांना जर विधवा दिसलीच तर अपशकून होतो. यापेक्षा अधिक विटबना ती कोणती ? म० ज्योतिरावानी या स्थितीला दूर केले अशा विधवा झालेल्या तरुण स्त्रीयांकडून, नव्हे पुरुषाच्या दुष्कृत्याला बळी पडलेल्या स्त्रीयाकडून अनीतीकारक वेडे पाऊल पडले, पडले म्हणण्यापेक्षा पाडले तर अशापासून होणारी सतती किंवा हे गर्भनाशाचे प्रयत्न, लोकलज्जेस्तव स्त्रीकडून होत आणि या नीच कृत्याची जबाबदारी ज्या नरपशुवर गुप्तपणें असे तो गर्भपातादि कृत्यें विधवा स्त्रीला करावयला लावी. त्या सतानाला नख देऊन मारण्याचे किंवा ओंगळ अशा गटारात फेकून देणें असें प्रकार नित्य होत म्हणून म० ज्योतिरावानी पुणे शहरांत इ स १८६३ सालीं आपल्या सहका-ऱ्याच्या सहाय्यानें एक वाडा बांधून बालहत्या प्रतिबधक गृह स्थापन केले या गृहात कुठल्याहि सकटग्रस्थ विधवेनें यावे आणि बाळत होऊन ते मूल सोडून द्यावे असा नियम केला होता. त्या मुलाचे सगोपन या गृहात केलें जाई पण या सत्कृत्यास देखिल कुटाळांचा विरोध झालाच कारण त्याना उघड उघड अशा स्त्रियाची कुटाळकी करण्याची सधी मिळेनासी झाली म० फुलेच्या मित्रपरिवाराने या कार्यास बरीच आर्थिक व शारीरिक मदत केली या योजनेमुळे पुण्यातील बरीच अर्भकें जीवत राहिली या मुलातील पुढे म० ज्योतिबानी एक मुलगा दत्तक घेतला त्याचे नाव यशवत । त्याचा जन्म १८६५ साली याच प्रति-

बधक गृहांत् काशीबाई नामक एका ब्राम्हण विधवेच्या पोटी झाला

म० ज्योतिरावाच्या प्रयत्नाचें श्री. रानडे यानी फार मोठे कौतुक करून तनमनानें साह्य केले. तीर्थक्षेत्राचे ठिकाणी तर गर्भपात व अर्भक त्यागाचें प्रकार अधिक होत. न्यायमूर्ति रानडें यानी ही संस्था पुढे पंढरपूरास नेली. अजूनहि ही संस्था पंढरपूरास चालू असून तिचा फायदा अनाथ बालकाना होत आहे. न्यायमूर्ति रानड्यानी या उपक्रमाची जबाबदारी स्वतःवर घेतल्यानें म ज्योतिरावानी या विषयावरील आपले लक्ष कमी केले. सतत दहा वर्षेपर्यंत ही संस्था म० फुल्याच्या नेतृत्वावर जोमानें व नेटानें पुण्यात चालविण्यात आली.

स्त्रीयांमध्यें आज जे परिवर्तन आपण पाहतो तें महात्मा फुले यांच्या प्रयत्नाचे फळ होय. अन्यथा स्त्रीयाची स्थिती पूर्वीसारखीच राहिली असती पुनर्विवाहाची प्रथा आज सर्रास सुरुं आहे. केशवपन जवळ जवळ बंदच झाले आहे. स्त्री संघटना वाढली आहे आणि स्त्रियाना समान हक्क देखिल आज बऱ्याच अंशाने मिळालेलें आहेत म० फुल्यांना महिलाचे देव, स्त्री स्वातंत्र्याचे आद्य प्रणेते किंवा कैवारी म्हणून संबोधण्यात येते म० फुलेंचा फोटो एक ब्राह्मण विधवा आपल्या देव्हाऱ्यात पूजीत असे त्याच फोटोमुळ म० फुले याचे चित्रदर्शन होत आहे. सत्य इतिहासाची स्मृति महिला समाजानें ठेवायला नको का ? म० फुले यांचा पुण्य जयंत्युत्सव ठिकठिकाणच्या महिला मंडळानें साजरा करून म० फुलेचे चरित्र ज्ञात नसलेल्या स्त्रीवर्गास ज्ञात करावयाचे कर्तव्य केल्यास आजच्या महिलाच्या उद्धारास खचीत मार्गदर्शक होईल यांत संदेह नाही म० फुलेचे प्रयत्न मानव जातीकरिता होते. ते मर्यादित विशिष्ट जातीकरिता नव्हतें. म० फुलेंच्या या स्त्री स्वातंत्र्याच्या प्रयत्नानी कल्याण झाले तरीहि या विरोधकांनी या महात्म्यास ब्राह्मणेतर, किंवा ब्राह्मणाचें विरोधक म्हणून मानावे हा केवढा दैवदुर्विलास ! दुर्दैव ।।

★ ★ ★

# पितृनिधन ●●● ६

गोविंदरावांचे मन म० फुलेंनी संततीकरता दुसरे लग्न करावे असे फार फार होते हे मागे आलेच आहे. म० फुलेंनी योग्य असा प्रसंग पाहून आपल्या पित्याचे मन न दुखविता पुत्रधर्माला साजेशा नम्रतेनें बोलून परिवर्तन केले अस्पृश्यांच्या व बाया मुलींच्या शाळेमुळे धार्मिकांनी बहकविल्यामुळें जरी म० फुल्यांना आपल्या पित्याचा प्रेमळ सहवास सोडावा लागून गृहत्याग करावा लागला असला तरी म० फुले हे आपल्या नवकार्याच्या आरंभी पितृदर्शनाकरिता येऊन गोविंदरावांचा आशिर्वाद घेत असत

गोविंदराव आता बरेच थकले होते म० फुल्यांच्या कार्याचे महत्व दिवसेंदिवस त्यांना पटत चालले होते खऱ्या मानवधर्माची ओळख म० फुलेमूळेच त्यांना अुशीरा का होईना झाली होती म० फुलेवर प्रेम करणाऱ्या मंडळींना ते वरचेवर त्यांना घरी बोलावून म० फुलेंना कधी विसरू नका ही विनंती अंतरीच्या तळमळीनें सांगत.

पुत्र कितीहि मोठा झाला, विद्वान झाला तरी मात्यापित्यांना तो लहान व अज्ञान वाटतो आणि त्याच्या भल्याकरिता रात्रदिवस शरीरानें मनाने त्या इशतुल्य प्रेमी जनाची तगमग आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत चालूच असते

या वरील सिद्धांताप्रमाणें आता गोविंदरावाचे-आयुर्धन संपत आले होते या अफाट जगात मातेविणा सांभाळलेल्या एकुलत्या अेक पुत्रास ज्योतिरावास

आपणास सोडून जावे लागणार, कसें होईल त्याचे ! या चिंतेचे वेध गोविंदरावांच्या जीवास लागून राहिले होते. पुत्रासंबधीच्या पितृ—हृदयाच्या संवेदना ह्या अशा असतात

म० फुले, आपल्या वडीलाची प्रकृति खालावलेली पाहून सर्व कार्याचा व्याप बाजूला सारून आपल्या पत्नी सौ० सावित्रीबाई-सह गोविंदरावांच्या, पित्याच्या सेवेतच वेळ घालवू लागले. रात्रंदिवस पितृसेवेत म० ज्योतिराव भूक तहानहि विसरत सौ० सावित्रीईनी फारफार आग्रह करावा, इतकेंहि करून जर म० फुल्यांनी अैकले नाही तर, वेळ साधून आपल्या सासऱ्याच्या गोविंदरावांच्या काना-वर घालून त्याचेकडून कांही खाऊन ये, असे सांगावयास लावीत.

पित्यानें 'कांही खाऊन ये' असें सांगताच म० ज्योतिबा निमूट-पणें जेवणास जात. जेवण होताच पुन्हा वडीलाचे जवळ येऊन त्याचे पाय चुरत बसत केवढी ही पितृभक्ती ?

"मायबाप काशी, तेणें न जावे तीर्थासी" श्री संततुकारामानी जन्मदात्यांची योग्यता केवढी मोठी आहे हे वरील अभंगात स्पष्टपणे दाखवून दिले व म० फुलें मनोभावे पितृसेवा करीत हे पाहून त्यांच्या निकटवर्तियांच्या मनावर म० फुले संबधी वसत असणारा आदर द्विगुणीत झाला.

"मरणं प्रकृति शरीराणाम्" असे रघुवंशात म्हटले आहे. ते योग्यच होय ! मृत्यूनें कुणाला तरी सोडल आहे का ? छे ! कधीच नाही ,, शूरवीर , राजा रक, स्त्री, बालवृध्द, साधुअसाधू, सज्जन दुर्जन असा भेद त्याने कधी केल्याचे अैकिवात नाही.

गोविंदारावांना औषध देणारे मिशिनरी डॉक्टरानी आजची रात्र कठीण आहे असे म. फुलेंना अेकीकडें नेऊन सांगितले. अैनवेळी काय काय औषधे द्यावीत त्या सूचना करून डॉक्टर निघून गेले डॉक्टरानी एका बाजूला नेऊन म फुलेना काय सांगितलें असेल याची कल्पना सौ सावित्रीबाईना तत्काळ आला त्यांच स्त्रीसुलभ हृदय पुढील संभाव्य घटनेच्या कल्पनानी हांदरल, त्या विकल्पाग

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३२-२५५ वि: चरित्र
क्रमांक ........ नों. दि. १६/१२/५४

झाल्या म. फुल्यांच्या लक्षांत येताच त्यांनी आपल्या पत्नीला धीर दिला पण स्वत फुलेंचा आवाजहि दुःख वेदनेनें भरून आला होता।

आपल्या प्रेमळ शेतकऱ्यांना - आपण केलेले समाजसेवेचे ईशभक्तिचें अभगाचे भजन म्हणावयास लावून मा फुलेनी गोविंद-रावाना घोगडीवर घेतले त्याचे मस्तक आपल्या माडीवर घेऊन बसले गोविंदरावनी डोळे उघडुन पाणी मागितले सौ सावित्रीबाईनी पाण्याचा-घोट त्याना पाजला गोविंदराबानी मा० फुल्याचा व सौ० सावित्री बाईंचा हात हातात धरून दोघांना सागितले साभाळा आता अेंक-मेकाना. तो सत्यरूपी परमेश्वर तुमचें रक्षण करो! बस्स! अेवढे बोलून गोविंदरावाचा आत्मा देहकुडीचा त्याग करून अनतात विलीन झाला.

मा० फुलेंनी बाबा! असें म्हणून त्यांच्या छातीवर डोके ठेवताच अश्रूचा पूर वाहू लागला।

गोविंदराव आपल्या सुपुत्राला 'आहो जाहो, म्हणुनच सबोधित, पण मा० फुलेना अरे ज्योती असे आपल्या वडीलांनी म्हणावे असें वाटन असे झाले पित्याचें सर्व अत्यसस्कार मानवतेला धरुन केले. त्यातील रुढ वेडगळ कल्पनांना वाव मुळीच दिला नाही धार्मिक कृत्यें शक्यतो ज्याची त्यांनीच स्वत केली पाहिजेत हे तर म० फुलेचे व्रत!

म० फुलेंनी आपल्या पित्याचें श्राद्धहि नवोदित पद्धतिने केले. आधळे, पागळ, अनाथ विद्यार्थ्याना जवण दिले. आंधळचापागळयांना जरुर असणारी वस्त्रे नवीन घेऊन दिली. अनाथ मुलामुलींना पाट्या पुस्तके व कपडे दिलें व ही प्रथा म फुल्यांनी आपल्या हयातीपर्यंत चालविली हे वर्तमान १८६४ मध्यें झाले.

★ ★ ★

# सत्यशोधक समाज व त्याचे कार्य ● ● ● ७

विशिष्ठ तत्वप्रणालीचा प्रसार करणें किंबहुना बहु संख्येनें अंगीकार करावयास लावणे या करीता संघटनेची अत्यंत आवश्यकता असते किंवा दिव्यत्वाचा अविष्कार घडवावयास सामर्थ्यशाली होणें जेवढें जरुर आहे, तेवढीच दिव्यत्वाची साधना कठीण आहे आणि ती सर्वांगीण करण्याकरीता त्या दिव्यत्वाची प्रचिती इतरांना घडविण्याचे सामर्थ्य अंगी आणणे तिने इतरेजनाना दिपविणे हे त्याहुनहि कठीण। म० फुलेंना घडलेला मानव्याच्या दिव्यतेचा साक्षात्कार त्यानी इतरांनाहि घडवून देण्याचे ठरविले अर्थातच त्याकरिता समगुणी, समस्वभावी माणसें मिळवावी लागली सत्याविषयीची निष्ठा बाळगणें व वागणे ही सर्वसाधारण माणसास अत्यंत कठीण गोष्ट आहे ती सर्वांगदृष्टया जीवनात उतरवितो म्हणून कुणी ठरविले तर सत्य कशी कसोटी बघते ? हे म० फुल्याच्या जीवन चरित्रावरुन कळतेच पण असे सत्यस्वरुपी थोर महात्म्ये आपल्या स्वयंप्रकाशात इतराच्या जीवनाचा मार्ग उजळ करण्या-चेच कार्य करीत असतात.

म० फुलेंनी आरंभिलेल्या कार्याचा व्याप हळूहळू प्रगल्भ झाला होता. त्यामुळे एकटचा दुकटचानें या व्यापाला सांभाळणे कठीण झाले होते शिवाय ह्या मानवतेच्या पुरस्कारार्थ अधिकाधिक माणसें तयार व्हावीत याकरिता एक मजबूत अशी संघटना उभारल्याशिवाय किंबहुना संघटनेशिवाय कार्यशकट चालणें, चालत राहणे शक्यच नव्हते म्हणून त्यानी एक विनती पत्रक काढून कार्यकर्त्यांसह इतर व्यक्तिंची एक सभा

बोलाविली सभेत संघटनेची आवश्यकता, संघटनेपुढील कार्य या विषया-वर म० फुलेंचे एक कळकळीचे व्याख्यान झाले तात्विक चर्चा झाली. शंकासमाधान होऊन कार्याची रुपरेषा ठरली आणि दि २३ सप्टेंबर १८७३ रोजी झालेल्या जाहीर सभेत "सत्यशोधक समाजाची" स्थापना झाली. सत्यशोधक समाजाची प्रमुख अशी तीन तत्वे होती

(१) अिश्वर एक असून तो निर्गुण, निराकार आहे तो सत्य स्वरुप आहे. मानव प्राणीमात्र सर्व त्याचीच लेकरे आहेत .

(२) अशा या सत्यस्वरुपाची प्रचिती, अनुभूति घेण्याकरीता त्या दिव्यत्वाच्या प्राप्तीसाठी किंबहुना या अिश्वर दर्शनासाठी प्रत्येकानें स्वप्रयत्नानें, स्वतःच्या साधनेने जावयाचें आहे त्या ठिकाणी मध्यस्त व दलाल याची मुळीच आवश्यकता नाही.

(३) आणि तिसरे पण महत्वाचे हे कीं, अशा या अिश्वर प्रणित मानव प्राण्यांत जन्मसिद्ध श्रेष्ठाश्रेष्ठता असणें मुळीच संभवनीय नाही. ·त्या अिश्वरास सर्व जीव सारखे आहेत ईश्वरानें निर्माण करताना कुणाला श्रेष्ठ वा कनिष्ठ म्हणून जन्माला घातलेले नाही जो तो स्वत च्या गुणानुक्रमानें श्रेष्ठ अगर कनिष्ठ ठरतो.

हिंदू संस्कृतीतील देवत्वाची कल्पना जरी श्रेष्ठ तऱ्हेची असली तरी व्यापारी नव्हे पोटार्थी वृत्तीच्या लोकांनी त्या कल्पनेचे मूळचें स्वरुप बदलून देवत्वावर आपला अधिकार प्रस्थापित केला आणि बहुसंख्य जनतेला खऱ्या देवत्वापासून शभर हातच नव्हे फैक योजनें दूर ठेवविले अज्ञजनाना केवळ दगडधोंड्यातच व तेहि दुरून देवत्व बघावे लागले. आणि अशा देवत्वालाहि नाना नामांनी, भिन्न अवतार कथांनी अज्ञजनाची दिशाभूल केली नाहीपेक्षां मुसलमानाचे देव हिंदूच्या देव्हाऱ्यात कधीच बसले नसते ज्याला आपल्या स्पर्शाने विटाळ होत नाही, असा परक्याचा जरी असला तरी आपला तो विटाळ मानीत नाही म्हणून हिंदूपेक्षा परकादेव, हिंदूतील हीन समजलेल्याना आपला वाटू लागला तर धार्मिक माठाळांनी नाके मुरडण्याचे कारण काय ?

म० फुलेंनी या सत्यस्वरुपी, अव्यक्त, अदृश्य अशा परमतत्वाथीचे दिव्यदर्शन जनतेला घडावे म्हणूनच खुळचट कल्पना आणि भ्रामकवृत्ती यावर प्रखर हल्लाकरून जनतेला सत्याचे दर्शन घडविणे हे सत्यशोधक समाजाचे आद्य आणि प्रथम तत्व ठरले. अशा अव्यक्ताच्या दर्शनार्थ, स्वप्रयत्नानेच पोहोचावयास पाहिजे त्या करिता दलालाची, मध्यस्थाची आवश्यकता नाही मानवी सदाचारण व सत्कृति यावर त्याचा जोराचा भर होता धर्माने मनुष्य इश्वराकड पोहोचतो धर्म म्हणजे संप्रदाय नव्हे । धृ धरण धारणा करणे अर्थात ज्या-गुणांची धारणा मनुष्य करून घेतो तो त्याचा धर्म हे लक्षात ठेवले पाहिजे, असावयास पाहिजे सत्कर्मनिष्ठा म्हणजेच धर्मनिष्ठा । हा अिश्वराचा अंश आहे. हे त्रिकाल सत्य असल्याने ईश्वराला नव्हे आपण आपणाला जाणावयाला पाहिजे तदर्थ लागणारी निष्ठा म्हणजेच धर्मनिष्ठा । तदर्थ व्रतवैकल्ये आणि उपवास तपादि साधने, पण जर सदाचार व सत्कृत्यनिष्ठा असेल तर त्याला कोणत्याच साधनाची मुळीच आवश्यकता नाही अिश्वरावरील निष्ठा हा सत्यधर्म । किंबहुना तो जाणावयासाठी करावयाचा प्रयत्न म्हणजेच धर्माचरण । अशा धर्माचरणाकरिता अेकाला अधिकार आहे आणि दुसऱ्याला नाही हे अगदीच अशक्य । आणि असा अधिकार जन्माने प्राप्त होत नाही तर तसा अधिकार सर्वांनाच सदाचाराने प्राप्त करुन घेता येतो चातुर्वर्ण्य गुणानुक्रमाने निर्माण केले, ते वेदप्रणीत वा अिश्वर प्रणीत नाहीत, याचे प्रत्यंतर आज आपणास घडत आहे. ते असे की, एखादा उच्च जातीचा माणूस व्यवहाराचे साधन म्हणून जोडयाचे दुकान टाकतो, म्हणून त्यास कुणी 'चांभार म्हणतो का ? वास्तवता तो चामड्याच्या वस्तूंचा तो विक्रय करतो तेव्हा त्यास चांभार म्हटले तर बिघडले कुठे ? पण नाही । तसे कुणी म्हणत नाहीं मग स्नानसंध्या करणाऱ्या चांभारास ब्राम्हण म्हटलें तर त्यात अनाठाअी असे काय आहे ? तेव्हा ही श्रेष्ठाश्रेष्ठता गुणावरून ठर-वावयाची असते वास्तवतेत जन्मत च सर्वच श्रेष्ठ असतात

म० फुले किंवा सत्यशोधक समाजाचे लोक अिश्वरास मानीत नाहीत ! या आक्षेपास उद्‌भवण्याचे कारणच नाही म० फुल्यांची अिश्वर निष्ठा अेवढी गाढ होती की, त्यानी आपल्या कर्मानुचरणानें आद्यतत्व ठरवून त्याप्रमाणे निशीदिनी वागत. देवळात जाअून देवाला नमस्कार केल्यानें किंवा तीर्थादि यात्रा करण्याने सिद्ध होते असे नाही. श्री. तुकाराम महाराजांनी म्हटले आहें " तीर्था जावुनिया काय तुवा केलें । चर्म प्रक्षाळिले वरोवरी ॥ अतरीची शुध्द कासयाने झाली ! भूषण त्वा केलौं आपुणासाठी ॥ यात चित्तशुध्दी करितांच हे देवदर्शनादि तीर्थप्रयोग करावयाचे असतात पण जर या अुपायांनी चित्तशुद्धी झाली नाही तर केवळ मोठेपणा प्राप्त करून घेण्याकरताच हा दभाचार आचरण्यात येतो त्याचा त्यानी 'धिःक्कारच केला. मूर्तिपूजा चित्ताला स्थिर करावयाचा एक उपचार आहे. अज्ञ जनाचा देव दगडात आहे असें जरी कुणी म्हणत असतील तो त्याच अज्ञजनांनी दगडातीलहि देवत्व जागृत केल्याची कैक उदाहरणे आहेतना ? सत तुकाराम, सत गोरोबा, चोखोबा, सावतोबा, ज्ञानदेव, एकनाथ आदि सतश्रेष्ठानी तद्वत जनाबाई, मुक्ताबाई आदि स्त्री सतांनी देवत्वास पाषाणातच जागृत केले ही अकल्पनीय कामगिरी सताकडून म्हणजेच अवतारी महात्म्याकडूनच होऊ शकली बहुजन समाजाकरितां,नव्हे ज्याना देवाच्या पायालाहि स्पर्श करण्याचा अधिकार नव्हता, अशांच्या करिता निर्माण केलेला 'विठोबा' सुद्धा बडव्यानी सोवळ्या ओवळ्याच्या बळा वर बळकवावा आणि आमच्या सताना त्याच्या दर्शनाकरिता दारावर धरणे धरून बसण्याचा प्रसग यावा ! व्यवहारी, पोटार्थी, क्षुद्र जीवाच्या कुकर्माचा हा इतिहास कोण कसा विसरेल ? सत तुकाराम महाराजानी यावर म्हटले आहे,—

अगी ब्रम्हक्रिया खिस्तीचा व्यापार । हिंडे घरोघर चाडाळाचे ॥
अत्यजा खिचडी घेताती मागून । गळियाप्रदान मायबहिणी ।
उत्तमकुळी जन्म क्रिया अमगळ । बुडविले कुळ उभयता ॥
तुका म्हणे अैसी कळीयुगाचे चाली । स्वार्थे बुडविली आचरणे ।

देवाचे दर्शन होत नाही म्हणून पुढे तुकाराम महाराज दुसऱ्या अेका अभगात "देव आमुच्या मते मेला" असे उद्वेगानें म्हणते झाले ही खऱ्या भक्ताची किंमत !

म० फुल्यांना हा भिक्षुकानी बळावलेला देव नको होता स्वत:च्या अशरुप देवत्वास जागृत करून त्याच्या दर्शनानें पुनीत व्हावे, हाच तो सत्यधर्म ! आणि तो आचरावयाचा पूर्ण अधिकार आहे हेच त्यांनी जीवनभर आचरले व लोकाना सांगितले, यापरते कोणाचे काय घोडं मारल ? पण हेच सत्यस्वरुप उघड केले ही चूक म० ज्योतिबानी केली हे पाहून "अशाने का कोठ देव प्राप्ती होते ? सस्कृतमन्त्राशिवाय देवाला अैकूच जात नाही !" अशा तऱ्हेचे भोंगळ आरोप म० ज्योतिराव फुलेवर त्या वेळच्या धार्मिक आणि साप्रदायिक रुढीने बुरसटलेल्या माणसाकडून करण्यात आले कांही धर्मभोळचा बहुजन समाजातील लोकाना ही लोणकडी थाप खरी वाटली. कांही माणसे म० फुलेकडे जाऊन त्याना यासबधी वारवार विचारु लागली "तुमचे चुकते आहे" असे देखिल कांही म्हणू लागली. म० ज्योतिरावानी या सर्वांना निरनिराळचा मार्गानें समजावून सांगितले "इंग्रज लोकाना काही सस्कृत येत नाही, म्हणून काय त्याना देव नाही ? ते का देवाची प्रार्थना करीत नाही ? ते सुद्धा देवाची प्रार्थना करतात मसलमानास मुर्ति नाही, म्हणून का ते देवाची उपासना करीत नाही, हिंदु असो, मुसलमान असो किंवा ख्रिश्चन असो की येहुदी असो, कुठल्याहि धर्माचा माणूस ईश्वराची प्रार्थना करतो ईश्वरास हाक मारावयाचे शब्द निराळे आहेत ते मनाचे असतात ! नामदेव–तुकारामादि सताना काय सस्कृत येत होते ? मग त्यांनी देवाची प्रार्थना केली कीं नाही ? उलट सस्कृतच्या मन्त्रतन्त्रादि साधन जपानुष्ठानानें जे साध्य झाल नाही ते केवळ 'रामकृष्ण हरी' या नामोच्चाराने साध्य झाले सस्कृत येणाऱ्या एखाद्याहि पडितास सताप्रमाणे मोक्ष प्राप्त झाल्याचे एकहि उदाहरण नाही.

तुकाराम महाराज म्हणतात —

शिकल्या बोलाचे सांगतील वाद । अनुभव भेद नाही कोणा ॥
पढीत हे ज्ञानी करितील कथा । न मिळती अर्था निजसुखा ॥
तुका म्हणे जैसी लांचासाठी ग्वाही । देतील हे नाही ठावी वस्तु ॥

आदि रीतीने त्यानी लोकाना पटवून दिले त्यावेळी कुठे लोक म० ज्योतिरावाच्या मार्गावर भीतभीत येऊ लागले

धार्मिक कार्यांचा आरभ म्हणजे लग्न लावणे, मृताची क्रिया करणे, जन्म कुन्डल्या काढणे, आदि कार्यांची सुरुवात होय त्यावेळी उपरोक्त क्रियाकर्म करण्यास पुरोहिताशिवाय भागत नसे आणि पुरोहित या सत्यशोधकाचे विरोधक, मग होणार कसे ? म० फुलेनी आपल्या या सत्यशोधक सभासदामधून पुरोहित तयार केले, लग्नार्थ मगलाष्टकें तयार केली मन्त्रतन्त्र सस्कृतचे मराठीत आणले. आणि आता सामाजिक कार्य करावयास प्रारभ झाला पण ‘ धर्म बुडाला पृथ्वी प्रलय जवळ आला ’ निरनिराळया तऱ्हेनें विरोधी प्रचार सुरु झाला. सत्यशोधक समाजाचा जो कोणी सभासद होईल त्यावर बहिष्कार पडू लागला. त्या सभासदाच्या घरी जाऊन त्याच्या अज्ञ आई वडीलांना निरनिराळ्या तऱ्हेनें उलट सुलट सांगण्यात येऊ लागले पण सत्यशोधावयास निघालेले हे तरुण कुणाच्याहि विरोधास न जुमानता कार्य करू लागले तेव्हाच आज आपण काही अंशानें सत्य शोधू लागलो

सत्यशोधक समाजाच्या स्थापनेमुळे विरोधकांचा विरोध पराकोटीस पोहचला. निरनिराळी कुभाडे रचल्या गेली. नोकरी करणाऱ्याच्या नोकरीवर गदा येऊ लागली. समानता स्थापावयास निघालेले तरुण, नव्या आशेने हाल अपेष्टा सहन करून कार्य करु लागले लहान थोराना एकच एक ध्यास लागला, सर्वच जातीचे लोक सत्यशोधक समाजाचे सभासद होऊ लागले गुलामगिरीचा नाय-

नाद, शैक्षणिक चळवळ, महिला शिक्षण, अस्पृश्योद्धार, स्त्रीच्या मानवी हक्काचा अधिकार विधवांना मानाचे जीणे भूतदया, सत्याचरण, ईश्वर भक्ती आदि तत्वाप्रमाणें चालणारे लोक सत्यशोधक म्हणवू लागले,

जसजसा कार्याचा व्याप वाढू लागला, किंबहुना हा सत्यशोधी वृक्ष जसजसा फोफावू लागला ततसा त्याच्या शाखांचा विस्तार होऊ लागला. सत्यशोधक समाजाच्या दीडशेवर शाखोपशाखा होत्या. मध्य-प्रांत वऱ्हाड, महाराष्ट्र, कर्नाटक, मद्रास, मुंबई, गुजराथ आदि इलाख्या-तून व प्रमुख नगरातून सत्यशोधक समाज स्थापन झाला सर्वधर्माचे समाजाचे व पंथाचे लोक या समाजाचें सभासद झाले या सभासदामध्ये संस्थानिक, राजे महाराजे, सरदार, दिवाण, सरकारी ऑफिसर्स डॉक्टर, वकील, बॅरिस्टर्स, कॉलेज विद्यार्थी, व्यापारी दुकानदार आणि ग्रामीण लोक सामील. मोठमोठ्या शहरातून यांच्या महासभा पार पडल्या. समाजाची मुख्य कचेरी वेताळपेठ पुणें येथे होती कार्य संचालन येथूनच होत असे ! बरेच वर्षेपर्यंत ह्या संस्था पुण्यामुंबई कडें आणि विदर्भातहि होत्या. म० फुल्यांच्या या समाजानें अख्ख्या महाराष्ट्रातील दूर लोटलेला बहुजन समाज जागृत झाला, जीवंत झाला, हे कुणी नाकारू शकेल काय ?

★ ★ ★

# सत्यशोधक समाज व इतर समाज ● ● ● ८

महात्मा फुलेंच्या सत्यशोधक समाजाचे मूलतत्व ईश्वर अेक आहे हे होते

ईश्वराच्या भिन्नत्वाच्या कल्पनेवरच निरनिराळ्या धर्मांची स्थापना झालेली नसल्याने मानव संघ हा धर्म संबधात एकसंघी राहिला नाही. जो तो आपापल्या धर्माभिमानाच्या अहंकाराने दुसऱ्या धर्मास हीन म्हणून गणण्यात धन्यता मानतो आणि याचाच परिणाम धार्मिक कलह निर्माण होण्यात होतो.

पारतंत्र्यांत तर असे धार्मिकवाद स्वातंत्र्याच्या विचारापासून दूर नेतात परकीय सत्तेचे अस्तित्व या आंधळ्या या धर्म कल्पनेवरच स्थिर होत असते याची जाणीव, या पोकळ धर्माभिमान्यांना एवमात्र नसते

या सर्वधर्मापेक्षा राष्ट्रधर्म हा पवित्र असा उज्वल धर्म आहे राष्ट्रधर्माची जोपासना ज्या देशात होत नाही त्या देशांत नानाधर्म बोकाळलेले असतात व हे धर्माचें नानातत्वच परदास्याचे, पारतंत्र्याचें पाईक

बनविले. सर्व नशेत धर्माची नशा ही अेखाद्या पिशाच्च्या सारखी उन्मत धुन्दी आणणारी आहे म. फुलेंच्या अेकेश्वरत्वाची कल्पना सर्व मानव ज्ञातीस एकत्र आणणारी, अभ्युदय करणारी आहे सत्यशोधक समाजा प्रमाणे त्याकाळीं बुध्दिजीवी मडळीकडून अन्यसमाज स्थापन झाले होते त्यातील बगालमध्ये ब्राम्होसमाज, महाराष्ट्रात प्रार्थना समाज डॉ० बेझटबाईचा थिऑसाफिस्ट पथ व ऋषी दयानदाचा आर्यसमाज हे ठळक होते.

पैकी ब्राम्होसमाज व प्रार्थनासमाज याच्या वैचारिक बैठकींत बरेच साधर्म्य दिसून येते भिक्षुकांच्या आचार विचाराच्या प्राबल्याने व्या-पारीवृत्तिच्या हिंदूधर्मास कटाळलेल्या व तिरस्कारलेल्या सुशिक्षित अशा परभाषाभूषिताना, परधर्मीयाची चर्चेसमध्यें होणारी 'आकाशातील बापाची प्रार्थना आवडू लागली हे पाहूनच जेणें करून आग्लविद्याधारकाची मनें साभाळली जातील या विचाराने प्रार्थनासमाजाचा जन्म झाला. पण याचे कार्य फारच थोडया, धर्माने उच्च वर्णीय ठरलेल्या सामुदायातील कांहीं च्या रजनाकरितां, असे मर्यादित झाले समाजातील सर्व थरांमध्यें या समाजाचा प्रसार झाला नाही व तसा प्रचार करण्याची त्याना गरजहि भासली नाही. त्यामुळे बहुजनसमाजास त्याचे अस्तित्व नसल्यागत होते.

ब्राम्होसमाजाचें कार्य बगालमध्यें थोडे फार झाले, पण तेंहि सार्वत्रिक स्वरुपाचे झाले नाही नाही म्हणायला, राजा राममोहनराय यांनी अत्यत तळमळीने प्रयत्नाची शिकस्त करून सतीची चाल बद पाड-ण्याकरितां तसा कायदा करविला पति निधन पावता, त्याचे चितेवरच त्याच्या पत्नीने सहगमन करावयाचे व असे तीने स्वखुषीने न केल्यास जबरदस्तीनें तीला, पतिच्या भडकलेल्या चितेत, धरून बाधून जीवन्त

जाळावयाचे असा हा धर्माचार प्रचलित होता असल्या हिडीस व क्रूर धर्माचारास कायद्याचा पायबंद घालावयला लावणाऱ्या राजा राममोहन राय याना जेवढे धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच होत.

आर्य समाजाची स्थापना ऋषि दयानंद यांनी करून प्राचीन वेदनीतिचा तीन वर्णांत प्रसार करण्याचा प्रयत्न केला पण वेद हें अपौरुषेय आहेत वेदाधिकार सर्वत्रांना करता येतो. पंच महाभूताची अग्नीद्वारे ( यज्ञ, होम आदि ) उपासना करणे वगैरे वैदिक आचाराचें स्वातंत्र्य सर्व हिंदूना आहे, असे याचे मत. आर्यसमाजाच्या या वर्तणुकीनें महाराष्ट्रातील भिक्षूक वर्गात मोठी खळबळ उडाली. व इ स. १८७५ मध्यें जेव्हा ऋषि दयानंद न्या० मू० रानडे, डॉ० भांडारकर आदि सुधारणा प्रिय सज्जनांच्या आग्रहावरून पुण्यास आले त्यावेळी ऋषि दयानंदाची जंगी मिरवणूक काढण्यात आली या मिरवणूकीत म० फुले हे आपल्या काही अनुयायासह होते. बुधवार पेठेंत मिरवणूक येताच क्षुद्रवृत्तीच्या भिक्षुक गुंडानी शेण, माती, दगड यांचा मिरवणुकीवर मारा केला. गाढवावर स्वामीचे काल्पनिक चित्र ठेऊन धिंड काढली व काही आततायानी हातात काठ्या घेऊन ऋषि दयानंदावर चाल केली असतां, म० फुलेंनी आपल्या देहाची ढाल करून दयानंदाचे केसालाहि धक्का लागू दिला नाही

आर्य समाजाचें कार्य बऱ्याच अंशी उत्तरेस झाले व आजहि आहे पण बहुजनाचा जिव्हाळा मिळविण्यात यशापेक्षा ,अपयसच आल्याचें दिसून येते

थिऑसॉफिस्ट पंथ हाही कांही शिक्षित वकील डॉक्टर्स, व सरकारी नोकरी करणाऱ्या अशा बुद्धिजीवींना बौद्धिक खाद्य पुरविण्याचे

कार्य करी. अर्थात श्रमजीविकाचे वैचारिक प्रबोधन करण्याचें कार्य यांच्या गावीहि नव्हते

आतां सत्यशोधक समाजाच्या तत्वाचें, कार्याचे व पद्धतीचें परिक्षण करू सत्यशोधक प्रमुख तीन तत्व ! पहिलें ईश्वर एक असून तो सर्वव्यापी निर्विकार, निर्गुण व सत्यरुप आहे आणि सर्वमानव प्राणी त्याची प्रिय लेकरे आहेत

या प्रथम तत्वाविषयी कोणाचेच दुमत असायाचे कारण नाही वेदोपनिषदामध्येंहि याच तत्वाचें संशोधनपूर्वक मंडण केले आहे

अिश्वर हा अेक असून तो सर्वव्यापी आहे हे त्रिकाला बाधीत सत्य असल्यानें त्या अिश्वराला निरनिराळ्या अवताराच्या उपाध्या लावून त्याच्या अनेकीकरणाने मानवामानवात दुहीचे बीज फैलावण्यांत आले. यामुळें त्याच्या सर्व व्यापकत्वाला भिन्नसंप्रदाचे गालबोट लागले गेले त्याचे निर्गूणत्वहि संपुष्टात आले कारण अवतार महात्म्याच्या मंडणा करिता त्याला निर्गुणाचे सगुण केल्या गेले आणि असा जो एक अिश्वर त्याची सर्वमानव प्राणी ही लेकरे आहेत हे सत्य मान्य करावेच लागते मग जाती भेदासारखे धर्माच्या नावावर रूढ केलेली श्रेष्ठ कनिष्ठता असण्याचे कारणच नाही माणसामाणसात भेदाभेदाच्या दुहीने दुजाभाव घुमसत असता वरपागी किती जरी अेकोप्याच्या गोष्टी केल्या त्यापासून काय फायदा ?

"बोलाचाची भात, बोलाचीच कढी, जेवोनिया कोण तृप्त झाला ?"

श्री तुकाराममहाराजांच्या या अभंगोक्ति प्रमाणे सर्व निरर्थकच !

अनेक देवांच्या निर्मितीने भक्तांभक्तांतहि भिन्न भाव निर्माण

होण्यास मदतच झाली शैव, शाक्त व वैष्णव यांच्या मारामाऱ्या होऊन डोके फुटण्यापर्यंत या देव भक्ताची भांडणे होतात कर्नाटकात तर शैव व वैष्णव यांच्या मध्ये आडवा विस्तव जात नाही आपआपला देव पंथ वाढविण्याकरिता या १५–२० वर्षापूर्वीपर्यंत वैष्णव व शैव आपापल्या मुलांची मते पुढे बदलली तर पंथ संख्या घटू नये म्हणून पंथ निदर्शक गंधाच्या तप्तमुद्रा करून त्याचे डाग कपाळावर देत असत हेतू हा की, मत बदलले तरी पंथाची नोंद गंध छापाने वज्रलेप राहून पंथसंख्या कायम रहावी उत्तरेस रामभक्त व कृष्णभक्त याचे आपापसात तीव्र मतभेद ! रामभक्त कृष्णाचे नाव घेत नाहीत, कानावर येऊहि देत नाहीत. हीच रीत कृष्णभक्तांची ! देवाच्या कल्पना अशारीतीनें धर्मोन्नतिला कारण न होता अधोगतिलाच कारण झाल्या याचाच काही अशी परिणाम दास्यत्व येण्यात झाला ईश्वर निराकार, निर्गुण आहे पण तो वस्तुरुपाने दृश्य आहे प्रत्येक कृतिचे परिणाम हे त्याचे सगुणत्व आहे. परिणाम हा परमेश्वर व कृति ही त्याची पूजा ! 'आधी कळस, मग पाया' या म्हणी प्रमाणे प्रथम दिसायला जरी हे उलट दिसत असले तरी हाच मार्ग अिशप्राप्तीला नेऊन पोहोचविणारा आहे श्री तुकाराम महाराजानी नाना देवत्वाचा उपहास करून सर्वामध्ये अकविध भाव निर्माण करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. "अेक विध भाव। नधरू पालट ॥ सापडली वाट। न सांडू ही ॥" असे निर्धाराचे बोल श्री तुकाराम महाराजानी काढले अेकविधभावानें एक राष्ट्रीयत्व अंगी बाणल्या जाते व या अेकराष्ट्रीयत्वावरच स्वराज्य सिद्धीस जाऊन स्थैर्यास मदत होते. अस्तु ! विस्तारभयास्तव हे एक ईश्वर-त्वावरील भाष्य पुरे करून सत्यशोधक समाजाच्या दुसऱ्या तत्वाकडे वळू या

अिश्वरभक्ति करण्याचा प्रत्येक मानवास पूर्ण अधिकार आहे

आईस सतुष्ट करण्यास अगर बापास विनविण्यास जशी त्रयस्थ दलालाची जरुर नसते त्या प्रमाणे सर्वसाक्षी परमेश्वराची भक्ति करण्यास भटदला--लाची आवश्यकता नाही.

या दुसऱ्या तत्वात मानवांना देवभक्ति करण्याचा अधिकार असून त्यात रुढ केलेल्या भेदास पूर्ण फाटा देण्यात आला आहे अमूक अेक जातीत जन्म घेणाऱ्यास देवाची भक्ति करता येते व अमूक अेक जातीत जन्म झालेल्याना देवभक्ति करता येत नाही अशी भक्तिच्या मिरासदाराची सरजामशाही सत्यशोधनानें उधळून लावली. आईबापाना प्रसन्न करून घेण्याकरितां ज्याप्रमाणें मुलास मध्यस्थाची, दलालाची जरुरी नसते त्याप्रमाणें देवास प्रसन्न करण्या करिता, पुजाऱ्याची भटभिक्षुकांच्या मध्यस्थीची गरज नाही

देवपूजेचा रुढ प्रकार म्हणजे भिक्षुकाने जे सांगावे ते पूजकानें उच्चारावे यापरते पूजकास आपण काय म्हणतो याचा बोध होत असेल तर शपथ ! थोडक्यात म्हणजे पूजक हा सांगकाम्याचें काम करतो या करण्यांत पूजा ती काय होणार ?

परमेश्वर हा प्रत्येकाच्या कृतित असतो हे तत्व अंगी बाणल्या-नतर कशाला काल्पनिक मूर्तिची पूजा व आराधना करावयास पाहिजे व त्या पूजेला भिक्षुकाच्या मत्रतत्राचा, गडबडगुंड्याच्या मध्यस्थीची जरुरीच काय ?

ईश्वरासबधीची ज्ञानमार्गे स्वयपूर्णता भिक्षुकाच्या भिक्षुकीनें अडवून धरली आत्मोन्नतीच्या मार्गातील हा अडसर सत्यशोधक समाजाने दूर सारून धार्मिक स्वातत्र्याचें दालन सर्वांना खुले केले धार्मिक गुलाम-गिरीचा शेवट केला. हा सत्यशोधक समाजाचा विशेष होय

आपल्या देशातील हिंदुधर्मातील जातीभेदासबंधी बोलावयाचे म्हणजे कांहीना, आपला श्रेष्ठ म्हणवून घेण्याचा स्वार्थ, साधण्याकरिता चातुर्वर्ण्याची बुद्धि कौशल्याने केलेली निर्मिती होय व ही निर्मिती आपण केली, माणसाने केली असे भासू नये म्हणून श्रीकृष्णाच्या, रामाच्या आदि अवताराना अप्रत्यक्ष मान्यता मिळविण्याचा प्रयत्न केला "चातुर्वर्ण्यं मया सृष्ट" असे श्रीकृष्णाच्या मुखी वचन घालून चातुर्वर्ण्याला बळकट करण्याचा प्रयत्न आहे वास्तविक चातुर्वर्ण्य मानवांचे नसून असलेच तर तें अडज, जारज, उभ्दिज, श्वेदज हे ते चार प्रकार असण्याचीच सत्यता मानवाच्या बाबतीत फक्त दोनच वर्ण जन्माला आले ते म्हणजे स्त्री आणि पुरुष होत याचे प्रत्यय आजहि घरोघरी ससारात दृष्टीस पडतात

तद्वतच वर्णसकरहि सभवत नाही. कारण वनस्पतीमध्ये ज्याप्रमाणे भिन्नभिन्न वर्णाच्या लागवडीसबधीचे जे प्रयोग होतात त्यात जर कोव्हळयाच्या बी मध्ये भोपळचाचे बी पेरले तर कोव्हळचाच्या वेलाला भोपळचाचे फळ येते किंबा प्राण्यामध्ये भालू खेचरादि वर्णसकराची उदाहरणें पहावयास सापडतात पण मानवाच्या वर्णसकराबाबतीत असा विक्षिप्त अनुभव येत नाही

पण या सत्याला डोळचाआड करून काल्पनिक चातुर्वर्ण्याच्या भिन्नभिन्न रगाच्या काचाचा धर्मरुपी चष्मा ( चाळीशी ) तयार करण्यात येऊन जनतेच्या मन चक्षूस लावण्यांत आला या सर्व विवेचनावरून केवळ हिंदु समाज निर्मिती करणारा परमेश्वर हा कोणी इतर धर्मांना प्रसविणाऱ्या देवतेतील नव्हे असे म्हणावे लागते कारण वर्णव्यवस्था केवळ हिंदुधर्माकरिताच निर्माण करणारा परमेश्वर हा स्वयभू न ठरता त्याचीहि निर्मिती मानवाकडूनच झाली असावी हे उघड होते त्याशिवाय

जीं वर्णव्यवस्था इतर धर्मांत नाही ती हिंदू धर्मांत येण्याचे कारण काय ?

संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांनी धर्माची साधीसुधी व्याख्या जी केली ती ही होय —

जोडोनिया धन, उत्तम वेव्हारें। अुदास विचारे वेच करी ॥१॥
अुत्तमचि गती तो एक पावेल ।उत्तम भोगील जीव खाणी॥२॥
परअुपकारी, नेणे पर निंदा ।परस्त्रीचा सदा बहिणी माया॥३॥
भूतदया, गाई पशूचे पालन ।तान्हेल्या जीवन वनामाजी ॥४॥
शांतीरुपे नव्हे कोणाचा वाईट । वाढवी महत्व वडिलांचे ॥५॥
तुका म्हणे हेचि आश्रमाचे फळ। परमपद बळ वैराग्याचे ॥६॥

आणि पापपुण्याच्या बाबतीत –

"पुण्य परोपकार । पाप परपीडा ॥ आणिक नाही जोडा । दुजायांसी ॥"

हीच मत म० फुल्यांची होती व त्याचप्रमाणे वागून दुसऱ्यानाहि वागण्या करिता उपदेशिले. धर्म तोच असू शकतो की, ज्या धर्मांत मानवाचा अभ्युदय होऊन आत्मसमाधान मिळते. बाकीची धर्मव्याख्या म्हणजे शब्दजाल होय.

या दृष्टीनें सत्यशोधक समाजाची तत्वे आचरणात आणल्यास स्त्रीपुरुषांची सर्वांगीण उन्नति होऊन त्याना आत्मसमाधान प्राप्त झाल्याविना राहणार नाही

★ ★ ★

# समाजवादाचा पुरस्कार ●●● ९

सत्यशोधक समाजाची स्थापना झाल्यावर म० फुलेंच्या कार्यास आगळे तेज आणि गति प्राप्त झाली. त्याना बरेच अनुयायी मिळाल्यामुळे त्यांचे कार्य आता प्रथमपेक्षा अधिक जोमानें व सघटित रीतीनें होऊ लागले. म० ज्योतिरावाच्या कार्यात प्रामुख्यानें आपणास अेक गोष्ट आढळेल कीं, त्यांच्या कार्यांचा कल अेकातून, दुसऱ्यात आणि दुसऱ्याचा तिसऱ्यांत, त्यामुळे त्यांचें कार्य अव्याहत रीतीने सुरुच राहिले. त्याचे लक्ष आता शेतकरीवर्गाकडे जास्त ओढल्या गेले कारण सावकार लोक शेतकऱ्याची पिळवणूक करतात हे त्याच्या लक्षात आले शेतकऱ्याना अेक पट पैशाचे कर्ज देऊन त्याच्या दसपट व्याजाच्या रुपाने घेऊन गब्बर बनणाऱ्या भांडवलदाराकडे त्यांचें लक्ष वेधण्यास अेक कारण घडले. जुन्नर सुभ्यांत शेतकरी समाजावर सावकाराकडून जुलूम होत असल्यानें म० फुलेना कळले, त्यांनी प्रत्यक्ष जुन्नरला जाऊन सत्यपरिस्थिती समजावून घेतली. यातील मुख्य कारण म्हणजे सावकारी व्यस्त हिशोबाने अनेक शेतमालकाच्या जमीनी बिगर कष्टाच्या नामधारी शेतकऱ्याकडे गेल्या व कष्ट करणाऱ्या मालकास आपल्याच शेतीत पोटा करितां अपुऱ्या मजुरीवर कशीबशी गुजराण करावी लागे. छत्रपति राजारामाना मराठेशाहीच्या पडत्या काळात राज्यसिंहासन सावरण्याकरितां अनेकाना जमीनी बक्षिस दिल्या होत्या. यांतहि पुन्हा पेशव्यांनी आपल्या भाईबदास इनाम म्हणून कैक शेतकऱ्याच्या जमीनी दिल्या होत्या. अशा इनामदाराचाच भरणा, शेतकऱ्याना गांजणारात होत

होता म० ज्योतिबानी या संबधात कटुता निर्माण होऊ नये म्हणून नामधारी जमीन मालकाना प्रत्यक्ष भेटून सारासार विचार करण्याची विनंती केली पण। हे नामधारी जमीन मालक म०ज्योतिबांच्या विनंतीचा नुसता विचारहि करण्यास तयार होईनात. म० ज्योतिबाचे म्हणणे असे कीं, जो शेतकरी शेतात कष्ट करीत नाही, तो कसला शेतकरी। जो काबाड कष्ट करतो,रात्रदिवस खपतो तो शेतकरी. पण म० ज्योतिबाचें हे विचार या मालकीवृत्तिला कसे पेलणार !

अखेर म० ज्योतिबाना मजूराकरवी अशा सावकाराच्या शेतीवर बहिष्कार घातला. त्यामुळे ती जमीन पडीत पडली सावकार लोकाकडून अशा रीतीनें शेतकऱ्यावर अन्याय होतो या संबधात हजारो शेतकऱ्याच्या सह्यानिशी अर्ज घेऊन तो तत्कालीन सरकारकडे पाठविण्यात आला. त्यामुळे या घटनेस कोर्टाचे स्वरुप येऊन हा लढा दोन वर्षे चालवून परिणामी कर्जाऊ रकमेचे व्याज ठरविण्यात आले शिवाय बऱ्याच सोयी होऊन शेतकऱ्याना सरकारकडून संरक्षण प्राप्त झाले त्यानंतर हा संप (बहिष्कार) मोडण्यांत आला

भारतीय जीवनांत 'संप' हा शब्द प्रथमत म० ज्योतिबा फुले यानीच आणला हे म्हणावयास हरकत नाही. संप याचा अर्थ अन्याय प्रतिकारार्थ काम करावयाचे नाकारणें। या पूर्वी असे होत नसेल असे नाही पण, हुकूमशाही दडपणाखाली वाटेल त्या शिक्षेच्या भीतिने लोक प्रतिकार करावयास धजत नसत पण म० फुल्यांनी त्या कृतिमागे संघटनेची जोड देऊन ती कृतिपरिणामी फलस्वरुपी केली हे विशेष होय या बाबतीत अेक अुदाहरण फार व्यवस्थित आहे ते म्हणजे 'केशवपन'। त्या काळी ब्राम्हण समाजात नैसर्गिक सौंदर्यावर दुष्टपणे प्रहार करून, ते विद्रूप करावयाचे या अुद्देशाने बाल व प्रौढ अशा विधवा स्त्रीयांच्या डोकीचें केस न्हाव्याकडून वस्तऱ्यानें काढून ते सन्याशाच्या डोक्याप्रमाणे तुळतुळीत हजामतीने गोटा करीत म० फुल्यानी या संबधी ब्राम्हण व तत्सम बधूना चार गोष्टी सांगितल्या नाहीत असे नाही पण ऐकणार कोण? 'ज्योतिराव हा ब्राम्हणद्वेष्टा। असा अगाच गैरसमज करुन घेतलेले धर्ममार्तंड (!)

त्या वेळी ब्राम्हण समाजात अधिक बाब-त होते वास्तविक ही सुधारणा ब्राम्हण समाजाचे पथ्यावर पडली पण ती म० ज्योतिबानी सुरु केली म्हणून त्यास विरोध' उपरोक्त कार्याला जेव्हा ब्राम्हण समाजाची अनुमति व सहकार्य मिळेनासे झाले तेव्हां त्यानी सामूदायिकरित्या विधवा स्त्रीयाचा केशवपनविधी बद करविण्याचे ठरवून सर्व न्हावी बांधवाच्या सभा घेऊन त्यांना विधवा स्त्री केशवपन न करण्याबद्दल सागू लागले. प्रथम प्रथम म० ज्योतिबाच्या सांगण्याचा न्हावी बाधवांवर काहीं परीणाम होईना कारण त्याचे म्हणणे असे असे कीं, आमचे वाडवडील विधवांचे केशवपनाचे काम करीत आले तें काय खुळे होते ? शिवाय हजामती करणे हा आमचा धदा असून, आमच्या पुढे जो हजामत करून घेण्यास बसेल, तो पुरुष असो की विधवा स्त्री असो त्याची हजामत करणे हे आमचे काम व धर्म आहे, हे काम न करणें म्हणजे अधर्म होय न्हावी बधूची ही समजूत दृढ झालेंली होती अशा समाजाचे परिवर्तन करणें हें काम किती तरी कठीण होते पण म० फुल्यानी आपल्या बुद्धी चातुर्याने त्याना पटवून दिले की, आपल्यातील आयाबहिणी विधवा झाल्या तर त्याचे केशवपन तुह्मी करतां का ? या प्रश्नाने न्हावी बधूचे मनास धक्का बसून त्यानी हे विधवाचे केशवपन काम इत पर करावयाचे नाही असे ठिकठिकाणी जाहीर सभेत सभा घेऊन ठरविले तेव्हापासून विधवाचा केशवपनविधी बहुसख्येने बदझाला (न्हावी बधूनी विधवांच्या डोकीचेकेस काढावयाचे नाही असे ठरवताच, काही ठिकाणी, काही भिक्षुकानी विधवाचे केशवपन कार्य स्वहस्तेच करावयाला सुरुवात केली होती असे म्हणतात ) म० फुल्याच्या कार्याचा बोलबोला इग्लड मध्येहि झाला इग्लड इग्रज महिलानी म० फुलेवर अभिनदनाच्या ताराचा वर्षाव करून भारतातील स्त्रीस्वातत्र्याचा आद्य प्रणेता म्हणून गौरव केला

शेतकऱ्याच्या उपजीवीकेचे मुख्य साधन शेती भारतीय जनता शेतकरी आहे ही शेती अधिकाधिक पिकाव् व्हावी याकरितां त्यानी शेतकऱ्यांच्या ठिकठिकाणी सभा घेतल्या शेतकऱ्याला चागले बी, बियाणें पुरवावे, शेतीसाठी पाठबधारे बाधून द्यावे, अशा तऱ्हेचे सरकारकडे अर्ज

पाठविले परिणामी १८७७ मध्ये मुबई सरकारने मुठा नदीवर पुण्या-जवळ धरण उभारले. हे धरण १८७८ मध्ये पूर्ण झाले. सत्यशोधक समाजानें सरकारचे अभिनदन केले

कोणतीहि सुधारणा सर्व साधारण, सामान्य जनतेच्या पचनी पडणें कठीण गोष्ट असते- उपरोक्त मुठा नदीवर धरण बांधले तेव्हा त्यातील पाणी आपल्या शेतात घ्यावयाला कुणी तयारच होईनात म० फुल्यानी आपल्या माजरी येथील जमीनीत पाणी घेतले व मळा तयार केला. या जगलांत फुल्याची मळी अजूनहि आहें. इथे लावलेली आबराई सुद्धा आहे

शेतीं ही कसणाराची आहे जो कसेल तो पिकवेल, आणि जो कसेल तोच शेतकरी जमीनीचा मालक, ही त्याची वृत्ती होती कारण हजारो,लाखो एकर जमीन एकाच मालकाकडे असून बाकीच्यानी मरमरेतो त्या जमीनीवर राबावे आणि पीक मालकानें घ्यावे ही अन्याय -जनक प्रवृत्ति त्यांना पसत नव्हती शेतकऱ्याच्या जमीनी अशा सावकारा-कडे जाऊ नयेत या प्रवृत्तिचे ते होते पुणे प्रातात इ० स० १८७५ मध्ये या सबधात मोठी सघटना उभारली आणि शेतकऱ्यांना प्रथम आपल्या अधिकाराची जाणीव करून दिली आज जो कसेल त्याची जमीन, म्हणून नारा लावण्यात येतो, तो नारा प्रथमत म० फुलेंनी प्रत्यक्ष कृतीत आणला होता हे विसरुन चालणार नाही.

मुंबईला गिरण्या सुरु झाल्यावर त्यात हजारो मजूर काम करीत असत. काम वाटेल तेवढ्या वेळेपर्यंत चालवावयाचे, वाटेल तेव्हा बंद करावयाचे आजच्या प्रमाणें मजूरांना नोकरीची शाश्वती व वेळेचा पायबद नव्हता अशी रीत गिरणीतील कामाची होती त्यामुळे मजूरांची पिळवणूक व उपासमार व्हावयाची, ही गोष्ट म० फुल्याच्या लक्षात येताच सन १८७९ सालीं श्री नारायण मेघाजी लोखडे यांच्या साह्यानें मुबई येथे गिरणी कामगाराची पहिली सघटना उभारण्याकरिता सभा घेण्यात आली या सभेत गिरणी कामगारावर होणाऱ्या अन्यायाच्या प्रति-

कारार्थ कायमचे कार्यकारी मंडळ म० फुलेच्या मार्गदर्शनाखाली नियुक्त करण्यात आले या मंडळाला गिरणीमालकानी व त्याच्या साथीदारांनी आत्यंतिक त्रास देण्यास सुरुवात केली या मंडळाचे सभेत मजुरांनी उपस्थित राहू नये म्हणून धाक दपटशाही करण्यात येऊ लागली. यामुळे [illegible] म० फुल्यांनी आपले संबधी उभारलेल्या कार्यांचा जिव्हाळा निर्माण होऊन ते निर्भयपणाने मंडळाच्या सभेस उपस्थत राहू लागले इकडे गिरणीमालकाना त्यांच्या साथीदारांकडून या गोष्टीचा सुगावा लागू लागला त्यावरून त्यांनी कैक मजुरांना कमी करावे व त्याना जेरीस आणून आपण म० फुल्यानी स्थापन केलेल्या, मंडळाच्या सभेस जाणार नाही असे कबूल करवून मग कामावर घेत म० फुलेच्या कानी या बातम्या येताच त्यांनी उघड उघड मजूरावर होत असलेल्या अत्याचारासंबधी मुंबईत प्रभावी जनमत जागृत केले व तेणे करुन राज्यकर्त्यांना या संबंधात अधिक कडेपणानें लक्ष घालावे लागले. त्याचाच परिणाम म्हणून मजराच्या कामाचे तास ठरले, पगाराचे प्रमाण बरोबर करण्यात आले मजुराना मधून मधून सुट्या ठेवण्यात आल्या. [illegible] रात्रपाळीनें काम करावे लागे या प्रथेने अनीतिकारक घटना घडून येत असत त्यास आळा घालण्याकरिता म० फुलेनी स्त्रीयांची रात्रीची पाळी बंद करण्याकरिता आटोकाट प्रयत्न करून ही पाळी बंद करविली

सन १८७६ साली श्री. रामचंद्र हरी शिंदे यांच्या साह्याने "पुणें कमर्शियल अ‍ॅन्ड कॉन्ट्रॅक्टिंग कंपनी" स्थापन करण्यात आली. या कंपनीमार्फत त्याना खडकवासला बॅक मुठानदीच्या पाटाचे बांधकाम सातारा रस्त्यावरील डोंगरात बोगदा तयार करणे, येरवडा पुलाचे काम इ. कामे करुन मजूराना मुनाफ्याची भागीदारी दिली अशा प्रकारे मजूर हा त्या त्या कामातील कंपन्याचा भागीदार बनून चालू काळातील औद्योगिक क्षेत्रांत मुनाफ्यातील बोनस म्हणून जो प्रकरण रुढ झाले, त्याची पार्श्वभूमि म० फुल्यानी स्थापन केलेल्या कंपन्या पासून आधिच झाली हा विशेष होय


उपरोक्त निरनिराळ्या सुधारणावरून वा संघटनावरून आपणास हे कळून येईल कीं, म० ज्योतिराव फुले हे शेतकऱ्याचे आणि मजुराच्या हक्काबद्दल किती जागृत आणि आस्तेवाईक असत भारतीय पहिला समाजवादी म्हणून, म० फुल्याना पहिला मान द्यावा लागेल समाजवाद ! समाजवाद काही लाखो रुपयाच्या इस्टेटी केल्यानें येत नाही. होऊ शकणार नाही. म० ज्योतिबा हे शेतकऱ्याचे, शेतकऱ्यासारखे व शेतकरी होते म्हणूनच त्याचे पुढारीपण 'महात्मा' पदवीपर्यंत गेले स्वार्थ-त्याग सेवाभाव, कळकळ, नम्रता, तत्परता आदि गुणाचा संगम म फुलेमध्ये झाला होता जातीय म्हणून जर कुणी त्याना दोष दिला तर अशा अज्ञानास काय म्हणावे ? म० फुलेनी केलेली सुधारणा, केलेले कार्य, हे केवळ एकट्या समाजाकरिता, एका जातीकरिता नव्हते तर ते अखिल मानव जातीकरिता असून, अन्याय प्रतिकारार्थ होतें मग तो अन्याय कुणाचाहि असो. महात्मे कधीहि एका बाजूनें, एकांगीपणानें कार्य करीत नसतात त्याचे कार्य सर्वांगीण सर्वांकरिता असते मग या गोष्टीला म० फुले अपवाद कसे असणार ?

★ ★ ★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 32268 ........ वि: ........
क्रमांक ...1020............ नों दि. ........

हरीजनांसाठी खुली केलेली विहीर





म० फुले यांचे राहते घर



अस्पृश्याकरिता खुला केलेला हौद

# रत्नराज सयाजीराव महाराज व महात्मा फुले ● ● ● १०

२४ सप्टेंबर १८७३ मध्ये सत्यशोधक समाजाची अधिकृत स्थापना करून, मत प्रसारार्थ म० फुल्यानी दूरदूरच्या प्रातातहि दौरे काढले. त्याच्या प्रभावी वाणीने सत्यशोधक समाजाचें ठिकठिकाणी सभासद संख्या वाढत जावू लागली म० फुलेंची कीर्ति रत्नराज सयाजीराव गायकवाड संस्थान बडोदा यांचेहि कानावर गेली. महाराजांचे एक दिवाण श्री. रामचद्रराव धामणस्कर हे म० फुलेच्या सत्यशोधक समाजाचे निष्ठावंत अनुयायी होते ते प्रतिवर्षि सत्यशोधक समाजाचे अधिवेशनास न चुकता उपस्थित राहून सत्यशोधक तत्वाचा जेथे जात तेथे प्रसार करीत त्याच्या मुळे रत्नराज सयाजीराव यांना म० फुलेचा व त्याच्या राष्ट्रोद्धारक सत्कार्याचा परिचय झाला.

सयाजीराव महाराजाना एकदा का होईना पण म० फुलेंना बडोद्यास व्याख्यानाकरिता बोलवावे व त्याचा अधिक परिचय करून घ्यावा असे सतत वाटू लागले. त्याप्रमाणे त्यानी दिवाण धामणस्कर याचे करवी म० फुलेंना बडोद्यास येण्याचे आग्रहानें निमन्त्रण देवविलें. म० फुलेनी वेळात वेळ काढून दोन महिन्यानी बडोद्यास प्रयाण केले.

बडोदा स्टेशनवर महाराजांनी आपले प्रतिनिधी म्हणून दिवाण धामणस्कर याना व इतर सन्माननीय सरदार नागरिकाना पाठविले.

म० फुलेंच्या कार्याचा बालबाला गुजराथेंतहि बराच झाला होता त्यामुळे गुर्जर बधू हजारोंच्या समुदायाने स्टेशनवर स्वागता करितां पुष्पहार घेऊन जमले होते.

ठरलेल्या वेळेस गाडी स्टेशनवर येताच "म० फुलेकी जय" या घोषणानी वातावरण दुमदुमून गले म० फुलेन्ची साधीसुधी राहणी सानदी पण गभीर वृत्तिने बडोदावासीयाना या क्रान्तीकारी नेत्याविषयी महान आश्चर्य वाटू लागले

म० फुले दिवाण धामणस्करा बरोबर राजवाड्यात रत्नराजाच्या भेटीस गेले सयाजीराव महाराजांनी राजमदिराच्या प्रवेशद्वारी म० फुलेंचे सहर्ष स्वागत करून मदिरात नेले म० फुल्याच्या भेटीने सयाजी-राव महाराजांना निरतिशय आनद झाला म० फुलेंचा आठ दिवसाचा अतिशय आग्रहानें मुक्काम झाला

या आठदिवसात म० फुलेची धर्म व समाज या विषयावर सांगोपाग अशी, वैचारीक जागृति करणारी सुश्राव्य व्याख्यानें झाली, या व्याख्यानास श्रीमत सयाजीराव स्वत उपस्थित असत. तसेच महाराजानी खाजगी सभाषण व चर्चा करून सशय निवृत्ति करून घेतली

म० फुलेच्या प्रत्यक्षाचरणीय विचारांचा सयाजीरावाच्या मनावर कधीहि न पुसला जाणारा परिणाम झाला पुढे प्रतिवर्षी राजरत्न सयाजीरावांच्या प्रेंमळ निमत्रणामुळे म० फुले बडोद्यास जावून सत्य–शोधक समाजाचे ध्येयासबधी व्याख्याने देण्यास जात

रत्नराज सयाजीराज गायकवाड यानी बडोदा सस्थानांत ज्या धर्म व समाज या सबधी सुधारणा केल्या त्याचे बीजारोपण, म० फुलेनी केलेल्या वैचारिक क्रांतीचे फळ होय.

त्यावेळच्या हिंदुस्थानात जवळ जवळ साडेसातशे सस्थानिक होते त्याची सस्थाने म्हणजे विलासोपभोगाची साधने होती पण त्यात रत्नराज सयाजीराव व राजर्षि छत्रपति शाहू महाराज कोल्हापूर, हे

लोकाभिमुख राज्यकर्ते होऊन गेले आणि या दोघावरहि म० फुलेंच्या विचाराची पूर्ण छाप पडली होती.

रत्नराज सयाजीरावावर म फुल्याच्या विचाराचा सुपरिणाम होऊन अगदी प्रथम बडोद्यात बरेच वर्षापासून चालत आलेली खिचडी पद्धति बंद केली. ही * खिचडी पद्धती बंद झाल्यानें महाराजाविरुद्ध काही दिवस कावकाव झाली काही पुणेकर भिक्षुकांनीहि आरडाओरड केली. पण रत्नराज सयाजीराव यानी याची तिळमात्रहि क्षिती मानली नाही- म० फुलेंच्या तर्कबुद्धिच्या विचारास आपल्या संस्थानांचे मर्यादित भुमि-तच का होईना पण सत्तेनें सहाय्य देणारे रत्नराज भेटले हा समसमा योगच म्हटला पाहिजे

उच्च वर्णीय म्हणून गणलेल्या वर्गात घटस्फोट ( प्राकृत — काडीमोड ) होत नसे, पण बडोदा नरेशांनी आपल्या संस्थानात घट-स्फोटाचा कायदा जारी करून अमलांत आणला याचा फायदा महाराष्ट्रातील एका उचचवर्णीय संस्थानिकाच्या सुविद्य बधुनी घेऊन घटस्फोट मिळविला म० फुलेवर रत्नराज सयाजीरावाची अनन्य साधारण भक्ति व श्रद्धा असली. म० फुलेंच्या राष्ट्रोद्धारक चळवळीस राजरत्न सयाजीरावांनी द्रव्यद्वारा सहाय्य केले म० फुलेचा स्वभाव स्वत चे बाबतीत पूर्ण नि स्वार्थी व नि स्पृह होता त्यानी आपल्या करिता सार्वजनिक निधी-तील अेक पैचाहि व्यय केला नाही पुढे १८८४ नतर जेव्हा त्याची प्रकृति बिघडली, त्यावेळी बडोदा नरेशानी प्रकृति सुधारण्याकरितां काही द्रव्य दिवाण धामणस्कराबरोबर म फुलेकडे पाठविले म० फुलेनी महाराजाचे प्रेमळ मानस जाणून द्रव्य घेतले पण प्रकृति करिता त्यातील अल्पसा भाग खर्ची घालून उर्वरित पैसा महाराजाकडे परत करण्याचा मानस बडोद्यास कळविला

---

* ही खिचडी पद्धती म्हणजे धर्ममूर्ति म्हणून संबोधिले जाणारा भिक्षुक वृन्द याना रोज शिधा देऊन वर दक्षणा द्यावयाची यामुळे भिक्षुक वर्ग निष्क्रीय व अैदी बनला

महाराजानी 'पैसा परत न करता' आपण आरंभिलेल्या कार्यास ता लावावा म्हणून म० फुलेंचे मोठ्या मिनतवारीनें मन वळविले.

राजरत्न सयाजीराव महाराजांचे ठाशी वाचन व श्रवण यामुळे विपुल बहुश्रुतता प्राप्त झाली होती. म० फुलेंचे कार्य त्यांना अगदी जवळून पाहाता आले महाराजाचे मनात परंपरानुयायीत्वाची शिसारी आली देश, काल, वर्तमान परिस्थितिला अनुसरून राज्यकारभार केला. १९३२-३४ दरम्यान जी सर्वधर्म परिषद सॅनफ्रान्सीस्कोला झाली त्या परिषदेचे अध्यक्षस्थान रत्नराज सयाजीरावानी भूषविले. आपल्या अध्यक्षीय भाषणात रत्नराज महाराजांनी म० फुलेंचा मोठ्या आदर भावनने गुरुस्थानी उल्लेख करून आदरांजलि वाहिली

सर्वसाधारण रीतीने पाहू जाता राजाशी बोलण्याचा व राजमैत्री संपादण्याचा मान ज्यास मिळतो तो स्वतःस मोठा समजून इतराशी तुसडेपणानें वागू लागतो किंवा राजद्रव्य अधिकाधिक मिळविण्याचा प्रयत्न करतो या राजद्रव्या बाबतीत आज प्रसिद्धी पावलेली तत्कालीन दोन विद्वान पुढाऱ्यानी कसे अेकमेका विरुद्ध काहूर माजविले होते हे सयाजीराव महाराजानी व्यक्तिश दिलेल्या देणगी वरून पहावयास मिळते.

म० फुले या वर्गातील नव्हते. त्याना राजमैत्रीचा कधीच मोठेपणा वाटला नाही. पुण्यास एकदा राजरत्न महाराजांची स्वारी गंजपेठेत म० फुलेंना भेटण्याकरिता त्याचें वाड्यात जाती झाली. त्यावेळी म० फुले अस्पृश्याच्या मुलांना स्नान घालीत होते. प्रत्येकाला स्नान घालून स्वच्छ करीत होत. सौ. सावित्रीबाई स्नान केलेल्या अस्पृश्य बालकाना कपडे घालीत होत्या. ही दीन-दलिताची सेवा पाहून, प्रजावत्सल रत्न राजाचे हृदय भरून आले

'बोले तैसा चाले । त्याची वंदावी पाउले ॥'

असे म० फुलेंचे वर्तन होते. नुसते गाडीभर बोलण्यापेक्षा तीळा अेवढी केलेली कृतित्व अमर होते

म० फुले यांचे प्रथम चरित्र लेखक बुलढाणा जि. कॉंग्रेस कार्यकर्ते श्रीमान पढरी पाटील हे स्वत जेव्हा उपरोक्त पुस्तकाच्या अभिप्रायार्थ श्रीमत सयाजीराव महाराजाकडे गेले तेव्हा महाराजानी ते पुस्तक श्री. पढरी पाटीलाकडून वाचून घेतले आणि म० फुलेचा अेका वाक्यांत गौरव केला " म० ज्योतिराव फुले हे भारताचे बुकरटी वाशिग्टन होते ,, यावरून महाराजाची म० फुलेच्या ठाअी किती प्रगाढ भक्ति श्रद्धा होती हे दिसून येईल.

म० ज्योतिरावानी महाराष्ट्रातील सस्थानिकांच्या गाठी घेतल्या , गुलामगिरी ' सार्वजनिक सत्यधर्म, 'ब्राम्हणाचें कसब, या पुस्तकाच्या प्रति त्यानी राजे, महाराजे, सरदार, जहागिरदार आदि थोर लोकाना पाठविल्या पण आळशी झालेंल्या राजांनी त्या कितपत वाचल्या असतील, त्यानाच ठावे ? म्हणूनच म ज्योतिरावानी त्याच्या भेटी घेण्याचे ठरविलें फलटणचे राजें फार जुन्या मताचे असून ते पुण्यास वारवार येत असत अशाच एका प्रसगी म० ज्योतिबांनी त्याची भेट घेऊन त्यांना आपल्या कार्याचा परिचय आणि सत्यशोधक चळवळीची माहिती दिली त्यामुळें त्यांचे मत परिवर्तित झाले.

सत्यशोधक समाजाच्या चळवळीपासून, त्याचा कारभार सुरळीतपणें चालविण्यास म० फुलेंना बरेच कष्ट पडले. बऱ्याच ठिकाणी प्रचारार्थ ते जात जुन्नर प्रातात तर बहुतेक खेड्यात फिरले. कोंकण, सोलापूर, सातारा, नाशिक, ठाणें, मुबई आदि भागात ते फिरलें. आतां सत्यशोधक समाजाची 'ज्योति' 'मशाल' बनली. सन १८८९ साली तर मुबईला दोन महिने पर्यंत मुक्काम ठोकला मोहल्या मोहल्यातून व्याख्यानें दिली मुबईच्या व्याख्यानामुळे जे परिणाम अुमटलें त्यातील दोन प्रसग महत्वाचे म्हणून पुढे निवेदित आहे

देवाच्या नावावर सुन्दर कुमारिकाना दान मिळवून, त्याना अविवाहित ठेवून, त्याच्या शीलाचें धिडवडे काढावयाचे हे ' देवदासी '

च्या रुढीनें रुढ झाले होते, ही रुढी मुंबईला त्यावेळी फार वाढली होती त्यामुळे अनिती आणि अनाचार वाढले होते म० फुले मुंबईला गेलें तेव्हां त्यानी या रुढीवर कडाडून हल्ला चढविला. ही प्रथा किती वाईट आहे जनतेला पटवून दिलें. त्याचबरोबर मुंबईकर न्हा-व्याचा संप घडवून आणला. मुंबईचे न्हावी 'केशवपन' करेनासे झाले अशावेळी काही कर्मठानी आपली मजल आपल्या हाताने आपल्या आया - बहिणीचे केस काढण्यापर्यंत नेली या संपाचे परिणामी सर्वत्र परिणाम होऊन केशवपनाची चाल बऱ्याच अंशी बंद पडली

आतापर्यंत त्यांच्या जीवनाची ४० वर्षे कार्यार्थ खर्ची पडली. या काळात वारंवार प्रवास करणे, व्याख्याने देणे, सभा भरवून शंका-कुशंकाना उत्तरे देणे, इ० कामे करावी लागत तर कधी कधी प्रत्यक्ष भाग घेऊन शारीरिक कष्टसुद्धा घ्यावे लागले. त्यामुळे ते अत्यंत शिणले, श्रमले मुंबई येथील तेलगण पुढाऱ्याच्या विनतीवरुन ते तेलगणात गेले तेथे त्याची बरीच व्याख्याने झालीत. तेलगणातील पुढाऱ्यानी त्यांच्या भाषेत अनुवाद करून जनतेला मोलाचे शब्द ऐकविले १८८० मध्ये फलटणवरून सावंतवाडीस गेले. तेथेसुद्धा त्यानी व्याख्याने दिलीत

'नरेशाच्या' प्रासादापासून तो 'दीनाच्या' झोपड्यापर्यंत या 'महात्म्याचा' आवाज पोहोचला ! सत्यशोधक समाजाचा प्रसार झाला लोक जागृत झाले. उतारवयापर्यंत अत्यंत परिश्रम घेऊन त्यानी प्रचार कार्य केले

* * *

# सत्व परीक्षा ! ● ● ● ११

"सतीचा ओवसा, जेणे पदरा घ्यावा, सकल्प सोडावा, जीवित्वाचा" दुसऱ्याचे दु:ख दूर करणारे महात्मे, साधूसत याच्या जीवनात कधीतरी असा एखादा भीषण प्रसग येतोच, येतो ! अर्थात अशा प्रसगाशिवाय जगाला महात्म्याचे अतरगच वाचता येत नाही का ? महात्मेपणाची, साधूत्वाची ही परिक्षाच आहे जे कुणी या मार्गाने जातात त्याना जीवीत्वाचा सकल्प सोडावाच लागतो अशा जीवाचे जीवन म्हणजे स्वत: करिता नसतेच ! ते सामुदायिक जीवन जगत असतात. त्याचा देह, मन सामुदायिक बनत असते समाजघटकातील (मानव) कुठल्याहि जीवाला दु:ख झाले तरी महात्म्यास जाणवतेच. पायाला दु:ख झालें तरी शरीरासच, आणि डोक्याला झाले तरी शरीरासच, तद्वत महत्म्याचा देह म्हणजे मानव समाजाचा देह ! सामुदायिक नव्हे सर्वांचे दु:ख दूर करावयास अवतारलेले हे अिश्वरीय अश जीवनाच्या शेवटच्या घटकेपर्यंत अिश्वरीय कार्य करीत असतात

'सभवामी युगे युगे ।' गीतेत पार्थाला सांगणाऱ्या श्रीकृष्ण परमात्म्याने हे उघड दाखवून दिले की, वेळोवेळी मानव्याच्या रक्षणाकरिता मी युगे युगे अवतार घेईन बहुजनाकरिता आपल्या आयुष्याचे क्षणन्क्षण मानवी हिताकरिता खर्च करणारे जे महात्मे म्हणजेच त्या त्या वेळी झालेला परमेश्वराचा अवतार होय !

तुका म्हणें सांगू किती । तोचि भगवताची मूर्ति ।।

सन १८७७ चा तो काळ ! अनावर्षणानें महाराष्ट्रांत या

वेळी हाहा:क्कार अुडाला होता सन १८७५ मध्ये दक्षिण हिंदुस्थानात दुष्काळ पडलेलाच होता आणि लगेच दोन वर्षानंतर अिश्वराने हे दुसरे संकट धाडून पाठवावे हा केवढा दैवदुर्विपाक ! सन १८७५ मध्ये मानव हानी फार झाली नाही. कसेबसे लोक जीवत राहिले. यावेळेस तर लोकाना खावयासच नव्हते. वृक्षराज पर्णविहीन झाले होतें पक्षी इकडून तिकडे भक्षशोधार्थ भटकत होते. गाई, बैल तडफडून स्वर्गाची वाट धरीत होते, तर माता अर्भकावर अुगीच चिडत होती. नातलग अेकमेकाना तोंड दाखवेनासे झाले. जनावराना मिळणाऱ्या कळण्या, कोंड्याच्या भाकरी व्हायला लागल्या आपल्या मुलाचें यथोचित आणि काळजीने संगोपन करणारी माता आईच्या वात्सल्यास ज्या त्रिभुवनात जोड नाही, ती आई ! मुलाबाळाचे आपल्या चिमुकल्या अर्भकाचे हाल बघवत नाहीत म्हणून वीष पाजून चिरनिद्रा प्रदान करन्या झाल्या ! कैक ठिकाणी तर आपल्या इतर मुलाना जगविण्याकरितां अेखाद्यास विकून धान्य घेऊ लागले, अेवढ्यानेच दैवाचा खेळ संपला नव्हता तर कैक जीवानी आपल्या मुलाबाळाचे हाल बघवत नाहीत म्हणून मुलाबाळासह आत्महत्या केल्या. या भूकेने याही पुढील कृत्य करावयास लावले. भूक ! भूक !! जीवनाच्या सर्वस्वाला पणाला लावल्यावरहि शिल्लक राहिलेली ही भूक !!! किती हवे आहे या भूकेला ! वैचारिक आणि बौद्धिक भूकेला अेकवेळ नसले तरी चालेल, पण शारीरिक पोटाच्या भूकेला हवेच हवे ! याच भूकेने स्वतःच्या पोटच्या अर्भकाना वाग्या, भोपळ्या प्रमाणे करकरा कापून आपल्या मानवतेला दानवतेचे स्वरुप दिले कुठल्या शब्दान या भूकेच वर्णन कराव ? भूक शमली की शब्द ! तोंवर कुठले शब्द ?

अशा या भीषण समयी दानवता थयथया नृत्य करु लागली. मृत्यूनें ठाण मांडले, नव्हे आतां आताशा तर मृत्यू हा मानवाचा वैरी न बनता मित्र बनला होता. या दुष्कळांत सर्व हिंदुस्थानामधील २० कोटी लोका मधून, दोन कोटी लोकाना मृत्यूने आपलेसें केले, कैक गुरें ढोरे जीवजतू भक्षून मृत्यूनें आपली भूक शमविली, अशा तऱ्हेनें सर्वत्र

हाहा:कार पसरला होता मानव्याच्या 'ज्योति' ची हीच कसोटीची, परिक्षेची वेळ होती अशा दुष्काळाच्या वेळी ही परीस्थिती पाहून म० फुलेंचे अन्त:करण कळवळले त्यानी ठिकठिकाणच्या आपल्या सहकाऱ्याचे साह्य घेऊन शक्य तितक्या लोकांची खाण्यापिण्याची व्यवस्था केली या ठिकाणी दररोज सकाळ, संध्याकाळी हजारो जीव मिळेल तेवढे खाऊन आपली भूक शमवू लागले या महात्म्यानें या कामात तन, मन, धन या तीहि गोष्टींनें खपून मानवतेला जीवत ठेंवले. हे भोजनालयें जवळ अवळ ९ महिनेंपर्यंत सतत, अव्याहत, अखंडीतपणे ठिकठिकाणी, गांवोगावी चालू होते

याशिवाय अन्नान्न परिस्थितीला असलेल्या बांधवांना वाचव-ण्यासाठी म० फुले यांनी त्यावेळच्या सरकारला दुष्काळी कामें काढाव-याला प्रवृत्त केले परन्तु यामध्ये जे ठेके घेण्याचे काम करणारा ठेकेदार शक्यतो मजूराना ठरलेलीहि मजूरी न दता त्याच्या परिस्थितीचा फायदा घेऊन अपुऱ्या मजुरीवर काम करवून घेत ही त्याची दीन कहानी म० फुल्याना समजल्यावर म० फुले यांनी आपल्या मित्रपरिवाराच्या साह्याने निरनिराळ्या सरकारी कामाचे ठेके घेतले. त्या कामावर हजारो मजूर श्रमू लागले व त्याना ठरलेली मजूरी बिनबोभाट मिळू लागली. सरकारी कामामुळे दुष्काळी परिस्थितींत मजूरांना पैसा मिळून त्याना जगविण्याचा मार्ग म० फुलेंना मिळाला अशा दुर्घट प्रसगी जे थोर महात्मे कार्य करतात त्याचे मूल्यमापन पैशानें वा शब्दानें थोडेच करता येणार आहे त्याबद्दल आंतरिक मूकतेनेच कृतज्ञता प्रगट करता येईल. लाखो लोकानी ती प्रगट केली

मानवी जीवनात असे प्रसंग येणे म्हणजेच दैवपरिक्षा। जीव-नात ईश्वराच्या अस्तित्वाविरहित भाव ठेवून बर्तावयाचें, स्वैरपणाने, मन मानेल त्या आचाराने, जीवन घालवावे आणि अशा करुण प्रसगी हाय-हाय करून तडफडत मरावे हेच जीवन। सर्वसामान्याचे पण अशा कठोर सगीसुद्धा मानव प्राण्याना 'महात्म्या'कडून संरक्षण मिळते अशा

आणिबाणीच्या प्रसंगी मानवानी तरिहि इश्वराच्या स्वरुपास ओळख- ण्याचा प्रयत्न केला आहे का. पण महात्म्याना त्या सत्यस्वरुपी प्रभूचें अन्तःकरणात शिरुन अशा मानवाबद्दल दया जन्मविली म० फुलेसुद्धां त्यातीलच एक होते.

अशा प्रसंगास जे धैर्यानें तोंड देतात ते वीर, ते संत, तेच महात्मे किंवा थोर आत्मे होत. इश्वरी कार्य समजूनच तोंड देत असतात अशा परिक्षेला ते मुळीच डगमगत नाहीत उलट या परिक्षेत ते यशस्वी होण्याचा यत्न करतात व यशस्वी होतात तेंच महात्मे ।

★ ★ ★

# ड्युकचा दरबार ● ● ● १२

व्हिक्टोरिया राणीचे पूत्र ड्यूक ऑफ कॉनॉट हिंदुस्थानात आले असता त्यांचा सन्मान करून गौरविण्याचा एक समारंभ पुणे येथें करण्याचे अयोजित करण्यात आले व समारंभात येण्याचो निमंत्रण मानवंत नागरिकाना देण्यात आली म० फुले यानाहि निमंत्रणपत्रिका मिळाली ज्याना ज्याना निमंत्रन पत्रिका मिळाली त्यातील बऱ्याच जणाना आपण किती मोठ्ठे आहोत । विद्वान आहोत, असे होऊन ''मेरे पितर सरग भये, अशी अवस्था होऊन गेली

म० फुलेना मात्र या समारंभाचा समाजसुधारणा कार्याकरिता पुरेपुर उपयोग करून ठरविले समारंभाचे दिवशी ठरलेल्या ठिकाणी बघ्याची खूप गर्दी झाली होती निमंत्रितात नागरिक तर, लग्नाला वऱ्हाडी म्हणून जातात तसें नटून थटून आले होते

समारंभाचे दालन आधुनिक पध्दतीने शृंगारण्यात आले येऊन मधोमध ड्यूक साहेबाकरिता उच्चासन ठेवले होते निमंत्रितानी

समारंभ स्थान भरून गेलें ठरलेल्या वेळी ड्यूक साहेब आपल्या लवाजम्यानिशी येते झालें सरकारी अधिकाऱ्याची धावपळ सुरू झाली संरक्षकाच्या शिट्या झाल्या. लोकांनी उठून ड्यूकांना अभिवादन केले. ड्यूक आपल्या राखीव उच्चासनावर स्थानापन्न झाले ड्यूकांनीं सभोवार जमलेल्या राजनिष्ठ नागरिकाकडे पाहिले जो तो उत्तम वस्त्र परिधान करून आलेला हाताचे बोटात सोन्याच्या आंगठ्या वगैरे यावरून ड्यूकाना वाटले आपण हिंदुस्थानात पाय ठेवल्यापासून जे जे आपल्या स्वागताचे समारंभ झाले तिथे तिथे असाच धनसंपन्न नागरिकाचा जमाव पहावयास मिळतो आहे यावरून हिंदुस्थान देश हा श्रीमंताचा देश असून तेथील लोक अत्यंत सुखी व विलासप्रिय आहेत. हा ड्यूकाचा समज होऊन चुकला आता समारंभाला सुरूवात होणार तोच बाहेरील दरवाज्यावर जोर जोराने कुणीं बोलत असल्याचा आवाज वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्याना ऐकू आला. म्हणून ते गडबडीनें बाहेर गेले व पाहतात तो तें मोठ्याने बोलणारे दुसरें तिसरे कुणी नसून मराठी मुलूखासच नव्हे तर वैचारिक भारतातील बहुतेकांना, आपल्या कार्यानें परिचयाचे झालेले म० फुले हे होते म० फुल्याच्या हाती समारंभाची निमंत्रण - पत्रिका होती. ती पाहून तर अनेक इंग्रज नोकरांना आश्चर्याचा धक्काच बसला आलेल्या अधिकाऱ्यांनी म० फुले यांना समारंभस्थानी येऊन बसलेल्या लोकाना रांगेतील एका खुर्चीवर बसण्यास सांगितले पण, म० फुल्याना ते न ऐकल्यासारखे करून ते ड्यूक साहेबाच्या लक्षांत येईल अशा बेताने त्याच्या पुढेच खाली मांडी घालून बसले.

त्यावेळी म० फुल्याचा वेष खेडवळ शेतकऱ्याचा होता, पायात तुटक्या वहाणा, लंगोटी, अंगात फाटकी मळकी बंडी, त्यावर फाटके घोंगडे अंगाभोवती, डोकीस गुंडाळलेल जीर्ण कपड्याचे पागोटे, दाढी वाढलेली, हातात लोंबकळता पानाचा बटवा, त्यात सुपारी आदि जिन्नस नाहीत. हातात मोडकी अशी वेळूची काठी, असे ध्यान होते. त्याना पहाताच ड्यूकला हा काय प्रकार आहे तेच कळेना. म० फुलेना

ओळखणारे परिचित निमंत्रक, म० फुलेना अशा वेषात पाहताच 'फुल्यांना वेड लागल आहे त्याच डोक फिरल आहे. अस वाटून मोठ्या मुश्की- लीनें येऊ पाहणारे हसू त्यानी आवरले.

सर्व वातावरण म० फुले येण्यानें गोंधळून पुढे काय ? या विचा- रांत पडले तोच वरिष्ठाधिकाऱ्यानें मोठ्या आदबीने ड्यूकाना म० फुले हे कोणी सामान्य व्यक्ति नसून प्रख्यात सुधारणावादी व विद्वान म्हणून महाराष्ट्राला परिचित आहेत याचे मागे जनतेच्या सर्व थरातील स्त्री पुरुषाचा पाठिंबा असून हे एक धर्मक्रान्ती, समाजक्रान्ती करणारें पुढारी आहेत असा परिचय करुन दिला ड्यूकाना हे कळताच पहिले तिरस्कारी आश्चर्य नाहीसे होऊन ती जागा आता आदरानें घेतली म० फुल्यांना ड्यूकनी बहुमानाने संबोधून विचारले की, या वेशात येण्याचें कारण काय ? म० फुले उठून उभे राहिले व न अडखडता इंग्रजीत उत्तम रीतिनें बोलले. त्याच्या भाषणाचा आशय – मेहेरबान ड्यूक साहेब – आज आपल्या स्वागता करिता ही जी मंडळी जमली आहे तिच्या पोषाखा– वरून व नोकझोका वरून हिंदुस्थानातील लोक श्रीमंत असून पुर्ण सुखी आहेत असा आपला समज होऊन आपण त्या देशातील लोकांनाहि असेच सांगाल ! पण खरा हिंदुस्थान कसा आहे याची आपणास जाणीव व्हावी म्हणून मी या पोषाखांत आपणापुढे येऊन उभा आहे हिंदुस्थानातील शे० ९५ टक्के लोक अर्धपोटी व अर्धनग्न अवस्थेत जीवन जगत आहेत. अशा प्रजेवर इंग्लंडची राणी राज्य करीत आहे. राणीला निरोप सांगा की, या शे० ९५ टक्के प्रजेला सर्वितचे शिक्षण देऊन खऱ्या माणुसकीचा लाभ करून द्या !

हे इंग्रजीतील अत्यंत विचार परिलुप्त भाषण ऐकून ड्यूक मनात थक्क होऊन गेलें त्यांनी म० ज्योतिबाला धन्यवाद दिलें. निम- न्त्रित लब्धप्रतिष्ठितांची तोंडे पाहण्यासारखी झाली पुढे इंग्लंडच्या जनतेला ड्यूकनी ही माहिती दिल्याने त्यांचा हिंदुस्थानकडे पाहण्याचा दृष्टीकोण बदलला

सत्याचा पुरस्कार आणि दिग्दर्शन आचरणानें किती प्रभावी होऊ शकते त्याचा हा म० फुले यांच्या जीवनातील मोठा आदर्श आहे.

* * *

# सत्याचे सेवक म० फुले व त्यांचे विरोधक ● ● ● १३

विष्णुशास्त्री चिपळूणकर याच्या महतीची माहिती गतकालीन काहीं महाराष्ट्रीय शिक्षितामध्यें जी थोडीफार होती त्या मानाने वर्तमान काली जवळ जवळ नाहीच म्हटले तरी चालेल हे कालमहात्म्य आहे काल हा त्याचेच नाव अजरामर करतो की, ज्यांची बुद्धि व प्रयत्न "बहुजनसुखाय बहुजन हिताय" या कारणी खर्ची पडलें केवळ विद्वतेनें विद्वान झाले पण ज्याच्या विद्वतेची चमक, सत्य न्याय बाजूस सारून बहुजनहित विरोधार्थच चमकली अशाची नावे तो काल विस्मृति सागरात विलीन करवितो

म० फुलेच्या सत्कार्यास विरोध करणाऱ्यात कै० विष्णुशास्त्र्याचा पहिला क्रमाक लागेल शास्त्रीबुवा आपल्या निबधमालेतील एका प्रकरणात सत्यशोधक समाजासबंधी म्हणतात की, 'सत्यशोधक समाज हे काय प्रकरण आहे हे आमच्या वाचकास कळविणे जरुर आहे. ही माहिती त्यास अशाकरिता दिली पाहिजे की, हल्ली आमच्या देशात जिकडे पहावे तिकडे खेड्यापाड्यातून सुद्धा समाज व सभा स्थापन होत असल्याचे वरचेवर ऐकू येते तेव्हा आमच्या देशांत दूरदूरठिकाणी सत्यशोधक मडळीचे बहुधा नावहि माहित असण्याचा सभव नाही पुण्यासारख्या शहरांत ज्योतिबा प्रभृति विद्वन्मणीनी एवढ्या परम स्तुत्य उद्देशाने काढलेला व आज थोडीथोडकी नाही तर चार वर्षे सतत चाल-

लेला वरील समाज कोणास माहित नसून त्याच्या स्वरुपाचे प्रकाशन करण्याचे आमच्या सारख्या गरीब पुस्तक कर्त्यास अगत्य पडावे या गोष्टीचे आम्हास अत्यंत सखेदाश्चर्य वाटते ! पण, उपाय काय पडलें तें केलें पाहिजे.

शास्त्रीबुवांच्या वरील खुलाशावरून त्यांचे मनात सत्यशोधक समाजाविषयी व त्याच्या स्थापनकर्त्या म० फुले संबधी किती विरोधी व हीन प्रवृत्ति होती हे सहज प्रकट होते वास्तविक पाहता म० फुलेंनी पुण्यातील भिक्षुक [illegible] इ. स १८४७ ते ४८ पासूनच वैचारीक जागृतीचा सुरुंग ठेवून भिक्षुकशाहीचे अधिष्ठानास "नभूतो नभविष्यति" असा हादरा देऊन भयभीत केले होते बहुजन समाजास त्यांच्या अंधश्रद्धेच्या बळावर पाडलेल्या धर्मासंबधीच्या मोहनिद्रतून जागे केले, आतां हे खरे की, म० फुलेंच्या सत्यशोधनाविषयी विशिष्ट वर्गाचा बुध्दिपरस्पर गैरसमज करविण्याचे सौजन्य (!) पूर्ण सौहृद कार्य करण्याचा विडा ज्यानी उचलला होता त्या चिपळूणकर शास्त्रीबुवाना सत्यशोधकसमाजाचे हेतुचा विपर्यासी प्रसार करण्याच्या राहून राहून प्रसार वेदना होत होत्या नाहीपेक्षा १८७३ मध्यें सत्यशोधक समाजाची स्थापना होण्यापूर्वी जवळ जवळ २२–२३ वर्षे सत्यशोधनाची चळवळ पुण्यात व पुण्याबाहेर दूरवर ठिकठिकाणी वाढत असता विसराळूमति चिपळूणकराना तिचा सुगावा फार उशीरा लागावा किंवा त्यानी तसा कांगावा करावा हीच त्यांच्या ज्ञानाची उदारता म्हणजेच परमत सहिष्णुता ! ज्या पुण्यात कोठे नवीन नवलाईचे कांही घडले तर १२ तासांत ते वर्तमान, विशिष्ट वर्गात या टोकापासून त्या टोकापर्यंत वाऱ्यासारखे पसरत असे, त्या पुण्यात म० फुले व त्यांचे कार्य [illegible] माहिती असणार नाही असे शास्त्रीबुवा शिवाय कोण खरे म्हणेल ! म० फुलेंना शास्त्रीबुवांनी विद्वन्मणी म्हणून उपरोधाने गौरविले आहें. यात शास्त्रीबुवांचे ठायी असलेला बुध्दिचा कैफ अथवा ज्ञानोन्मत्ततेचा उग्र दर्प पक्षातींत वृत्तीला सुध्दा आल्याविना राहत नाही म० फुलेनी वैयक्तिक कोणाचा द्वेष अगर निंदा करण्याचे व करविण्याचे कुकार्य कधीच केले नाही पण, ईश्वरप्रणित मानवतेमध्ये श्रेष्ठत्वाचा

वारसा व तोही अिश्वर निर्मित आहे असे मानविणाऱ्या धर्ममतांचे कौशल्य पूर्ण विच्छेदनानें भेदनीति रोगास विलग करून त्याचे शुध्द, अभेदी मानवतेत विलनीकरण करण्याचे उच्च मानण्याचे अव्याहत कार्य केले व करविले या उलट शास्त्रीबुवांनी म० फुलेंची स्वत: साधेल तेवढी निंदा केली व करविली. यावरून शास्त्रीबुवानी आपल्या ज्ञान तेजानें बहुजनसमाजास अज्ञानातून ज्ञानाकडे नेण्याचा प्रयत्न करावयास पाहिजे होता ते सत्कार्य न करता अज्ञानाना अज्ञानांत ठेवण्या करताच विद्वतेचा उपयोग केला

एका गांवी एक विद्वान होते. त्याच्या अमोघ व अचाट वक्तृत्वानें मी मी म्हणविणारे आश्चर्याने थक्क होत खोट्याच खर व खऱ्याच खोट ते आपल्या बुद्धिचातुर्याने सहज करीत त्याची किर्ती खूप दूर दूर पसरली होती. पण त्यांच्या या करणीनें त्याना जाणते लोक लबाड म्हणत त्याच्या बुद्धिमत्तेपेक्षा त्यानी बुद्धिमत्तेवर कमावलेल्या पैशालाच काहीजण मान देत त्या गांवात ते 'खोट्याचा राजा' म्हणून प्रख्यात होते

या उदाहरणावरून हे उघड होते की विद्वानाची विद्वत्ता, शूराच शौर्य, व तदितर सद्‌गुण जर योग्य कामी खर्ची पडले, तरच ते सद्‌गुण नाहीपेक्षा दुर्गुणच ! रावण, कुंभकर्ण, दुर्योधन, शिशुपाल शूर होते, पराक्रमी होते पण, सत्याचे विरोधी होते, त्यामुळे राम, कृष्ण चरित्रात याचेहि नांव येते पण अहंकारी दुष्ट दुरात्मे म्हणून !

शास्त्रीबुवा म० फुलेंना उपदेश करण्याच्या अविर्भावाने म्हणतात "आमची शुद्र कल्याणेच्छु मंडळी आपल्या बांधवाच्या शिक्षणाच्या तजविजीला जर अगोदर लागतील तर त्यात त्यांचे शहाणपण दिसून येणार आहे. व ज्यांच्या हितार्थ ते झटताहेत त्याचेही त्यात कल्याण होणार आहे" हे परोपदेशी पांडित्य तर शास्त्रीबुवांनी अघळ पघळ केले पण आपणच केलेल्या उपदेशाविरुद्ध म्होरकेपणाचे काम शास्त्रीबुवांनी स्विकारले शास्त्रीबुवाच्या या निरोधाचा मतितार्थ हाच निघतो कीं, शास्त्रीबुवाना अराष्ट्रीय, व पारतन्त्र्यानुकुल ज्ञातिभेद टिकावयाचा होता

कांही होयत पडीतानी शास्त्रीबुवाच्या या राष्ट्रघातकी कृत्याची दखल घेण्याचे टाळले किंवा ते पडीत जनही स्वातंत्र्याची कदर, पारख करणारे नसावेत.

जातीभेदानें दुभगलेला समाज अभेद रुपानें करून त्या करवी राष्ट्रीय स्वातंत्र्याचे पूजन करण्याचे जर शास्त्रीबुवानी मनावर घेतले असते तर त्याची स्वातंत्र्य कार्यास बहुमोल मदत झाली असती, पण दुर्दैव शास्त्रीबुवाचे, त्यांनी हे सुकार्य तर केले नाहीच पण प्राणपणानें विरोधाची शिकस्त केली.

शहाजहाननें मुमताजकरिता ताजमहाल ही शिल्पकलेची अजोड कृति निर्माण काही काल का होइना पण, अमर केली पण ताजमहालच्या अमर सौंदर्यामुळेंच मुमताजचे नाव ऐकण्यांत येते केवळ सौंदर्यापुरता मुमताजजवळ असाधरण असा कोणताच गुण असल्याचे इतिहासात पहावयास मिळाला वा मिळत नाही. ताजमहाल पाहिल्यानतर, ती मुमताजबेगची कबर आहे हे समजताच मन उदास व खिन्न होते तीच गत शास्त्रीबवाच्या ज्ञान सपत्तीकडे पहाताना होते कारण त्याची विद्वता मूठभराच्याच कौतुकाचा विषय झाली व तिचा बराच व्यय बहुजनसमाजाच्या अहिताकरिता म्हणजेच निर्भेळ राष्ट्रयत्वाची कबर थडगे बाधण्यात झाला असे जर कुणी म्हटले तर वावगे होईल असें वाटत नाही

ज्या वेळी म० फुले याना बहुजनसमाजास साक्षर करण्याच्या, विद्याप्रसाराच्या राष्ट्रकार्यास शास्त्रीबवासारखे हेकडवृत्तीचे लोक अराष्ट्रीयपणे विरोध करू लागले त्यामुळें म० फुलेंना परकीय ख्रिश्चन मिशनरी लोकाचे सहाय्य घ्यावे लागले पण यांत जर कुणी दोषी असतील ते विष्णुशास्त्री व त्याचे अनुयायीच !

लोकमान्यानी अस्पृश्यता हा हिंदूधर्मावरील कलक आहे असें जळजळीत उद्गार काढून अस्पृश्यतेचा निषध केला पण, स्वतः लोकमान्य

प्रथम इग्लंडला जाऊन आल्यावर, अहमन्य भिक्षुकशाहीनें जे त्याच्या विदेशगमनासबंधी ग्रामण्य माजविले व त्या ग्रामण्यात लोकमान्यानी प्रायश्चित घेऊन त्याचे कोडकौतुक केले त्यामुळे परिणामी भिक्षुकशाही अधिक पुंड होऊन तिचा धागडधिंगा पुण्यात सुरु झाला. या ग्रामण्यवृत्तीस पुण्यात 'सार्वजनिक काका' म्हणून विख्यात असलेल्या सज्जनाने चांगलेच कृतिपूर्ण उत्तर देऊन निरुत्तर केले. (तो इतिहास वाचकांनी अवश्य वाचावा )

विष्णूशास्त्र्याच्या लिखाणावरून त्याना पारतंत्र्याचे दुःख वाटत होतें हे दिसते पण ते का ? याचे उत्तर मात्र हेच निघते कीं, त्यांना स्ववर्गीयाची गेलेली सत्ता (पेशवाई) व त्यामुळे आलेले पारतंत्र्य याबद्दल राहून राहून चीड येत होती पेशवाई गेली, ब्राम्हणीराज्य बुडाले, त्या राज्यातील ते वर्ण श्रेष्ठाचे वर्चस्व, तो दिमाख ते वैभव सारे सारे लयाला गेल्याने फिरून ते सर्व उच्च वर्णियाना प्राप्त व्हावे हाच त्याचा ध्यास होता आणि हेच म० फुलेंना व तत्सम विचारवतांना पटत नव्हते. कारण विष्णु शास्त्र्यांना अभिप्रेत असणारे स्वातंत्र्य म्हणजेच बहुजन समाजाचें पारतंत्र्य या पारतंत्र्याचे जोखड मानेवरून झुगारुन देऊन प्रगतीचे स्वातंत्र्य मिळ-विण्याचा सकल्प सत्यशोधकसमाजानें केला होता. म०फुलेंच्या 'गुलामगिरी' नामक ग्रथात हे विचार जागोजागी पहावयास सांपडतात.

अर्थशुन्य ग्रथावडबराने धर्माची प्रतिष्ठा ती काय राहणार ? इंद्र चद्रांच्या काल्पनिक दतकथानी अज्ञ श्रध्देयींकांना भुलविणे हे एक बुध्दिचे कसब ठरते ! पण सत्यार्थीच्या समोर मात्र त्यातील बालीशता उघड होते

पेशवाईच्या जमान्यात या भिक्षुकवीरांनी बहुजनावर किती हीन वृत्तीचे आक्रमण केले, त्याचे किती हाल केलें या सत्याचे स्मरण हरघडी होत असता विष्णुशास्त्री आणि कपनींनी पुरस्कारिलेले स्वातंत्र्य याबे असा कोणता विचार बहुजनांतील विचारवतास मानवेल ? ख्रिश्चन मिशनरींनी म० फुलेशी अनुनय करण्याचा प्रयत्न करतांच विष्णुशास्त्री

म०फुलेंची थट्टा करून म्हणतात "कोणत्याहि धर्मसमाजाचा उद्देश अर्थात हा असतो की, त्याचें अनुसरण केले असता धार्मिकतेच्या वृत्ति म्हणजे शांति, निरहंकारता, समदृष्टि, सभ्यता इत्यादि हृदयांत उत्पन्न व्हाव्यात व मनास उन्नति व प्रसन्नता प्राप्त व्हावी पण ही सर्व लक्षणे सत्यशोधकाच्या जगद्गुरुच्या ठाअी कितपत आढळतील बरे?" याच दृष्टीकोनातून विष्णुशास्त्र्याच्या विचाराचे परिक्षण केले तर शास्त्रीबुवानी स्वत च स्वत चे विडंबन केले असल्याचे दिसून येते बाकी हे खरे कीं, अट्टल मद्यपीच घसा कोरडा होईपर्यंत ताणून ताणून मद्यपानाचा निषेध करीत असतो. एकच प्यालयात सुधाकर म्हणतो की, "ज्याच्या तोंडाला आदले रात्री प्यालेल्या दारुची घाण येते त्यानें मला दारु सोडण्याचा उपदेश करावा? . " धर्माच्या नांवाखाली, स्ववर्गीयाची सत्ता नष्ठ झाल्यानें जी तकलूदी स्वाराभ्योमि त्या काळी काहींना उठली होती तिचे मनोगत कै० देवलांनी आपल्या शारदा नाटकात पुढील पद्यात यथा-तथ्य केले आहें . .

'अन्यधर्मी भूपाल आर्यभूचा । आर्यधर्मा अनुकूल नसायाचा ।
धर्मगुरुते निःसत्व दंडधारी । वर्णगुरुते मनसोक्त कर्मचारी ।।'

या पद्यात कै० देवलाचा कटाक्ष अन्य धर्मी म्हणजेच विदेशी ब्रिटीश राज्यसत्ता ही आर्यधर्माचाराला अनुकूल नसणारच आणि म्हणूनच चातुर्वर्ण्याभिप्रेत असणारी समाजव्यवस्था कोलमडून उच्चवर्णीयाना कोणी विचारेनासे झाले. याबाबत धर्मगुरु असे जे शंकराचार्य याची धर्मगुरु म्हणून आज्ञापालन करणारी पेशवाई सारखी राज्यसत्ता नसल्यानें तें निःसत्व दंडधारी झाले आणि वर्णगुरु (वर्णानाम ब्राम्हणो गुरु) "जे म्हटले ते कर्मब्राम्हण करतील व आळसामध्ये आपले पोषण व्हावे अशी तजवीज काढतील त्यास जेवावयास व दक्षिणा मिळाली म्हणजे झाले, धर्म अधर्म अनुशासन याचा ते विचार करीत नाहीत आता काही कुळंबी धर्मास्मे निघतील परंतु ब्राम्हण निघणार नाहीत सर्व जातीपेक्षा ते नीचपणास उतरले आहेत" या सनातनी विचारामुळेच

कै० ना० वा० टिळक पंडित रमाबाई आदि सज्जनांना मानवी स्वातंत्र्या-करितां धर्मांतर करावें लागले

स्वामी दयानंदानी वेद बहुजनापर्यंत आणून पोहोचविण्याचें परम थोर कार्य केले. पण ५ सप्टेंबर १८७५ रोजी न्यायमुर्ति रानडे व म० फुलेनी महर्षि दयानंदाची पुण्यांत थाटामाटाने मिरवणूक काढली असतां व रसटलेल्या विचारांचे पुण्यातील वारसदार भट्ट कंपनीनें आपल्या गुन्डयुक्त गुंडशाहीचे शेणापति वे शा स राम दिक्षित आपटे यांचे नेतृत्वाखाली गाढवाची मिरवणूक महर्षि दयानंदाच्या मिरवणू-कीत घुसवून दंगा माजविला. "पुढे रविवारच्या मोती चौकापासून दारूखान्याच्या पुलापर्यंत या गुंडानी बरीच गुन्डाई केली " परन्तु म० फुलेनी छातीचा कोट करून दगडविटाचा मारा स्वतःच्या देहावर घेऊन दयानंदाना सुखरुपपणे त्याच्या निवासस्थानी म० फुले व त्याच्या अनु-यायानी नेले यावेळी म० फुलेंचें सर्वांग रक्तबंबाळ होऊन गेले होते त्याच्या या असाधारण समयोचित वीरवृत्तीमुळे आनंदून महर्षि दयानंद व न्यायमूर्ति रानडे यांनी गुणानुवाद गाऊन म० फुलेंना धन्यवाद दिले

अश्वत्थामा, बली, व्यास, हनुमत, बिभिषण, कृप आणि परशु-राम हे सात चिरंजीव आहेत. अशी कल्पना धार्मिक शास्त्री पंडीतानी जनतेत प्रसारित केली परिणामी हे सप्त चिरंजीव प्रकरण खरेच असलें पाहिजे असे जनतेला वाटू लागले या सप्त चिरंजीवात शेवटी ज्याचे नाव आले आहे त्या परशुरामानें एकवीस वेळ निःक्षत्रिय पृथ्वी करण्याचे शौर्य गाजविले त्या परशुरामाला म० फुलेंनी ता. १ आगस्ट १८७२ रोजी खालील प्रमाणें नोटीस दिली "चिरंजीवा, परशुरामा, तू जर खरोखरच चिरंजीव असशील, तर सहा महिन्याच्या आंत या नोटीसीदाखल तू आम्हापुढे येऊन हजर हो, तसे न करशील तर तुझ्या विविधज्ञानी, म्हण-विणाऱ्या ब्राह्मण बच्च्यास ओढून आणुन त्यांची फटफजीती करण्यास आम्ही कधी कमी करणार ना . "

यावर कै० विष्णुशास्त्रीबुवा निबधमालेत लिहतात की, फुले महाराज वाट पाहतां पाहता थकले ७२ साल आटपत आले, तरी परशु-राम कोठे हू कां चू करीना " म० फुलेच्या नोटीसीची टिगल करण्या-करिता कै० शास्त्रीबुवानी वरील लिखाण केले पण शास्त्रीबुवांच्या हे लक्षात यावयास पाहिजे होते कीं, जेथे आडातच नाही तर पोहऱ्यात काय येणार ? ज्या परशुरामाचे चिरजीवत्वच लटके तेथे ते म० फुलेच्या नोटीसीस उत्तर देण्याकरितां येतीलच कोठून ?

२१ वेळ निःक्षत्रिय पृथ्वी केलेल्या परशुरामास पुन्हा २२ व्या वेळीहि तोच पराक्रम त्याचे हातून करविण्याकरीता शास्त्रीबोवा आणि मंडळींनी बुद्धि पुरस्सर त्याला काल्पनिक चिरजीवित्वाचे लेणे लेववित होते खरे पाहू जाता परशुरामाला म्हणजेच परशुरामास चिरजीव मानणाऱ्या शास्त्रीबुवा आणि कपनीला म० फुलेनी नोटीस देऊन २१ वेळा नि क्षत्रिय पृथ्वी कशी केली याचा जाब देण्याकरिता बोलावणे केले होते. जर २१ वेळची समस्या खरी असती तर चिरजीव असूनहि कांही महत्वाच्या कामात गुतलेल्या परशुरामास प्रत्यक्ष हजर होतां येत नसेल तर परशुरा-माभिमानी कपनीतील कोणीतरी तात्पुरते परशुरामाचे वकीलपत्र घेऊन उपस्थित व्हावयास पाहिजे होते. पण ते धाडस करण्या अितके शौर्य या परशुरामाभिमान्यांत नव्हतेच !

अज्ञान जनतेला धर्म समजूतीच्या कल्पनेवर झुलवित ठेवून आपली सामाजिक प्रतिष्ठा व आर्थिक स्थिती उत्तम राखण्याचा हव्यास बाळगणाऱ्यांकडून पौराणिक सत्यासत्यतेची अपेक्षा करणे वेडेपणाचेच होईल म० फुलेनी धार्मिक आचराचे मत्रतत्राचे स्वातत्र्य बहुजनाना प्राप्त करून दिले या सबधी कै० विष्णुशास्त्री म्हणतात की, महात्मा फुलेंनी नवीन असे काय केले ? शास्त्रीबुवाना यांत नवीन असे कांही वाटले नाही पण, हेच धार्मिक स्वातत्र्य पेशवाईत बहुजनाला काडीइतकेहि नव्हते याची जाणीव शास्त्रीबुवांनी सोईस्करपणे होऊ दिली नाही या पुरोहित प्रकरणांत जुन्नर कोर्टात केसेस होऊन त्या त्या धर्मातील लोकास आचार

स्वातंत्र्य आहे हे म० फुलेंचे मत मान्य करून तसा निर्णय दिला व व हाच ब्रिटीश राज्याचा विशेष होय.

शास्त्रीबोवाच्या विचाराचा तोल त्याना न आवरता आल्यानें ते शेवटी असे म्हणतात की 'म० फुलेंचा सत्यशोधक समाज अद्याप बाल्यावस्थेतच आहे, एकीकडे उपसर व दुसरीकडे भाबुरडे याच त्याच्या प्रचंड सीमा होत त्या अर्थी असल्या 'क्षूद्र' सभेवर हत्यार धरण्यास आम्ही उत्साह पावत नाही सत्यसमाज मंदिराच्या अग्रभागी ज्योतिरावाचा संगमरवरी पुतळा त्यांच्या शुभ्र यशाचा स्मारक म्हणून स्थापला जाईल तेव्हां त्याच्या मताच्या यथार्थत्वाविषयी विचार करता येईल"

अरेरे! दुर्दैव शास्त्रीबोवाचें की सत्यसमाज संस्थापक म० फुले याच्या कार्याच्या गौरवार्थ पुण्यासच काय पण महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी म० फुलेचे पुतळे उभारण्यांत आले आहेत व अजूनहि किती तरी उभारण्यात यावयाचें आहेत जेथे जेथे म० फुलेंचे स्मरण होईल तेथे तेथे जनस्वातंत्र्याचा आद्य प्रणेता म्हणून जनता मानाचा मुजरा करील आणि त्याचवेळी जनस्वातंत्र्याचे विरोधी म्हणून शास्त्रीबोवाना द्रोही म्हणून दूषण देईल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ...[illegible]... दि: ...[illegible]...
क्रमांक ...[illegible]... नों दि ...[illegible]...

* * *

# सहकार्याची भावना ●●● १४

म० ज्योतिराव फुले हे बहुजन समाजाचे पुढारी होते त्यांनी ब्राह्मण द्वेषाशिवाय दुसरे साधलें नाही वगैरे नाना आक्षेप फुल्यासंबधी घेण्यात येतात त्या सर्वांचा समाचार या प्रकरणांत घ्यावयाचे मी ठरविले आहे.

ज्योतिराव फुलेंवर ब्राह्मणवृन्दाकडून नाना तऱ्हेचे वाईट आघात झालेत ही सर्वमान्य गोष्ट आहे म० फुलेंचा दृष्टीकोण ब्राह्मण या जातीच्या विरोधात कधीच नव्हता ब्राह्मणातील ब्राह्मण्य वा पुरोहितवाद याविरूद्ध ते होते हे निःसशय ! एखाद्या ठिकाणी लग्न लावावयास ब्राह्मण बोलवावयाचा म्हणजे किती यातना, किती त्रास, किती, उपहास, अवहेलना व्हावयाची याची जाणीव आज कशी येणार ? पण आजहि अल्पाशानें येतेच ! त्याकाळी क्षुद्राकडे कोण, मृतात्म्याचे पिंडदान करावयास जाणार ? जाणार तो भरमसाट पैसे ( दक्षिणा ) घेणारा आणि तो बापडा जीव, येवढे पैसे देणार कुठलें ? मग म० फुल्यानी वेगळे 'सत्यशोधकी' ब्राह्मण तयार केले संस्कृत मंत्राचे मराठीकरण केले त्यात अनहित कोणते ? कोणते असें बिघडले ? मग तेवढयानें या पुरोहिताची डोकी फिरावी ! साध्या सुध्या माणूसकीच जीण माणसान जगू नये ? आणि तीच जाणीव म० फुलेंनी बहुजनांना दिली यांत ब्राम्हण द्वेष कुठे आला ? म० फुलेनी केलेल्या सुधारणा ब्राम्हणाकरितां नव्हत्या का ? केशवपन बालहत्या प्रतिबंधन आणि स्त्रिशिक्षण याचा जास्तीत जास्त फायदा कुणाकरिता झाला ? बहुजन समाजात केशवपन कधीच

नव्हते, आणि नाही. मग ही सुधारणा कुणाकरिता झाली ? तरीहि म० फुल्यांचा जळजळाट, लूपर्यंत मजल – हा दोष कुत्सित प्रवृत्तीच्या लोकानी केला ते व्देष्टे का म० फुले द्वेष्टे हे सत्य उघड होईल

"मराठी भाषेचे शिवाजी" म्हणविणारे ( कुणी पदवी दिली कुणास ठाऊक ! ) किंवा " धर्म रक्षक आद्य शंकराचार्य " म्हणून ललामभूत झालेले, विष्णू कृष्ण चिपळूणकर यांनी ही 'ब्राम्हणेतर ज्योति' विझविण्याचे किती निंद्य प्रयत्न केलेत, हे नव्याने सांगण्याची गरज काय ? अेकीकडे संकटात मदत देणारे ज्योतिबा तर दुसरीकडे संकटसमयी शिरच्छेद करणारे हें धर्ममार्तंड (!) उभी ह्यात ज्यानी ज्योतिबाचा विरोध करण्यांत घालविली त्याच्या देहान्तासमयी ज्योतिबानी जो दिलदारपणा दाखविला, त्यास दुसरी जोड आहे का ? प्रसिद्ध कोल्हापूर प्रकरणी भीतिनें शास्त्रीबुवानी अपघातानें, आपला मृत्यू ओढवून घेतला, असा जेव्हा पोलीसानी आरोप ठेवला तेव्हा याच महात्मा फुल्यानी पोलीसाची विनवणी करून शास्त्रीबुवाच्या शवाची चिरफाड न होवू देता, शवाला सन्मानानें अखेरच्या स्थानी पोहचविले! ही ती अुदारता ! हे वीराचे वागणें मग अशा वीराला ब्राम्हणद्वेष्टा म्हणण्यात कोणता अर्थ आहे

१९५४ च्या जुलै मध्ये 'विष्णू कृष्ण चिपळूणकर काल आणि कर्तव्य हे ग. त्र्य. माडखोलकरांचे पुस्तक प्रसिध्द झाले आहें त्यातील 'कर्तव्य' या १६ व्या प्रकरणात २०६ पानावर ते म्हणतात –

'गुलामगिरीत, आणि सार्वजनिक सत्यधर्मात ज्या फुल्यानी वेदपुराणाचा उपसा केला आणि सगळ्या जगाच्या इतिहासाची झडती घेतली त्याना इंग्रज, युरोपियन आणि अमेरिकन यांच्या अखिल मानव जातीचे आणि विशेषत सर्व श्वेतेतर लोक समाजाचे शोषण आणि निर्मू -लन करणाऱ्या असुरी साम्राज्यवादाचा अणुमात्र सुध्दा बोध होवू नयें हा केवढा चमत्कार ! लोकहितवादी, आणि रानडे यानीहि पारतंत्र्याला ईश्वरी कृपाप्रसाद म्हणण्याचा घृणास्पद, राष्ट्रीय प्रमाद केला ही गोष्ट खरी पण ! त्या बरोबरच ब्रिटीश साम्राज्य शाहीच्या शोषक भेदनीतिचे

ते वाभाड काढावयाला चुकले नाहीत. आणि त्यानी लोकमत त्या नीतिविरूद्ध हळूहळू संघटीत केले. हे विसरून चालणार नाही पण, फुटल्याचे डोळे मात्र कधीच उघडले नाही. त्याच्या या अेकांगी विकृत जातीय प्रचाराचा आणि पारतन्त्र्याचा राष्ट्रघातकी पुरस्काराचा दुष्परिणाम महाराष्ट्राच्या जीवनावर किती भयकर झाला याची साक्ष इतिहास देतच आहे,,

उपरोक्त माडखोलकराचा उतारा मननपूर्वक सर्वांनी वाचावा. त्याच्या त्याच पुस्तकातील पान न. १९८ वरील उतारा वाचावा.

" परन्तु मी तुला सागतो की, -- इग्रज लोक आज आहेत उद्या नाहीत. ते आपल्या जन्मास पुरतील म्हणोन कोणाच्याने खात्री देवून सांगवत नाही. यास्तव त्या लोकाचे राज्य या देशात आहे तोच आपण सर्व शुद्रानी जलदी करून भटाच्या वडीलोपार्जित दास्यातून मुक्त व्हावे यातच शहाणपणा आहे ,,

पा. न १९९ -- " हाती लागेल त्या हत्यारानें ब्राम्हण्याचा नायनाट करण्याची आणि शक्य होईल त्या साधनाने मागासलेल्या जातीचा उध्दार करावयाची तळमळ त्याच्या जीवाला लागली होती "

पा न. १९५ 'इग्रज सरकारचा या देशांत मोठाधर्म हाच आहे कीं, त्यांनी विद्या वाढवून लोकास शहाणें करावे आणि जेव्हा स्वदेशाचे राज्य करण्याचे व्यवहारिक ज्ञान, यास येईल, आणि हे पृथ्वी-वरची हकीकत जाणतील, आणि दुर्गुण सोडतील तेव्हा हे राज्य त्यानी त्याचें हवाली करावे'.

माडखोलकरासारख्या सूज्ञ विचारवतानी म० फुल्याबद्दल असे घृणास्पद शब्द काढावेत हीच अत्यत निंद्य गोष्ट होय ! माडखोलकरानी जे महात्मा फुले संबधी नवीन (!) संशोधन केले ते कितपत सत्य आहे.

याचा पडताळा प्रत्येकांस उपरोक्त पुरावे (त्याचेच) वाचून कळण्यासारखे आहे म० फुल्याचें कार्य अविरत, अविश्रांत, अखिल मानव जातीकरिता होते "यारे यारे लहान थोर । हो कां भलत्या याति नर ।।" कुठल्याहि जातीचा माणूस, त्याच्या संघटनेत येत असे असे असताना म० फुल्यांनी जातीय प्रचार केला हा शोध माडखोलकरांना कुठे लागला? म० फुल्यांनी केलेल्या सुधारणामध्ये ब्राम्हणवर्ग भागीदार नव्हता काय ? ब्राम्हणाकरितां त्यांनी कांहीच केले नाही काय ? या प्रश्नाचे उत्तर या महाशयाकडे मिळेल काय? उलट म०फुल्याच्या कार्याचा प्रसार होऊ नये, म०फुल्याचा नायनाट व्हावा म्हणून याच कृष्णशास्त्री चिपळूणकरादि ब्राम्हणवर्गानें, धर्ममार्तंडानी (!) आकाश पाताळ अेक केलें यांचा इतिहास पुनः पुन्हां कशाला उजेडांत आणावा ? म० फुलेना जीवे मारण्याचा दुष्ट प्रयत्न कुणी केला ? "म० फुलेंच्या जातीय प्रचाराने जे परिणाम झाले ते आज साक्षीत्वानें दिसत आहेत, महाराष्ट्रीय जनता भोगत आहे" असे ते म्हणतात. इतिहासाकडे कशाला नजर टाकावयाला सांगता महाराज ! समाजाचे, बुद्धिचे, आणि भोळ्या बहुजन अज्ञ समाजाच्या देवत्वाचा अधिकार ब्राम्हण वर्गाने लुबाडला होता त्याची ज्याची त्याना ओळख करून देण्याचें कार्य म० फुल्यानी केले महार धोतर (पचा ठेऊन) नेसला तर, किर्तनात, संस्कृत श्लोकाचा उच्चार केला तर, कैकाना काळेपाणी मिळाले. (पा. नं.-१९८) हे आपणच कबूल करता नव्हे, आपणच उद्धृत केले आहे अशा जीवनमानात जातीयता कुणी कालविली. ? शिवाजी महाराज मराठा नव्हते ! त्यांना राज्याभिषेकाचा अधिकार नाही, ही जातीयता कुणी गायीली ? ब्राम्हण्याने जे कडवट जातीयतेचे जहर बहुजन समाजाच्या घशात ओतले, आणि त्यामुळें जो बहुजनरूपी शिवशंकराचा कंठ नीळा झाला, त्या 'नीळकंठाची' म० फुलेंनी सर्वांना ओळख करून दिली ही काय जातीयता झाली ? म० फुलेंच्या कार्याचे परिणाम भोगीत नसून म०फुलेंच्या कार्याच्या परिणामी महाराष्ट्र जीवंत झाला, जागा झाला ! इतिहासाने ज्याचे त्याला परिणाम दिलेच

आहेत. सन १९४८ च्या विघातक राष्ट्रघातक कृत्यानें जी जातीयता दाखविली ती कुणाची ? आणि म्हणें, म० फुले जातीय प्रवृत्तिचे !

दुसरें असे की, इंग्रज लोक हे कांही दिवसापुरतेंच इथे राहणार शिक्षणानें जनता सुधारली की, मग राज्य कारभार चालविण्यास ते तय्तर होतील ही त्याची वृत्ति ! भोगवादी, विलासी पेशव्याच्या कारकीर्दीमुळे महाराष्ट्रांत त्यावेळी इंग्रजी सत्ता आली.जरी महाराष्ट्राने प्रतिकार केला असता तरी इंग्रजाच्या नवीन संशोधित सुधारलेल्या, युद्ध हत्यारापुढे मानवबळ हे केवळ हत्याकांड झाले असते ! अशा परिस्थितीत म० फुल्या नी इंग्रजी सत्तेला जे मानले ते केवळ शिक्षणप्रसारार्थंच मानले ! इंग्रजानी ही जनता सुज्ञ झाली म्हणजे त्यांचे राज्य त्यांना परत करावे अशी सूचना म० फुलेंची याच पुस्तकात असतांना, म० फुलेनी इंग्रजी साम्राज्यसत्तेला विरोध केला या आक्षेपात कुठले तथ्य उरणार ? शिवाय म० फुलेंना प्रथमतः घरात दुरुस्ती करावयाची होती, घरात केर ठेऊन आंगण साफ ठेवावयाचे, ही वृत्ति त्यांची नव्हती. ते राजकीय पुढारी होते का ? ते समाज सुधारक होते ! त्यांनी बहुजनसमाजाची वडीलोपार्जित दास्यत्वा-तून मुक्तता केली ! अेका ब्राम्हण समाजाच्या मुठभर लोकांनी बहुसंख्य समाजास शुद्र ठरवून त्यांची पिळवणूक करावी हे म० फुलेंना योग्य वाटले नाही ! "आमचा अेकटा समाज तेवढा श्रेष्ठ, व इतर तेवढे कनिष्ठ" ही नीति त्यांना आवडली नाही. या वर्गभेदाविरुद्ध त्याना लढा द्यावयाचा होता आणि कुठलाहि वीर जर मिळमिळीत धोरण ठेवील तर तो जीव-नात सफल होणार नाही" मग म०फुलेंनी तळमळाटानें,संतापाने या वर्ग--भेदा विरुध्द लढा दिला यात नवल कसले ? म० फुले जर अशा तऱ्हेने जातीय वृत्तिचे असते तर त्यानी याच कृष्णशास्त्री चिपळूणकरांच्या शवाला कशाला ताब्यात घेतले असते. बाळ गंगाधर टिळक यांची जमानत कशाला घेतली असती ? टिळक, आगरकराचा कशाला सन्मान केला असता ? उलट ग. त्र्य. माडखोलकरांनीच आपली निंद्य प्रवृत्ति प्रगट केली असे नाईलाजानें म्हणावे लागेल !

सन १८८२ साली महाराष्ट्रात चौथे शिवाजी प्रकरण उद्‌भवले. त्या वेळी चौथे शिवाजी महाराज अल्पवयी असल्यामूळें दिवाण वासुदेव महादेव बर्वे व एक एजंट हे कारभार पहात होते. महाराज जसजसें वयाने वाढू लागले तसतशी कारभाराची सूत्रें ते आपल्याकडे घेऊ लागले. 'बर्वे आणि दलालास' ही राजसत्ता आपल्या हातची जाऊ नये असे वाटत होते. म्हणून त्यानी " महाराजाना वेड लागले " अशा तऱ्हेनें हूल उठविली सरकारने सुद्धा न्यायदेवता आंधळी असते यानुसार महाराजांना वेडे ठरविले त्यामुळे त्याना अहमदनगरचे किल्ल्यात कोंडून ठेवण्यात आले. त्यांचे अतोनात हाल होऊ लागले महाराष्ट्रात असंतोष पसरला. या असंतोषाला टिळक, आगरकरांनी आपल्या केसरीमधून वाचा फोडली. त्यामुळे टिळक आगरकरावर याच बर्वेकडून कोर्टात केस भरण्यात आली त्यावेळी हे प्रकरण चालविण्यास व टिळक आगरकरांना जामीन देण्यास, ज्योतिराव पुढे झाले त्याचें मित्र श्री रामशेठ उरवणे याचेकडून १०,००० चा जामिन भरवून टिळक आगरकराना मोकळे केले. पुढे दोघानी चार महिन्याची साध्या कारावासाची शिक्षा भोगली या शिक्षेच्या निषेधार्थ आणि टिळक आगरकर सुटून आल्यावर सन्मानार्थ महात्मा फुलेंनी सभा घेतली. टिळक आगरकरांना शेला-पागोटे अर्पण करण्यात आले.

याच वेळी लोकाना म० फुलेंची किमत कळली. " म० फुले हे इंग्रज भक्त व ब्राह्मण द्वेष्टे आहेत " असें म्हणणाराच्या तोंडाला उप-रोक्त कृतिनें कुलूप बसले. याच वेळी केसरीनें ता. ३-१०-१८८३ च्या तिसरे पानावर एक स्फुट लिहून ज्योतिरावाचा गौरव केला

टिळक, आगरकर, चिपळूणकर आदि ब्राह्मण जनसेवकांच्या सेवेबद्दल म० फुलेंना नितांत आदर होता चिपळूणकरानी तरी म० फुलेंचे चागलें वाभाडे काढले पण म० फुलेंनी चिपळूणकराना अखेरहि समा-धानानें, मानानें मरण घडू दिले हा म० फुलेंचा उदारमतवाद ! यात जातियवादी कोण ? आज त्यांच्या मृत्यूनतरहि त्यांच्या कृतिचा श्रेष्ठपणा या नरपुंगवानी ( ! ) मान्य करू नये ही खेदाची गोष्ट होय !

* * *

# शैक्षणिक आणि राजकीय कार्य ● ● ● १५

गत प्रकरणामध्ये मी 'म० फुले' समाजसुधारक होते आणि आता राजकीय कार्याचा आढावा घेणार आहे ! तेव्हां प्रथमदर्शनी विसंगती वाटू नये म्हणून प्रथमत खुलासा करतो म० फुलेंचे प्रथम किंवा अग्रकार्य म्हणजे समाजसुधारणा आणि तदर्थ पर्यायानें घडणारे राजकीय कार्ये ! माडखोलकरांनीं म्हटल्या प्रमाणें 'फल्यांचे डोळे कधीच उघडले नाहीत ना, शिक्षणाचा डोळा असूनही डोळेझाक केला हे आपण या प्रकरणी बघू वेळोवेळी प्रासंगिक आणि आवश्यक त्या सूचना, हक्काची मागणी पण विनयानें, त्यांनी तत्कालीन राज्यकर्त्यांना केलेली आहे. वडिलार्जित बहुजन समाजाचे दास्यत्व दूर करावयास निघालेला हा महात्मा बहुजन समाजाच्या शिक्षणाकरिता तळमळत होता शिक्षणासाठी लोकाना प्रवृत्त करीत होता भोळ्या आणि अज्ञानी लोकाना शिक्षणाचे महत्व पटवून देऊन शिक्षणाची आवड निर्माण करीत होता पण हें कार्य सार्वत्रिक व्हावे या उद्देशानें त्यांनी १२ वर्षाचे आंतील मुलांना सक्तीचे प्राथमिक शिक्षण व्हावे अशा तऱ्हेची मागणी केली. सत्यशोधक समाजाकडून ही मागणी १८७४ पासून सुरु झाली. पण सरकारचें अेवढे काय अडलेले होते शिक्षणाबद्दल सुधारणा होणे आणि ते अनिवार्य होणे, याकरिता सरकार जेव्हां मूग गिळून बसले ! तेव्हा ठिकठिकाणाहून हजारो सह्यांचे अर्ज सरकार दरबारी पाठविण्यात आले दहा वर्षानंतर या घटनेला किंचित् स्वरुप आले तत्कालीन सरकारनें त्याकरिता अेक समिती नियुक्त केली. या समितीचे अध्यक्ष हंटर साहेब होते ह्या समितीसमोर

बऱ्याच लोकांच्या साक्षी झाल्यात. त्यात म० फुले याची देखिल साक्ष होती ह्या कमेटी पुढील साक्षीत ते म्हणतात जर सरकार गर्वाने –

आम्ही हिन्दुस्थानचे मायबाप आहोत असे म्हणवून घेते तर सरकार काही चांगल्या वाईटाचा विचार न करता सक्तिचे प्राथमिक शिक्षण का करीत नाही ? या साक्षी विरुद्धदेखिल काही साक्षीदाराच्या साक्षी झाल्याच, शिक्षणाची द्वारे सर्वांना खुली होणार, हे कसे मान्य होणार बरे ! विरोधकानी विरोधात साक्षी नोंदविल्या सरकारचा असा समज झाला की या योजनेस जनतेचा पाठिंबा नाही सरकारनें बोटावर मोजण्या इतक्याच्या साक्षी घेतल्या. एकीकडे अज्ञानी, अशिक्षित लोकाच्या साक्षी तर दुसरीकडे बुद्धवादी वर्गाच्या साक्षी त्यामुळे या समितीनें सक्तीचे शिक्षण सुरु केले नाही.

आज सामुदायिक सक्तिचे शिक्षण व्हावे म्हणून मागणी करण्यात येते आपले सरकार त्या प्रयत्नांत आहे त्या दृष्टीने म० फुलेंचे प्रथम पाऊल होय ! असे मानावें लागेल आज जो बहुजनसमाज पुष्कळ अशी सुशिक्षित, साक्षर झाला हे ऋण म० फुलेचे होय म० फुलेंनी सरकारच्या समितीनें नाकारल्यावरहि निरनिराळ्या पुस्तकातून, 'दीनबंधू' साप्ताहिकातून, सभातून, व्याख्यानातून, शिक्षणाचे महत्व लोकाना पटवून दिले व शिक्षणास्तव लोकाना प्रवृत्त केले. त्याचेच शिष्योत्तम कर्मवीर भाऊराव पाटील सातारा याच्या कार्याचा विस्तार पाहिला म्हणजे कुठल्याहि माणसाचा उर भरून येतो. शिक्षणाची केवढी विशाल प्रगति झाली किंबहुना विदर्भातील शिक्षण संस्थाचें कार्य पाहिले म्हणजे, किती प्रशंसनीय आणि अभिमानास्पद आहे हे कळेल. पण या सर्वांच्या ठाअी बीजरुपाने ज्योतिराव फुले उरलेले आहेत हे विसरून कसे बरे चालेल !

"आधुनिक सुधारणाचे उत्पादकत्व जसे ज्योतिरावाकडे जाते तद्वतच भारतीय स्वातंत्र्याचे जनकत्व सुद्धा त्याच्याकडेच आहे हिन्दभूमि स्वतंत्र करावी या करीता, कॉंग्रेसच्या स्थापनेपूर्वी चाळीस वर्षां अगोदर त्यांनी पहिला टाहो फोडला परंतु बहुसंख्य जनता अज्ञानात, दारिद्र्यात,

आपसातील कलहात वावरत आहे जातीजातीत वैषम्य, वर्णद्वेष वाढलेला होता. धर्मभेदाचे बंड निर्माण झाले होते आपल्या द्वेषवासियांचे 'घर' सुधारल्याशिवाय बाहेरचे क्षेत्र ताब्यात घेणे हितावह नव्हते आळस त्यागिल्याशिवाय बंडाची किंवा स्वातंत्र्य क्रांतीची नौबत बडविण्यांत अर्थ नाही तत्पूर्वी पाश्चात्या प्रमाणेच शिक्षण घेऊन सुशिक्षित, साक्षर व्हावे, आणि बहुजन समाजात वैचारिक क्रांती करून मगच क्रांतीची मशाल पेटविण्यास "गुलामगिरीच्या" राक्षसास जाळता येईल. यावर त्यांचा अटळ विश्वास होता. त्याच्या कार्याची आता 'ज्योति' च उरली नव्हती, तर 'मशाल' बनली होती, 'मशालच्या' प्रखर प्रकाशांत अंधारात चाचपडणाऱ्या जीवांना, भेसूर समाज स्थितीचें दर्शन घडले आणि मग लोक शिक्षणास प्रवृत्त झाले. ज्योतिरावाच्या कार्यार्थं सरकारकडून जी मदत येई तदर्थ ते सरकारचे आभारहि मानीत. तर प्रसंगी कठोरतेनें विरोधहि करीत. मग ज्योतिराव फुले यांचे डोळे उघडले नाहीत, त्यांनी इंग्रजी सत्तेला विरोध केला नाही या आक्षेपात तथ्य कोणते उरणार?

अुपरोक्त आक्षेपाचें विरोधात पुन्हा अशी उदाहरणे देण्यासारखी आहेत सन १८७४ ते १८८३ पर्यंत महात्मा ज्योतिराव फुले हे नगरपालीकेचे सभासद होते सन १८८० च्या नगरपालिकेच्या सभेंत एक ठराव आला ज्योतिरावानी त्या ठरावास विरोध केला पुण्यातील जुनी मंडई मोडून त्या ठिकाणी बाजार व्हावा आणि या मार्केटला 'रे मार्केट' हे नाव देण्यात यावे, हा तो ठराव[1] महात्मा फुलेंच्या अनुयायादि सदस्यासह त्याचा या ठरावास विरोध होता त्याचें प्रतिपादनार्थ त्यानी वर्तमान पत्रातून, सभातून त्यावर जनतेला विरोधी मते ऐकविली. पण त्यावेळी या मार्केटला जे रे साहेबाचे नाव देण्यात येणार होतें, ते रे साहेब युरोपियन होते त्यामुळे ज्योतिरावाचा विरोध लुळा पडला. आणि अखेर त्या मार्केटला 'रे मार्केट' हे नाव देण्यात आले या विरोधामुळे ज्योतिरावावर इंग्रजाची खपा मर्जी झाली इंग्रजाच्या या खपा मर्जीमुळे विरोधकाना आनंद झाला आता — म० फुले हें इंग्रजाच्या विरोधात नव्हते किंवा माडखोलकर म्हणतात त्याप्रमाणे त्याना अणुमात्रहि साम्राज्यवादाचा

बोध नव्हता ! या म्हणण्यांत कोणते तथ्य राहिले म० फुले हे इंग्रज कृपेचे याचक असते तर त्यानी वेळोवेळीं सूचना देणें, विरोध करणें आदि सरकार विरोधी गोष्टी केल्याच नसत्या असे माझे मत आहे

स्वातंत्र्याचा जनक म्हणून प्रथम मी उल्लेख केलेला आहेच माझ्याच मताचे पुरस्कर्ते श्री पंढरी पाटील, हे प्रथम चरित्र लेखक आहेंत. आणि कैंक लोक देता येतील मग माडखोलकरानी चिडचिडीस येऊन हें का खरडावे ? कांही कळत नाही

ज्या 'रे मार्केट' प्रकरणी म० फुलेंनी विरोध केला त्याच रे मार्केटला जुने नांव जाऊन आज 'महात्मा फुले मार्केट' म्हणून संबोधण्यांत येते ही किती दैवानुकुलतेची घटना म्हणावयाची !

सन १८८० मध्ये पुणे नगरपालिकेला व्हॉईसरॉय साहेब भेट देण्यास आले. त्याचे सन्मानार्थ १००० रु खर्च करावयाचे सदस्यानी ठरविले. म० फुलेंनी या ठरावास विरोध नोंदविला आज सुद्धा व्हॉईसरॉयांना विरोध करणे साधेसुधे कर्म नाही तेव्हा त्यावेळी तर इंग्रज राज्यकर्ते होतें इंग्रजांच्या कार्यासाठी, उगीच भारतीय जनतेचा पैसा खर्ची पडू नये म्हणून त्यानी विरोध दर्शविला आज जवळ जवळ ८० वर्षां पूर्वी अशा रीतीनें विरोध करणे किती धाडसाचे काम होते हे कळेल.

ज्योतिरावाच्या कार्यार्थ इंग्रज गृहस्थानी बरीच मदत केली पण म० फुले इंग्रजाचे विरोधक आहेत वर्तमान पत्रातून, व्याख्यानातून, इंग्रजी राजसत्तेला — अन्यायी वर्तनाबद्दल टीका करुं लागले तेव्हा इंग्रज लोकाना ते सहन झाले नाही. त्यांचा मत्सराग्नी पेटला म० फुले या स्थितीबद्दल "गुलामगिरीत" म्हणतात — भट पाड्यांचें बंड उपस्थित झाले तेव्हापासून बरेच इंग्रजलोक माझ्याशी पूर्वीप्रमाणें मोकळे न वागता मला पाहिल्या बरोबर कपाळावर आठ्या घालू लागलें आहेत. तेव्हापासून मी त्याच्याकडे जाणेयेणे सोडले "

इंग्रज लोकाच्या विरोधाचे त्याचे अजूनहि पुरावे देता येण्या सारखे आहेत या पुस्तकातील 'साहित्य सेवा' या प्रकरणातील त्याच्या साहित्यावरून आपणास कळेलच

सन १८८५ मध्ये डिसेंबर महिन्यात दादाभाई नवरोजी या पारशी सद् गृहस्थाने 'राष्ट्रीय सभा म्हणजेच इंडियन नॅशनल कांग्रेसची स्थापना केली या सभेचे सदस्य बहुताशी व्यापारी वर्गातीलच होते या संबधात 'सार्व-जनिक सत्यधर्म' मध्ये म० फुल्यांनी लिहिले आहे की, – 'धूर्त आर्यभट ब्राम्हणाच्या मुलानी ज्या सभा उपस्थित केल्या आहेत त्या पैकी मुख्य पुणे येथील सार्वजनिक सभा आणि नॅशनल कांग्रेस ! त्यात कुळबी, माळी, धनगर वगैरे शेतकरी किंवा साळी, कोष्टी, खत्री वगैरे कारागीर याचे नाव सुध्दा नाही उलट बारा अलोत्या पैकी ब्राम्हण, जोशी, उपाधी अलोत्याचा मात्र या सभेत भरणा आहे बाकीचे सरकारी कामगार, वकील, अगर श्रीमंत आहेत, यात महार, माग कसे असणार ? अथवा त्याच्या पडझडी संबधाने या सर्वांनी कधी सरकारास, अर्ज केल्याचेहि माझ्या कानांवर नाही. उलट मोघम हिंदूच्या नावावर, कलेक्टरांच्या जागा इंग्रज सरकारने द्याव्यात म्हणून या सभेच्या रेकॉर्डात अर्ज असतील परंतु ते अर्ज अविद्वान, शुद्रादि अति शुद्राला काय उपयोगाचे ! मोघम नाव हिंदूचे आणि उपभोग घेणारे ब्राम्हण ! वाहवारे सभा ! आणि वाहवारे तिचे दुटप्पी रेकॉर्ड ! यावरून या बलिस्थानातील एकदर शुद्रादि अतिशुद्रासह भिल्ल कोळी वगैरें सर्व लोक विद्वान होऊन विचार करण्यालायक होई पावेतो ते सर्व अेकमत झाल्याशिवाय ती सभा ***National*** होऊच शकत नाही. असें असताना अेकट्या उपऱ्या आर्यभट ब्राम्हणानी, अगर चार व्यापाऱ्यानी नॅशनल कांग्रेस स्थापिली, तर, तिला कोण विचारतो ?, उपरोक्त उतार्यावरून आपल्या हे लक्षात येईल की, या नॅशनल कांग्रेसला म० फुलेंचा का विरोध होता, ही सभा त्यावेळी 'स्वराज्याचा मूलमंत्र न देता तत्कालीन राजवटीला पोषक अशा वृत्तिने वागत होती. शिवाय ही सभा राष्ट्रीय म्हटल्यानतर त्यात सर्व जातीच्या लोकांचा अन्तर्भाव असणे जरुर आहे. हीच गोष्ट म० फुलेंना

आवडली नाही म्हणून त्यानी नॅशनल काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशन प्रसगी म्हणजे सन १८८९ मध्ये अेक विरोधात्मक योजना आखली. वास्तवता या योजनेत विरोध म्हणून नव्हता तर — नॅशनल काँग्रेसला सत्याचे दर्शन घडावे, ही नॅशनल म्हणविणारी काँग्रेस खऱ्या अर्थाने राष्ट्रीय व्हावी हा त्याचा प्रयत्न होता म० फुलेनी गवताचा अेक भव्य असा शेतकऱ्याचा पुतळा तयार केला अगात काहीच नव्हते डोक्यावर फक्त पगडी होती खाद्यावर घोंगडी आणि लगोटी लावलेला असा तो शेतकरी ! त्याच्या अेका हातात विळा असून, दुसऱ्या हाताक अेक फलक दिला होता त्यावर ' राष्ट्रीय सभा ही देशातील बहुजनसमाजाची नसून ती मूठभर पाढरपेशे व धनीक व्यापाऱ्याची आहे. देशातील २० कोटी शेतकऱ्यापैकी अेकहि प्रतिनिधी तिच्यात नाही जोपर्यंत देशातील २० कोटी लोकाचा तिला पाठिबा मिळणार नाही तोपर्यंत तिला राष्ट्रीयसभा म्हणतां येणार नाही " असे लिहलेले होते हा पुतळा ३० फूट उचींचा होता

यावरून आपणास हें कळून येईल कीं, म० फुले याचा काँग्रेस स्थापण्यास किंवा तिच्या कार्यास विरोध नव्हता, तर तिच्या विसगत आणि अन्यायी धोरणाचा, किंवा चुकणाऱ्या मार्गाचा त्यानी विरोध केला ती काँग्रेस सार्वत्रिक असावी, सर्वांची असावी, समानहक्कानें राबणारीं असावी, असे म० फुलेचे म्हणणे होतें यावरून त्याचा या चळवळीस विरोध होता, हे म्हणणे मूर्खपणाचे होईल ! ज्योतिराव फुलेनी त्या वेळच्या काळात केलेले धाडस काळाच्या मानानें किती महत्वाचें होते त्याचे मूल्यांकन शब्दानें कसे करता येईल ? उलट त्यानी जे प्रसगी धैर्य दाखविले ते दाखविण्यास कुणी मायेचा पूत तर निघालाच नाही पण टीका टिप्पणी करणारे असख्य जन्मले आजहि शब्दाचा किसन्‌किस पाडणारे पडीत ( ! ) टीकाकार आहेतच शब्दाची आदळआपट करणारे वीर ( ! ) आज काय कमी आहेत ? कार्य करणारे कमी ? ते धैर्य दाखविणारे कमी !

'सार्वजनिक सत्यधर्मात' ते लिहितात कीं, "'आपल्या सर्वांच्या निर्माण कर्त्यानें अेकदर सर्व स्त्री पुरुषांस धार्मिक व राजकीय स्वातन्त्र्यता दिली आहे" मग म० फुले स्वातन्त्र्य चळवळीचें विरोधक होते ? हा आक्षेप किती सत्य असावा?

म० फुले हे जसे सामाजिक कार्यकर्ते होते तद्वतच त्यांचें कार्य राजकीय स्वरुपाचे सुद्धा होते. प्रामुख्याने त्याना सामाजिक सुधारणा करावयाची होती तदर्थ राजकीय विरोध सुद्धां त्यानी पत्करला जसे ते ब्राम्हणांच्या रोषाला पात्र झाले तसेच ते इग्रजाच्या रोषाला देखिल पात्र झाले. ते जर माडखोलकर म्हणतात त्याप्रमाणे इग्रजास देवदूत मानते तर त्यांनी इग्रजी राजवटीला विरोध केला नसता. मग त्याना "साम्राज्य शाहीचा अणूमात्रहि बोध झाला नाही" किंवा ते "इग्रज उपासक।" हे म्हणणे केवळ म० फुलेंचा द्वेष म्हणूनच वापरण्यांत येत असावे असे जर मी म्हटले तर ते चूक होईल का ?

★ ★ ★

## मराठा जीवन्त आहे ! ● ● ● १६

परशुरामानें आपल्या परशुनें २१ वेळां पृथ्वी नि क्षत्रिय केल्याचे आपण पुराणातरी वाचतो. या चिरंजीव असणाऱ्या परशुरामाचे कसें वाभाडे काढले हे पहावयाचे आहे तसेच वामन भटानें बळीराजास पाताळात पाठविले या गोष्टीत किती तथ्य आहे हेहि बघावयाचे आहे म० ज्योतिराव फुले हे कसलेले वीर होते. त्यांनी तलवार, ढाल, दांडपट्टा, गोळीबार वगैरे लढाईचे शिक्षण घेतले होते हे आपण मागे पाहिलेच आहे. या सांगण्याचा उद्देश असा की, म० फुले हे क्षात्रवृत्तिचें उपासक होते छत्रपति शिवाजी राजावर त्याचे नितात प्रेम होते, निष्ठा होती, अभिमान होता त्यानी सन १८६८ स रायगडास जाऊन महाराजांची समाधी बघितली व शिवाजी महाराजाच्या स्फुर्तिदायक, शौर्यरसानें ओथबलेला असा पोवाडा रचून सन १८७० मध्ये प्रसिद्ध करून मराठ्याची मर्दुमकी जग जाहीर केली.

दुसरी गोष्ट बळिराजाची ! बळिराजा हा अत्यंत दयाळू, पराक्रमी व गरीबाचा वाली म्हणून प्रसिद्धीस आलेला, लोकप्रिय झालेला ! त्याचे वाढते कीर्तिवैभव या वर्चस्व गाजविणाऱ्या गटाला आवडले नाही " आम्ही समाजाचें देव " असताना लोक बळिराजास मान देतात हे यांना आवडले नाही. " बळिराजाचे राज्य येवो " असे आजहि दक्षिण महाराष्ट्रातील लोक बळिप्रतिपदेला म्हणतात. यावरून बळिराजा हा बहुसख्य लोकाना आवडणारा होता हे सिद्ध होते या बळिराजाला नेस्तनाबूत करावयाचे असे कांही दुष्टांनी ठरवून बटू वामनाची नियुक्ति

केली. " भिक्षा देहि " म्हणणारा हा इराणी बटू वामन, बळिचे अवघे राज्य तीन पावलात संपवितो, आणि तिसऱ्या पावलाने बळिराजास पाताळांत पाठवितो शिवाय हा बटू ' अवतारात' जातो, हे किती अकल्पनीय आश्चर्य आहे। या बाबतीत "सार्वजनिक सत्यधर्मी" मध्ये म०फुलेनी बटू वामनाचा चांगलाच समाचार घेतला आहे. सदहूं पुस्तकाच्या अभिप्रायार्थं डॅा विश्रामजी घोले लिहतात की—

"पुराणातील वामनाने, बळिराजास फसवून, त्याचे राज्य हरण केले. तो सूड म० ज्योतिराव फुले यानी उगवला ' गुलामगिरी ' नामक ग्रथरुपाची एक जाज्वलीत गदा उत्पन्न करून तीने त्या वामनाच्या डोकीवर बिनचूक तडाखा देऊन त्याला 'चीत' केले वामनाला या उप्पर डोके वर काढावयाला जागासुद्धां राहिली नाही बळीचा कैवार त्यानी बरोबर घेतला आहे. जर बळीचा आत्मा या भूमडळावर भ्रमण करीत येईल तर तो खरोखरच त्याचा उतराई झाल्याविणा राहणार नाही "

तसेंच पुढे ते परशुरामाच्या बद्दल म्हणतात की, " पुराणतील महानिर्दय परशुराम, ज्याने पौराणिक पृथ्वी निक्षत्रिय केली, ज्याने क्षत्रियाच्या गर्भिणी बायकाची मुले उपजत मारली त्याला त्यानी या गदेच्या प्रहाराने उलथा पाडून त्याची चिरजीवी नष्ट केली. अंधारात सापडलेल्या मनुष्यास इदुप्रकाश किंवा दीप, वाट सापडण्यास उपयोगी पडतो तद्वत ही (गुलामगिरी पुस्तकरुपी ) गदा महाराष्ट्रीय जनास ज्ञानदीपापरि उपयोगी पडत आहे "

परशुरामाने पृथ्वी २१ वेळा निक्षत्रिय केली. मग हा परशुराम किती वयाचा असावा ? एका जन्माचे १०० वर्षे तर २१ जन्माचे २१०० वर्षे होतील. येवढ्या जन्मात तो आला काय ? मग परशुरामाच्या वंशात म्हणजे परशु धारण करणाऱ्या या ब्राह्मणाच्या वंशाने २१०० वर्षेपर्यंत क्षत्रियाचा द्वेष केला. क्षत्रियाचे निर्मूलन करावयाचे व्रत उचलले होते हे सिद्ध होते तद्वतच बटू वामनाची कथा। निव्वळ असभाव्य, अविश्वसनीय, थापा देऊन भोळ्या जनतेची दिशाभूल करण्यात आली ज्या परशु-

रामानें इतके वर्षे क्षत्रियाचा द्वेष केला, सहार केला तो जातीयवादी, त्याचा वंश जातीयवादी ? का महात्मा फुल्यांनी या जातीयवादाची ओळख करून दिली म्हणून त्याना जातीयवादी म्हणावे? या परशुरामाला पृथ्वीवर भूत वा जीवन्तपणें हजर राहण्यासबधी महात्मा फुल्यांनी नोटीस दिली होती आणि मराठा जीवन्त आहे हे सिद्ध केले.

"गुलामगिरीचे" लेखन व्हावयास महत्वेकरून, म० फुलेंची ब्राह्मण वर्गाने उडविलेली टिंगलच कारणीभूत झाली. म० फुल्यांनी एका पत्रकाद्वारे सर्व लोकाना एकत्रित येण्याचे आवाहन केले होते "क्षुद्र अगर कोणीहि आपल्या निर्मिकत्यास, इश्वरास एक मानून आचरण करीत असतील अगर आहेत, अशी माझी खात्री होईल. त्यांस मी आपल्या कुटुंबातील मानून त्यांच्याशी व्यवहार व भोजन करीन ! मग ते स्वकीय असोत की, परकीय असोत" या निवेदनाला वतमान पत्र कारांनी आपल्या पत्रांत स्थान तर दिलेच नाही उलट 'म० फूले हें मूर्ख आहेत' अशा शिव्या हासडल्या. नानाप्रकारे टीका केली त्या सतापातून "गुलामगिरी" आली. आणि त्यामुळे बहुजनसमाजाचे दास्यत्व सपले.

या दोन पुस्तकातून म० फुल्यानी ब्राह्मणावर कठोरपणे प्रहार केला असत्य घटनांचे खडण केले आणि याच धामधुमीत त्यांनी परशु- रामास आव्हान करून तर "बळिराजास सांत्वना" देऊन तर 'शिवाजी राजास गौरवून' 'मराठा जीवन्त असल्याचे' पुन्हा एकदा जगाच्या निदर्शनास आणले.

★ ★ ★

# साहित्य सेवा ● ★ ● १७

"साहित्या" बद्दल निरनिराळया लेखकाच्या निरनिराळ्या कल्पना आहेत, असतील, माझ्या मते तर – ज्या साहित्याने जनमत जागृत होते, जनमनावर ज्याचा प्रभाव उमटतो, किंबहुना जनतेच्या जे पसतीस उतरते तेच उत्कृष्ट साहित्य होय। मग त्या साहित्याची भाषा राकट, रांगडी असो वा त्यात शब्दसौष्ठव नसो। केवळ शब्दांच्या खेळामुळेच साहित्य निर्माण झाले असते तर कैक साहित्यिक झाले असते. या कसोटीनें म० फुले यांचे वाङमयीन कार्य पाहिले म्हणजे म० फुले उत्कृष्ट साहित्यिक होते हें कुणालाहि मान्य करावे लागेल। ते केवळ गद्यातच लिहित नव्हतें तर त्यानी पद्याची देखिल रचना केली. त्यांचे काव्य व लेख स्थितीपर, स्थितीच्या अनुलक्षून होते. त्यांच्या साहित्यात जनतेच्या सुधारणेची उत्कट तळमळ, तगमग त्याच बरोबर अन्यायाची चीड, अन्यायकर्त्यांचा द्वेष प्रगटला हा त्याचा दोष आहे! असें मी तरी मानीत नाही. कारण कुठलाहि साहित्यिक आपल्या वेळेवरील स्थितीचेच चित्रण करीत असतो. म० फुलेंचे साहित्य त्याला अपवाद कसे राहणार? त्या शिवाय त्यांच्या साहित्याचा बाणेदारपणा हा की, ते जें लिहीत ते सत्य होते. विरोधकानाहि ते सत्य नाकारता येत नसें. अर्थात सत्याचे लेखन करणारा, विरोधकांना नावडता होणारच। सत्याचे डोज अत्यंत कडवट असतात. पण स्थिती अशी कीं, या औषधास कुणी दोष न देता औषध देणारासच दोष देण्यात येतो. तद्वत म० फुल्यांचे लिखाण अशा कडवट कठोर सत्याच्या तेजोंकित दिप्तीनें विकासलेलें आहे. एवढे मात्र खरे की, ज्या चिपळूणकरानी

"ब्राम्हण कितीहि लबाड असले तरी, व कितीहि दुष्ट असले तरी अेक गोष्ट निर्विवाद आहे की, ज्ञान भांडाराच्या किल्ल्या त्याच्या कमरेला आहेत. त्याच्या सोह्याशिवाय इतर ज्ञातीस ज्ञानाचा लाभ होण्याचा बहुधा मार्ग मुळीच 'नाही" असे जे दर्पोक्तिने उच्चारीले होते ते म० फुल्यानी आपल्या सर्वांगीण विकासलेल्या कलाकृतीने खोटे ठरविले कुठल्याहि गोष्टीचा मक्ता ठराविकानीच घ्यावा, ही गोष्ट खोटी ठरविली. आमची स्थिती, आमचे जीवन, आमच्या अडचणी स्पष्टपणे बोलण्याचा आणि लिहिण्याचा अधिकार प्रत्येकास आहे. या अधिकाराचा संपूर्ण जीवनभर त्यानी उपयोग केला. साहित्यातहि याचेच प्रतिबिंब आहे. कितीहि भयकर सत्य असले तरी ते त्यानी चव्हाटयावर आणल्याशिवाय सोडले नाही. हा त्यांच्या साहित्याचा महत्वाचा विशेष होय। त्याची कला ही कलेकरिता नव्हती तर जीवनाकरिता, जीवनातील होती.

या सत्याचा पहिला स्फोट म्हणजे "गुलामगिरी" होय। 'गुलाम गिरी' हा ग्रथ १८७३ मध्ये प्रसिद्ध करण्यात आला ब्राम्हणेतरात लेखनाचे प्रथम धाडस करणारे ज्योतिरावच असावेत असे वाटते ब्राम्हण्याविरुध्द वाजलेली ही पहीली नौबत होती कलेच्या दृष्टीने त्याचे मोल नसेल। पण कार्याच्या दृष्टीनें हाच ग्रथ सर्वात महत्वाचा ठरला त्यानतर त्यानी "ब्राम्हणाचे कसब" 'जातीभेद विवेकसार' हे दोन ग्रथ लिहिले. या पुस्त-काचें नांवावरुनच हे किती जहाल ग्रथ असतील अेवढेच निवेदन केलेले बरे। त्यांचे लिखाण किती प्रखर होते हे बघण्यास्तव त्याचेच शब्द पुढील पोवाड्यात पाहू – हा पोवाडा "भटकामगार इजिनीयर खात्यांत कशी पेंढारगर्दी करतात या विषयी लिहिला असून त्यांत दीनजनाचे कसे शोषण होत होते हे भेदक शब्दानी व्यक्त केलेले आहे –

पेशवाई दक्षिणा रमणा – इजिनियर खाती।
भरति होळकरी पोती ॥ धृ ॥

गवता करिता – नित्यबिगारी – घोड्याची भरति।
धाळीने घोडे खाजविती।

फैलामधील – शूद्र बायका – भांडी घासिती ।
बिगारी बिछानें करिती ।
वेडसरसा कुणबी पाहून, पाय दाबविती ।
मजेने झोपा मारिती ॥
स्व – जातीचें भिक्षूक ब्राम्हण, फैलावर नेति ।
भिक्षा माठून देवविती ॥
मिळकतीचे वाटे, हुजूर सोबत्याना देती ।
समजूत वरच्यावर करीती ॥
दफ्तर दारा हफ्तें बाधून भेटीला जाती ।
शिपाया विश्वास बोलाविती ।

ठेपले गोरे अेअून
कचेरी तबू देअून
थकले शिकार खेळून
कागदी सह्या करून
भटावर बाकी सोपवून
विसावा ग्लास घेऊन ।
शोभती त्याचे कोचास
वाचती न्यूज पेपरास ।
मान पहा मधी डुलकीस ॥

बिगाऱ्याच्या कोंबड्या – वगैरे सामानाची भरति ।
पैसा मधीच की खाती ॥
लुट धुमाळी पैसा, आठवण रमण्याची होती ।
खोटी मेळ मिळविती ॥
खजिन्यामध्ये पैसा सरता -- कर योजिती ।
हाडे कुणब्याची पिळती ॥
कर्मनिष्ठ चाकर बनले -- लक्षाधिपति ।
बुधली कुणब्याची वरती ॥
टोपीवाल्या गुह्य कळता राजीनामे देति ।
हवेल्या तीन मजली करती ॥

तसेच —: गुलामगिरीतील विवेचन पाहू —

वकीलाची महागाई। न्यायाधीशा दया नाही ।।

किंवा —

राजे धर्मशील म्हणविती । आतां कांरे मागे घेती ।
विद्या द्यावी पट्टी । धिक्कारुनी सांगे ज्योति ॥

ही ती प्रखरता ! सत्याची दिप्ती ! त्यात मार्दव कसें येणार ? सूर्याचे ऊन कोमल कसे म्हणावे ? प्रात समयी, असेल ! पण म० फुलेचे लिखाण हे जीवनांत तप्त झालेल्या भावनेतून उतरलेले होते. उपरोक्त लिखाणानतर त्याना एकाएकी आजार झाला त्या आजारांत त्याची बरीच शक्ति खर्च झाली सन १८८८ चा तो काळ ! हा हीन, दीन दलिताचा कैंवारी महात्मा खाटेवर पडला, आजारातून उठणार कीं नाही ? ही भीति वाटू लागली श्री विश्राम रामजी घोले असिस्टट सर्जन यांचे औषध सुरु होते श्रीमत सयाजीराव महाराजाना समजताच त्यानी फार मोठा पैसा पुरविला प्रसिद्ध सन्यासी नागेश्वरगीर कल्याणगीर बुवा यानी देखिल आर्थिक मदत दिली या सर्वापेक्षाहि इश्वरेच्छा प्रबळ म० फुलेचे कार्य अपुरे होते ते पूर्णत्वास न्यावे या हेतूनेच म्हटल्यास वावगे कोणते ? म० फुले आजारातून मुक्त झाले या पक्षाघाताच्या आजारामुळे, त्यांचा उजवा हात लूळा झाला या आजाराचे वर्णन त्यानी त्यानतर आपल्या डाव्या हातानें लिहिलेल्या 'सार्वजनिक सत्य-धर्मांत' केलेले आहे

गायकवाडी आश्रय ।
घोल्याची नजर ।
होती अनिवार —
की न घेता ।। १ ।।

दुष्ट रोगातून ।
फुल्या वाचविला ।
आनंदी पत्नीला ।
केले ज्याच्या ।। २ ।।

बुवाजीचे द्रव्य ।
सयाजी नमूद ।
फुल्या झाला मर्द ।
रोगामध्ये ॥ ३ ॥

अशाहि अवस्थेत त्यानी बुवाजीकडून आलेले द्रव्य सत्यशोधक समाजास देऊन टाकले

या आजारानंतर त्यानी 'सार्वजनिक सत्यधर्म' लिहून काढला त्याच्या आयुष्यांतील हाच सर्वोत्तम ग्रंथ ठरला आणि हाच शेवटचा ठरला. या ग्रंथाद्वारे अज्ञानी जनाना प्रकाश मिळाला. धर्मान्धाचे डोळे उघडले. माणसाला माणुसकी शिकविली सुधारणाचे उत्कृष्ट प्रतीक म्हणून या ग्रंथाचा उल्लेख करता येईल. आजतागायत त्यानी आपल्या जीवनात 'शिवाजी राजाच्या', 'मंगलाष्टके व धार्मिक विधी', 'इषारा', 'शेत-कन्याचा आसुड' ४ भाग 'सत्यपाल अभंग' 'ब्राह्मणी धर्मावरील पाच अंकी नाटक' 'तृतिय रत्न नाटक' 'अस्पृश्यांची कैफियत' 'कविता व अभंग' आदि साहित्य लिहिले

त्याशिवाय त्यानी 'सत्सार' व 'दीनबंधू' ही दोन नियत–कालिके चालविली. 'दीनबंधूचे' संपादकत्व श्री नारायण मेघाजी लोखंडे यांचेंकडे होते हेच 'दीनबंधू' आजहि सुरु असून आज श्री प्र वि नवले हे संपादक आहेत हे साप्ताहिक ८६ वर्षे अखंडपणे चालू आहे

म० फुलेंनी आपली लेखणी अस्पृश्योद्धारार्थ, स्त्रीयाचा ऊद्धार आणि सत्याच्या पुरस्कारानें, जीवनभर राबविली. त्याच्या साहित्याला श्री शिंदे यानी 'रानफळे' म्हटले ते सत्यच आहे पण कुणी कटू जालीम जहरी औषध म्हणो पण ते साहित्य जीवनदान देणारे 'अमृत' ठरले एवढे निर्विवाद ! याच साहित्य 'संजीवनाच्या प्राशनाने बहुजन समाज जीवन्त राहिला असे म्हटल्यास चूक होईल काय ? साहित्याचा उद्देश केवळ मनोरंजनच नाही तर जीवन जगावयास स्फूर्ति मिळावयास पाहिजे त्या दृष्टीने म० फुलेंचे साहित्य मानव जातीस स्फूर्तिदायक ठरले हे उघड होय

★ ★ ★

ग्रंथालय, ठाणे
३२२६६ दि
क्रमांक ९० नों क्र

# हा धन्य "महात्मा" झाला ● ● ● १८

पाषाणातून मूर्ति घडवितांना पाथरवटाच्या घनाचे घाव किती खावे लागतात, हे त्या पाषाणालाच ठावं । जगाच्या दृष्टीसमोर मूर्तीचे सुंदर स्वरुप दिसले म्हणजे, जग आदराने आपली मान लववितें एवढे मात्र खरे । तोहि पाषाणच । पण मानवी कृतिने त्यास देवत्व प्राप्त झालेले असते तद्वतच मानव्यातून देवत्वाकडे जाणाऱ्या जीवाला जगाचे आघात सहन करावेच लागतात। हा सिध्दांत होऊन गेलेला दिसतो. जगाकडून अवहेलाना, त्रास, निंदा, यातना याचा अव्हेर जर झाला नाही तर अशा जिवाला "महात्मा" कसे होता येईल ? ही जणू ईश्वराची योजनाच दिसते

देवाच्या अस्तित्वाबद्दल महात्मा फुल्याना आदर होता. एवढेच नव्हे तर ते देवाचे उपासक होते, असे माझे प्राजळ मत आहे एवढे मात्र खरे की, त्यांनी संसारावर तुळशीपत्र ठेऊन, लंगोटी लावून वा हातभर शेंडी लाबवून किंवा स्नान संध्यादि नाकपुडया दाबून देवाची आराधना केली नाही ती करण्याची आवश्यकताच नाही असे माझें देखिल मत आहे. "देवाचे अस्तित्व चराचरात आणि माझ्यातहि अंशरुपाने आहे, तोच अंशरुप मला पहावयाचा आहे" एवढे एकदा ठरविल्यावर मग देवाच्या मूर्तीपुजेची काय आवश्यकता? ज्याचें मन चंचल, अस्थिर आणि एकात्म न साधणारे असेल त्यानी मूर्तिपूजा करावी हा सिध्दांत । मग ज्यांना हे साध्य असेल त्यानी मूर्तीची उपासना करावीच, हा दंडक का बरे ? देवत्वाचा अविष्कार, अनूभूति घडवावयाला कुठें जाणें नको ! प्रपंच टाळणे

नको ! उलट तुकाराम महाराज म्हणतात, "कासया जाणे वनांतरा । सुखे येतो घरा नारायणा । " ही साधना कठीण तर खरीच, पण यातच पुरुषार्थ आहे संसाराला तुच्छ लेखून, त्यापासून पळून जावून ते कुणासहि साध्य होईल. कदाचित सन्याशी मार्गावरील लोकांना सन्यासच श्रेष्ठ वाटत असेल ! खुशाल वाटो ! पण अन्यानीहि त्याच मार्गाने जावे, तुमचा मार्ग तुच्छ आहे, असे कां म्हणावे ? कळत नाही. म० फुले गृहस्थाश्रमी होते असणाऱ्या स्थितीत ते परमानंद मानणारे होते देवाच्या एकत्वा विषयी त्यांची प्रगाढ श्रध्दा होती. त्यानी सत्यशोधक समाजाचे आद्य व प्रथम तत्व – "ईश्वर एक असून तो सर्वव्यापी निर्गुण, निराकार, निर्विकार व सत्यस्वरुप आहे सर्व मनुष्यप्राणी त्याची प्रिय लेकरे आहेत" आणि दुसरे तत्व — इश्वराची भक्ति करण्याचा प्रत्येक मानवास पूर्ण अधिकार आहे आईस संतुष्ट करण्यास अगर बापास विनविण्यास जशी मध्यस्त दलालाची जरुरी नसते, त्याप्रमाणे सर्वसाक्षी परमेश्वराची प्राप्ती करण्यास भट दलालाची जरुरी नाही ! " या मधून देवत्वाला पोहोचण्याचें मार्ग तें बहुजनाना ज्ञात करून देण्यासाठी प्रथम प्रयत्न याच महात्म्याने केले असे म्हणता येईल त्यापूर्वी देखील असे प्रयत्न झाले नाहीत असे नाही पण ते निराळ्या भूमिकेकरून ! साधुसंताच्या भक्तिमार्गानें बहुजनाना देवत्वाला पोहोचण्याचे माग खुले झालेंत पण सर्वसाधारण जनतेचा जो मूर्तिवरील भाव, मूर्तीच्या दर्शनाची, पूजेची उत्कटतता ती किंवा तिची पूर्तता व्हावी म्हणून दुसऱ्याच्या हाताने पूजा करवून घ्यावयाची या प्रथे-वर पहिला आघात म० फुलेनीच केला असे म्हणावे लागेल सत्यनारायण करणे, पोथ्याचे वाचन किंवा देवालयांतील मूर्तिच्या दर्शनानेच पुण्य प्राप्त होते हा जो बहुजनाचा विकृत भाव, किंवा अशा रीतीने स्वार्थीपणाने पुरोहितानी बनविलेली कल्पना म० ज्योतिरावानी परिवर्तीत केली. बहु-जनाना सत्याची आळख करून दिली नव्हें, सत्य जीवनात रुजविले त्या-मुळे पुरोहित संतापले, खवळले, धर्म नाहीसा झाला म्हणून ओरडले. स्नान

सध्येत धर्म नाही, शेंडी वाढविल्यानेच संस्कृति राहत नाही अशा विकृत मताचे त्यांनी खंडन केले म्हणून त्याना धार्मिक नव्हे, अध्यात्मिक सत्याची मूल्यें कळत नव्हती असे नाही त्या दृष्टीने त्यानी इश्वर हा सत्यस्वरुप आहे, जीवनात सद्वर्तनी असावे, असत्याचे खंडन करावे, आणि या सत्य-स्वरुपी प्रकाशाला अनुभूतीत उतरवावे या मताच्या प्रसारानेच सत्यरुपी परमेश्वराची उपासना केली त्याना जग संत,साधु मानणार नाही कारण सर्वसाधारण जनतेच्या साधुत्वाविषयी किंवा संतपणाविषयी विकृत कल्पना झालेल्या आहेत असे माझे ठाम मत आहे. एकनाथ महाराजाचें सद्गुरु जनार्दन महाराज हे किल्लेदार होतें त्याचे जीवन सर्वसाधारण लोकासारखें साधे कर्तव्यदक्ष आणि लढावू वीराचें होते मग त्याना 'साक्षात्कार घडला नव्हता असे म्हणता येईल काय? ईश्वराच्या साक्षा–त्काराकरिता भगवें कपडे घालण्याची आवश्यकता नाही. गळ्यात रुद्र माळा, अंगास भस्म चर्चिले, पायी खडावा आहेत, केस लांब वाढलेले आहेत. भगवी कौपिन घातलेली आहे अशा अवस्थेत कुणी बुवा दिसला की, लागले त्याला साधु म्हणावयाला यास धर्म म्हणता येईल काय ? म० फुले अशा ढोंगतत्र्याच्या विरुद्ध होतें- एवढेच नव्हे तर अशा ढोंगा-चा दंभस्फोट करून सत्याचें मार्गदर्शन करणारे होते त्या दृष्टीने .त्यानी केलेले जीवनातील कार्य हीच उपासना, सत्याची प्रचिति हाच साक्षात्कार आणि त्याबद्दल जनतेने "महात्मा" म्हणून गौरविणे हेच त्याचे साधुपण–संतपण सिद्ध करावयाला पुरेसे आहे. त्याच्या अंत काळी ते सुखाने, ईश्व-राचे नामस्मरण करीत त्यानी या देहाचा त्याग केला असे त्याचें मरण ! मग त्याना देवभक्ती विषयी आदर नव्हता, किंवा ते देशभक्त नव्हते असें मुळीच म्हणता येणार नाही.

म० ज्योतिराव फुले यांच्या कार्याची आतापर्यंत आपणास माहिती मिळालीच आहे त्याचें कार्य सार्वत्रिक स्वरुपाचे मानवाकरिता होते असे मी म्हणेन' जे पूर्वी सुधारकले होते त्याच्यातीलहि त्यानी दोष काढून टाकले आणि त्याच्यातहि माणुमकी वसविली त्यांचें कार्य बहुजन समाजा

करितांच दिसावयाचे प्रमुख कारण म्हणजे बहुजनसमाज अज्ञानांधकारी वावरत होता, नव्हे त्यास ठेवण्यात येत होते महात्मा फुलेंनी दोन गोष्टी केल्या. आपल्या कर्तव्याच्या दिप्तीनें अज्ञानांधकार दूर केला आणि तदर्थ होणारा अन्याय दूर केला त्यांना आणि त्यांच्या साथीदारांना या कार्यार्थं अत्यंत त्रास झाला कैकांना नोकरीवरून कमी करण्यात आले मजुरांना शेठसावकाराकडून त्रास व्हावयाला लागला त्यामुळें बहुजन समाजाचें मिळावे तसे सहकार्य मिळेनासे झाले संस्थानिक तर आळसात आणि विलासात धुंद असावयाचे " रे मार्केट " आणि ' पाटील पटवारी" प्रकरणावरुन इंग्रज लोकांकडून त्रास होऊ लागला आधीच मनात जळणारे दुष्ट लोक संधीच्या प्रतिक्षेत टपून बसलेले विरोधक संधी ( अर्थात त्रास देण्याची ) येताच त्रास देवू लागले घराजवळून दारावरुन मैल्याच्या गाडया जाऊ लागल्या एकना अनेक त्रासामुळें ज्योतीबांना दुःखी केले. पण त्यांनी ह्या गोष्टी कुणाच्याहि कानावर घातल्या नाहीत एका तांबोळयाने ह्या त्रासाची हकीगत 'दीनबंधू' मधून प्रसिध्द केली. त्यामुळें मुंबईकर मंडळींनी या बद्दल जाहीर निषेध प्रगट केला आणि इंग्रज अधिकाऱ्याच्या कानावर ही हकीगत टाकून या तक्रारीचा नायनाट केला.

म. फुल्यांवर मारेकरी पाठविल्याची हकीगत आपण मागे वाचलीच आहे 'आपणासारिखे करिती तात्काळ' हा संताचा बाणा ! सत्याने सत्यानुभूति घडविली ! म. ज्योतीबांना संबंध हयात दुःखांत म्हणजे दुसऱ्या कडून होणाऱ्या त्रासांत काढावी लागली. निंदा, टिका-टिपणी घाणेरडे आक्षेप, हे तर त्यांना सदैवच ऐकण्याचा सराव झाला होता एवढे असलें तरी हिऱ्याचे तेज कधीहि लपणारे नसते ! कोंबडे झाकले नाही म्हणून काही सूर्योदय व्हायवाचा थांबत नाही! त्यासाठी म्हातारीनें कितीही बोटे मोडली तरी काही उपयोग नाही तद्वत म० ज्योतिरावांच्या विरोधकांनी कितीहि आदळआपट केली तरी आता उपयोग होईनासा झाला त्यांच्या कार्याचे चौघडे सर्वत्र वाजू लागले! बहुजन समाज जागृत होऊ लागला होता. कैकांनी झोप जाऊन ज्योतिरावांच्या कार्याकडे

आकृष्ट होत होते विद्वान (?) लोकानी तर त्याचा कधीच सन्मान केला नाही आणि समाजानें सुद्धा आता आताशा त्याच्या मार्गावर पदक्षेप केला होता त्याच्या आयुष्यात पहिला आणि शेवटचा एकच सन्मान होता अन्यथा त्याना कुणी मानपत्रे दिली नाहीत किंवा कुणी स्तुतिगायनहि केले नाही

सन १८८८ च्या एप्रिल महिन्यात म० ज्योतिराव मुबईला गेले. त्यावेळी त्याचा सन्मान करावा, त्याच्या ऋणातून मुक्त व्हावे, या अुद्देशाने मुबईकरानी ११ मे १८८८ तारखेला एक जाहीर सभा घेतली या सभेत बहुसख्य मजूर हजर होते त्याशिवाय दुकानदार कारखानदार आदि प्रतिष्टीत नागरिक अुपस्थित होते या ठिकाणी म० फुलेच्या चरित्रावर तेथील पुढाऱ्यांची भाषणे झालीत ज्योतिरावानी बहुजन समाजास जो सत्याचा मार्ग दाखविला, जी चेतना दिली, जी जागृति दिली त्या जागृतीनेच त्यांना 'महात्मा' ही पदवी अर्पण केली ज्योतिरावांचा हाच सर्वात मोठा विजय आहे भारतात 'अवतार' झाले पण 'महात्मा' म्हणून सर्वात प्रथम मान ज्योतिरावानाच लाभला

सत्याचा पालनवाला । हा धन्य ज्योतिबा झाला ॥
पतितांचा पालनवाला । हा धन्य महात्मा झाला ॥
जन्माचा मालाकार
कर्माची खडी तलवार
जनतेचा जागा शेर
या समान कोण तो बोला । हा धन्य महात्मा झाला ॥

म्हणून जगानें जयजयकार गायिला, तरीहि विरोधक मात्र अद्यापहि आग पाखडल्या शिवाय कमी करीत नाहीत हे भारतीयाचे दुर्दैव आहे. आज महात्मा फुल्याना हा इहलोक सोडावयाला ७० वर्षे झालीत तरीहि या महात्म्यासबधी भारतीयाना पूर्ण माहिती अुपलब्ध असू नये, ही खेदाची गोष्ट। या सबधात एका वेगळ्या प्रकरणात लिहिण्यांत येणारच आहे

* * *

# अनंतातल्या अनंततत्वी ! ●●● १९

अनंतातल्या अनंततत्वी ।
दिव्य ज्योति त्या विलीन होती ॥

जन्मास येणारास मृत्यू हा ठेवलेलाच ! वस्त्र जुनें झाले म्हणजे ते टाकून नवीन घ्यावयाचे हा सिद्धांत ! ही गीतावाणी ! !

" कर्तव्यास्तव जन्मा येणें । कर्तव्यातचि जन्म घालणे ॥
कर्तव्यातचि मरणा जाणे । कर्तव्यातचि आमरणें ॥

हा महात्म्यांचा ध्येयवाद ! " मरणापूर्वी मरण भोगिले ।
मरणाचे मग भयचि नुरले" ॥

अशा जीवांना मरणाची भीति कुठली ? असे जीव मरणाला सामोरे जातात. देहाकडून कार्य होईनासे झाले म्हणजे, देहाचा त्याग करावाच लागतो अन्यथा त्या देहाचा उपयोग काय ? आपल्या देहाला आता दगदग सोसवत नाही, पूर्वीसारखे काम होत नाही, आपली सेवा सपली असे ज्योतिरावांना वाटू लागले मनुष्यप्राणी दुःखी असला म्हणजे सांत्वना देणारे विरळेच, थोडकेच ! पण त्या व्रणावर टोचणी मारणारे काकच जास्त ! या महात्म्यास सबंध जीवनभर असे दुःखाचे व्रण करणारे कैक विद्वान, पंडीत सांपडले पण त्या व्रणावर मलमपट्टी करणारी, जी त्यांची सहचारीणी ती सावित्रीबाईच होय ! सावित्रीबाई सती सावित्रीप्रमाणेच साध्वी स्त्री होती ती वीरपत्नी होती वीर स्त्रीया कुठल्याहि प्रसंगास भीत नाहीत धैर्याने तोंड देतात तद्वत म० फुल्यांच्या कार्याला सहकार्य देत होत्या ज्योतिरावांच्या वाढलेल्या व्यापाचा

पाळलेल्या मुलाचा, अन्नछत्रालयाचा भार त्याचप्रमाणे शेतीवरील देखरेख पुणे येथील अनाथ वसतीगृहाची व्यवस्था आणि शिक्षण देण्याची कामगिरी त्यांनी मोठ्या आनदाने स्विकारली पतिच्या कार्यातच आपला आनद, असेच त्याना वाटे

पक्षाघाताच्या भीषण आघातानें, श्रीमती सावित्रीबाईना पुढील भविष्य समजले पुढे काय होणार ? हे अशा स्त्रियाना, फारच त्वरीत कळते नाही का ? तत्पूर्वी उरल्या सुरल्या गोष्टी, उरकून घ्याव्यात असे त्यानी ठरविले. त्यापैकीं यशवन्तरावाचे लग्न ही घटना महत्वाची होती, या घटनेश ज्योतिरावानी तात्काळ सम्मति दिली

यशवतराव हा काशीबाई नायक, विधवा ब्राम्हण स्त्रीच्या पोटी जन्मलेला मुलगा होता बालहत्या प्रतिबधक गृहांत या मुलाचा जन्म झाला सावित्रीबाईला मूलबाळ नव्हते सतती नसल्याचे दु:ख स्त्रियाना फार असते असे आपल्या पाहण्यात येते पण या साध्वीला त्याबद्दल कधीहि दु:ख वाटले नाही उलट यशवतरावास आपला पुत्र मानून त्यावर त्यानी वात्सल्याचा अभिषेक केला सावित्रीबाई म्हणजे मूर्तिमत दया ममता आणि शाति। त्यामुळे यशवतरावाचे सगोपन अत्यत ममतेने व लाडाने झाले या वेळी यशवतराव हा कॉलेजमध्ये वैद्यकशास्त्राचा अभ्यास करीत होता ज्योतिरावानी व सावित्रीबाईनी त्याचे लग्नासबधी विचार विनिमय केला यशवतरावाचे सुद्धा मत घेतले आणि त्याप्रमाणे हडसर येथील रा० ग्यानबा कृष्णाजी ससाणे याच्या सुशील, सुविद्य कन्यका लक्ष्मीबाई याचेबरोबर दि ४ फेब्रुवारी १८८९ सोमवार सकाळी ९।। ला यशवतरावाचें लग्न पार पडले या घटनेचा उल्लेख १० फेब्रुवारी १८८९ च्या 'दीनबध' ने सविस्तर पणे केला आहे. या विवाहाचा विधी अत्यत नाविण्यपूर्ण आणि धार्मिक विधीना पूर्णपणे फाटा देऊन उरकण्यात आला ७० वर्षापूर्वी अशातऱ्हेने धाडस करणे किती धारिष्ट्याचे कर्तव्य होय । ही कल्पना आजहि अनुभविण्यासारखी आहे अशा तऱ्हेचे हे पहिले व शेवटचे कार्य ओकदाचे पार पडले

म० फुलेंचें कार्य सुरळीतपणे सुरु होते त्याच्या कार्याची धुरा पुढे नेण्यास बरेच कार्यकर्ते तयार झाले होते आपले कार्य अव्याहतपणे पुढे चालू राहील अशी त्यांना कल्पना आली. अशा स्थितीतच त्याना पुन्हा बराच थकवा आला. नोव्हेंबर महिना उजाडला। मृत्यू समीप आहे. हे त्यांना कळले. ते आता कुठे जाईनासे झाले आत्मचिंतनात आणि कर्तव्यातील फलश्रुतिच्या परमानंदातच ते मग्न राहू लागले. मुंबईकर आणि पुण्यातील आपल्या सहकारी लोकाना भेटीला बोलाविले शेवटचा उपदेश दिला सर्व निरवानिरव केली मन प्रभपदी लीन केले. आणि प्रभुगुण गात गात ही ज्योति दि २७ नोव्हेम्बर १८९० गुरुवारी रात्री २ वाजून २० मिनिटानी 'अनतातल्या अनततत्वी' विलीन झाली।

म० फुलेची ही दु:खद मृत्यूवार्ता पवन गतीने नगरीत पसरली. अख्ख्या महाराष्ट्रात पसरली सर्व सूज्ञ मडळी ब्राम्हण ब्राम्हणेतर दु खी झाली. त्याच्या मृत्यूने दु:ख झाले ते दीनदलिताना, स्त्रियाना। अनेकाच्या डोळ्यातून अखड अश्रूपूर वाहत होता दु खाचे साम्राज्यच नगरावर पसरले होते दि २८ शुक्रवारी सकाळी ८ वा महात्मा फुलेंच्या देहानें पुणें शहराचा निरोप घेतला ज्या पुणें शहरात राहून त्या देहानें महाराष्ट्रभर एवढी क्रांती केली ज्या शहराने दु:ख दिले, सौख्य दिले त्या शहराचा, शेवटचा निरोप घेऊन, त्याच्या पार्थिव देहास शेवटच्या स्थळी नेंण्यात आले. त्याच्या शवयात्रेस सर्व जातीचे लोक हजर होते. स्मशानभूमीवर रा कृष्णराव भालेकर, रा० ब० डॉ० घोले, श्री बाळवेकर, रा० ब० नारायणराव लोखंडे, जे पी. रामय्या, व्यकय्या अय्यावारु, ग्यानबा कृष्णाजी ससाणे, पडीत धोंडीराम व यशवतराव फुले आदिंची 'महात्म्यास' श्रद्धांजलीपर भाषणे झालीत

चिता पेटली, देह जळू लागला, आत्मा अनंतात गेला, 'महात्मा उरला। जड अन्त करणाने त्या कलेवराचे अंतिम दर्शन घेऊन जनसमुदाय परतला !

सरले। सगळे सरले।।
'ज्योति' तेज परि जगती उरले।। ★ ★ ★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्र ३८८५ ... दि: ...
क्रमांक ... नों दि ...

# 'राष्ट्रीय स्मारक' व 'चरित्र ● ● ● २०

आता येणारी जयंती ही ७१ वी आहे. महात्मा फुलेंच्या स्मारका बाबतची उदासिनता सोडून आपणासर्वांकडून प्रयत्न होणे जरुर आहे अशा थोर महात्म्याची जयंती केवळ काही ठिकाणी माळीसमाजाकडून आणि अस्पृश्याकडूनच पाळल्या जावी, ही दुःखाची गोष्ट आहे. म० फुलेंचे कार्य मानवसमाजाकरिता होते, बहुजनसमाजा करिता होते. पण, त्याच्या ऋणातून मुक्त होण्याचे विचार अजूनहि आमच्या राष्ट्रभक्ताच्या नव्हे राजकीय पुढाऱ्याच्या लक्षांत येऊ नयेत हे दुर्दैव म्हणावयाचे का ? म० फुल्याच्या कार्याची जाणीव प्रत्येक कार्यात आहे. शिक्षणात आहे, अस्पृश्यता निवारणात आहे, महिलांच्या सेवेत आहे अनेकाना अनेक जिथे बघावे तिथे म०फुल्याच्या कार्याची जाणीव उरलेली आहे- असे असतांना आपणा कडून त्यांच्या स्मारकासबंधी कोणत्याहि प्रकारची कारवाई होऊ नये ही दुःखाची गोष्ट आहे उलट माझ्या अैकण्यातील तर असे एक विचित्र उदाहरण आहे की, अेका महाविद्यालयास म० फुलेचें नांव देण्यासाठी गायकऱ्यांना व अितर पुढाऱ्याना आपली शक्तिपणास लावावी लागली विरोधक सुद्धा फुलेचे भक्तच ! पण भक्त म्हटल्यापेक्षा फुलेंना 'महात्मा मानणारे होते अशाहि स्थितीत 'म० फुले' नाव देण्यासबंधी अेकागीपणा असावा ही गोष्ट अत्यंत लाजीरवाणी आहे

तद्वत या भारताच्या महात्म्याची पूर्ण सगतवार माहिती भारतीयांना आणि भारताबाहेरील जनतेला नसावी ही किती दुःखाची गोष्ट आहे या सबधात माझेकडून कोणता प्रयत्न होणार ? माझे सद्गुरु, बहुजन समाजाचे कठोर पुरस्कर्ते, ज्याचा किर्तन सम्राट, किर्तन केसरी, भागवताचार्य आदि पदव्यानी विदर्भ महाराष्ट्राने गौरव केला आहे ते वदनीय नित्यानदजी मोहिते महाराज यानी हल्लीचे महाराष्ट्र मुख्यमत्री श्रीमान यशवतरावजी चव्हाण याना अेक विनतीपत्र सादर केले होते. ते सपूर्णच खाली देत आहें

- ॥ ॐ ॥ -

श्रीमान यशवतरावजी चव्हाण मुख्यमत्री मुबईराज्य याचे सेवेशी, विनतीपत्र सादर करतो कीं,

२७ नोव्हेम्बर हा दिवस म० ज्योतिबा फुले याचा स्मरणदिन म्हणून त्याच्या प्रेमिकाकडून दरवर्षी पाळण्यात येतो पण त्याच्या सर्वांगीण अशा चरित्राची वाण आहे करितां आपण आपल्या कर्तृत्वशाली नेतृत्वानें हे काम कुणाकडे अधिकृत रित्या पुरस्कारील्यास म० फुले यांच्या कामगिरीची ओळख सर्वं भारताला करून दिल्या सारखे होईल तसेच हे चरित्र मराठी व इग्रजी भाषेमध्ये लिहून प्रसिद्ध व्हावीत श्री० राम स्वामी पिल्ले याच्या सारख्या कसलेल्या व इग्रजी भाषेवर प्रभुत्व असलेल्यांना जर आपल्या सारख्यानी सूचना केली तर हे कार्यं होण्या-सारखे आहे. तसेच श्री के सी ठाकरे प्रबोधनकार किंवा श्री दौंडकर सपादक 'सारथी' याचे कडून मराठीत झाल्यास बरें होईल

मी आपण मजवर सोपवाल ते काम करण्यास मनापासून तयार आहें. कळावे.

आपला नम्र

तारीख २१-११-५६

नित्यानद मोहिते

तसेंच २७-११-१९५६ या पुण्यतिथीस मुडगाव येथील सभेत अेक ठराव पास करण्यात आला व तो भारताचे कृषिमत्री श्री पजाबराव देशमुख यांचेकडे पाठविण्यात आला तो असा—

ठराव — म० ज्योतिबा फुले यांच्या पुण्यस्मरणदिनी, एक-मताने खालील ठराव अुत्तीर्ण झाला

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या इंग्रजी चरित्राची आजच्याकाळी अत्यंत आवश्यकता असल्याने श्री डॉ पंजाबराव देशमुख तथा भाअूसाहेब यांनी इंग्रजीत म० फुलेचें चरित्र लिहण्याकरिता श्री रामस्वामी पिल्ले यांचेकडून होणे करिता आपलेशब्द खर्ची केल्यास हे कार्य होअू शकेल असा विश्वास आहे तरी भाअुसाहेबांनी मनावर घेऊन हे कार्य करावे अशी या सभेची भाअूसाहेबांना नम्र विनंती आहे.

सूचक — अवधूतराव किसनराव आंबाळकार

अनुमोदक — यशवंतराव लक्ष्मणराव देशमुख

अध्यक्ष — श्री शंकरराव महादजी तथा नानासाहेब देशमुख. त्या नंतरहि आणि तत्पूर्वी पासूनहि अूपरोक्त संबधात मुडगावकर मंडळीचे प्रयत्न, व निरयानंदजी मोहिते महाराज यांचे मार्गदर्शनाखाली चालू आहेत पुण्यतिथ्या ह्या तर ठिकठिकाणी दरवर्षीच साजऱ्या होतात। अेक दिवस गेला म्हणजे त्या गोष्टीवर पडदा पडतो. म्हणून तत्संबधी काही भरीव कामगिरी होणे आवश्यक आहे म०फुलेंचे राहते घर राष्ट्रीय स्मारक म्हणून अद्यापहि झाल्याचें आमचे अैकिवात वा वाचनांत नाही. त्यासंबधात २७-११-१९५९ रोजी मुडगाव येथील म० फुले जयंति निमित्त भरलेल्या सभेत एक ठराव पास करण्यात आला तो विदर्भातील बहुतेक दैनिकातून प्रसिद्ध झालेला आहे. १५-१-१९६० चे 'दीनबंधू' या साप्ताहिकांत सुद्धा आलेला आहे त्या शिवाय या ठरावाच्या १००० प्रति काढून २५-३० शहराना आणि २५-३० खेड्यांना पाठविण्यात आल्या, महाराष्ट्रातील प्रमुख शहरातून आणि इंदूर, ग्वाल्हेर मुंबई आदि शहराकडे सुद्धा पाठविल्या स्थलसंकोचास्तव संपूर्ण गांवाची नावे देता येत नाहीत पण बहुतेक ठिकाणाहून तो ठराव पास करून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचेंकडे पाठविण्यात आला. ते छापील पत्रक अशा तऱ्हेचें होते —

म० फुलेचे राहते घर राष्ट्रीय स्मारक करा !

## – जाहीर विनती –

खालील ठराव कार्यान्वित होण्या करिता आपण आपले गावातून दिलेला ठराव मजूर करून मुबई प्रदेशाचे मुख्यमत्री नामदार श्री यशवत-राव चव्हाण यांचें कडे रजिस्टर करून पाठवावा व आपण हा ठराव पास केल्याबद्दल खालील पत्त्यावर कळविण्याची कृपा करावी

ठराव .– म० ज्योतिबा फुले याची पुण्यस्मृति भारताचे भावी पिढीस राहण्या करिता पुणे येथील वेताळ पेठेतील त्याचे राहते घर मुबई सरकारनें राष्ट्रीय सपत्ति ठरवून राष्ट्रीयकरण करणे व त्याठिकाणी म० ज्योतिबा फुले यांचा पूर्ण पुतळा उभा करून त्याचे विचाराची व राष्ट्रीय कार्याची जोपासना होण्या करिता त्याच्या ग्रथाचे पुनर्मुद्रण करणे व पुण्याच्या प्रेक्षणीय स्थळाचे यादीत नोंद करून हे प्रवाशाचें लक्षात आणून देणे. ही मुबई राज्याचे पतप्रधान श्री. यशवतराव चव्हाण यांना विनती करण्यात येत आहे

आपले नम्र

| | |
|---|---|
| १ ब नित्यानदजी मोहिते महाराज | २- अ कि आबळकार |
| ३. पा ना पिंपळे मुडगाव | ४ नानासाहेब देशमुख |
| ५. पु ज. हाडोळे ,, | ६. गगाराम सरकटे |

पत्रव्यवहारास्तव – श्री पु पिंपळे आकोट

अुपरोक्त पत्रक प्रकाशित झाल्यावर ते निरनिराळ्या ठिकाणी पाठविण्यात आले अेक ठराव मुख्य मत्री यशवतरावजी चव्हाण यांचेकडे सुध्दा पाठविण्यात आला. ज्या ज्या ठिकाणाहून हा ठराव पास करून, अम्हांकडे कळविण्यात आले ते येणेप्रमाणे –

१) अमरावतीहून विदर्भ क्षत्रियमाळी शिक्षणसस्था अमरावती कार्यकारी मडळाच्या २१–२–१९६० चे सभेत श्री उ ता. वाघ यांचे अध्यक्षतेखाली, श्री बाजीराव चुके यांचें सूचकत्वानें व श्री मी ... खडे

व श्री वसतराव चुके यांचे अनुमोदनानें ठराव पास झाला. यांनी या ठरावाद्वारेच नोव्हेंबरच्या २७ तारखेस शाळा कचेऱ्याना सुटीची मागणी केली आहे.

टाकरखेडा (मोरे) जि. अमरावती –

श्री क्षत्रिय माळीसमाज कमेटी यांचें कार्यकारी मडळाचें दि ६–२–६० चे सभत श्री तु. सि मुरतकार यांचे अध्यक्षतेखाली, अध्यक्षांच्या सूचनेनें व श्री ब. शा कळमकार याच्या अनुमोदनाने हा ठराव पास झाला

या शिवाय, आकोट, भ्रमरपुरी, तेल्हारा, हिवरखेड, दहिगांव, रेचा, अजनगांव, येथून व मगरुळ व आकोट रिपब्लीकन पक्षातर्फे मुबईवरून बाबुराव पाटील याचेकडून हा ठराव पाठविण्यांत आला

या सबधात कुठल्याहि प्रकारची हालचाल आपल्या सरकारकडून झाल्याचे आम्हास कळले नाही तथापि पुनश्च विनति समजून या बाबतीन सरकारनें लक्ष घालावे अशी प्रार्थना आहे.

या सगळया प्रकरणाचा इत्यर्थ हा की, म० फुले यांचे [illegible] जे पुणे येथे वेताळपेठेत आहे ते राष्ट्रीय सपत्ति म्हणून ठरविण्यांत येऊन त्यांचा मोठा पूर्ण पुतळा त्याठिकाणी बसविणे त्याचबरोबर अेवढ्या थोर महात्म्याच्या कार्यासबधी अधिक विस्तृतपणे इग्रजीत आणि मराठीत चरित्रे असणें या कामासबंधी वरिष्ठ नेत्यांनी लक्ष घातले तर हा प्रश्न चुटकीसारखा सुटेल. जे दिवशी ह्या दोन गोष्टी होतील तो सुदिन ! आणि तीच खरी म० फुले यांची जयती होय ! असें माझे मत आहे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
३२२६७ दि २८।८।७१
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्रमांक ... दि ...
दा. क. ११५८४

मराठी–हिंदी वाचकांकरिता –

**अरुण एजन्सीज**

सर्व प्रकारची मराठी हिंदी मासिके
रहस्यमय कादबऱ्या – सिनेसाप्ताहिके
विक्रेत्यास भरपूर कमिशन

भेटा अगर लिहा–

आर एस् जुनगरे,
जवाहर रोड, आकोट

**श्रीकांत दालमिल**

– आकोट –

शेतकऱ्यांच्या आणि व्यापाऱ्याच्या
सोयीसाठी वाजवीदरानें
ठोक चिल्लर धान्याचे, खरेदी
विक्रीचे एकमेव ठिकाण

संचालक– गोपाळराव मवतकार
गोलबाजार, आकोट

भारत सरकारकडून 'रजिस्टर्ड' केलेले

**– पां ढ रे डा ग –**

सन १९३६ पासून प्रसिद्ध व
हजारो लोकानी अनुभवून प्रशस्तीपत्रे
पाठविलेले अजब गुणकारी औषध
कि ५ रु पो ख रु १।.

– माहिती पत्रके मोफत –

ए क वे ळा अ नु भ व घ्या

वैद्य - के आर बोरकर (१००)
आयुर्वेद भवन मु. पो मंगरूळपीर
(जि अकोला)

**मोजणी व नकाशे**

शेतीच्या व घराच्या नकाशा-
करिता, मोजणी करिता
अतिक्रमणाच्या नकाशाकरिता
सर्वांना परिचित व प्रसिद्ध

– भेटा –

लक्ष्मण डोंगाजी गावंडे
आर. एल् गावंडे
गावन्डेपूरा, आकोट

गादी दुलई करिता –

**भारत गादी कारखाना** जवाहर रोड, आकोट

जुनी व नवी रुईची पिंजाई, चांगली शिलाई,
ऑर्डर प्रमाणे वक्तशीर माल मिळेल अवश्य भेटा –

मा. -- लियाकतखाँ, आकोट

महात्मा फुल्यांचे एकमेव जिवन्त स्मारक म्हणजेच

८६ वर्षांचे सर्वात जुने, सचित्र, लोकप्रिय साप्ताहिक

# ● दी न बं धु ●

दर शुक्रवारी नियमितपणे प्रसिद्ध होते. पाने आठ

जाहीरातीचे उत्कृष्ट साधन. वा. वर्गणी ट ख. सह व दीवाळी अकासह

फक्त ५ रु आजच आपली वर्गणी पाठवून वर्गणीदार व्हा.

" दीनबंधू " रास्ता पेठ, पुणे २ Poona

---

– सार संग्रह पद्धतीचे मराठी मासिक –

# ललित मेघदूत

वार्षिक वर्गणी १० रु सहामाही ६ रु. अेजन्टानी २५ % कमिशन

कापून रक्कम पाठवून आपली मागणी नोंदवावी.

जाहीरातदारानी सवलतीच्या दराकरिता भेटावे अगर लिहावे

मेघदूत प्रकाशन धरमपेठ, नागपूर

---

फॅशनेबल व वक्तशीर कपडे

शिवून मिळण्याचे एकमेव केंद्र

# वानखडे टेलरींग फर्म

जवाहर रोड, आकोट

संचालक–

उद्धवराव वानखडे, आकोट

# शे ती सा ठी –

बर्मार्शेल कपनीची बागायती व

शेतीच्या पिकावरील सर्व जातीची

कीडनाशक औषधें आमच्याकडें

योग्य भावानें मिळतील

– भेटा अगर लिहा –

स्टॉ. प्रभाकर शिवराम सुपासे

सोमवारवेस, आकोट

– लोकरंजनातून लोकशिक्षण –

बघूनों ! कोणत्याहि सार्वजनिक उत्सवाची
शोभा वाढविण्यासाठी

## महात्मा फुले कलापथकाचा

**शंभरटक्के विनोदी कार्यक्रम ठेवा.**

भेटा अगर लिहा –

संचालक – **महात्मा फुले कलापथक**, सोमवार वेस

**आकोट** (जि अकोला)


REFBK-0011594


**हिंदुस्थान**

**मोटर**

ओव्हर ऑयलिंग, रंगकाम, डागकाम
सर्व प्रकारच्या सायकलीचे सुटेभाग
वाजवी दराने मिळण्याचें एकमेव
ठिकाण

संचालक –

सुधाकर बेदरकर, आकोट

**महाराष्ट्र हॉटेल**

जवाहर रोड, आकोट

गरम व ताजा खारा माल
सर्वोत्कृष्ट चहा आणि गोड माल
लग्न पार्टीसाठी आर्डर द्या

संचालक – वजुभाई राजा,
आकोट